मेहता मराठी ग्रंथजगत

◆जुलै, २०१५◆
◆किंमत १५ रुपये◆

अल्पावधीत
लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला
वाहिलेले
दर्जेदार मासिक





संघर्षमय परिस्थितीवर मात करून दहावीच्या परीक्षेत यश मिळवणाऱ्या गुणवंतांचा **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**कडून गौरव!!
मिहिर, प्रियांका, प्रतीक्षा आणि 'आपलं घर' मधील विद्यार्थ्यांच्या जिद्दीला सलाम!!

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे मायकल जॅक्सनचे चरित्र 'मायकल जॅक्सन : एक जादू आणि बेधुंदी' (डावीकडून) अनुवादिका रेश्मा कुलकर्णी- पाठारे, सुप्रसिद्ध कवी संदीप खरे आणि ऑल इंडिया फॅन क्लबचे संस्थापक निखिल गंगावणे यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.

मेहता मराठी ग्रंथजगत

। जुलै २०१५ । वर्ष पंधरावे । अंक सातवा ।

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

अनुक्रमणिका

संपादकीय	४
साहित्यवार्ता	८
पुरस्कार	३४
लक्षवेधक	४२
'स्वामी'कार रणजित देसाई	४६
पुस्तक परिचय	
मायकल जॅक्सन	४८
असाध्य ते साध्य	६६
श्रद्धांजली	८६
बालनगरी	९२

डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

ॲमेझॉनचे इंडिया कनेक्शन

ॲमेझॉनने ग्रंथविक्रीक्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून जागतिक पातळीवर सर्वोच्च स्थान प्रस्थापित केले आहे. पुस्तकांच्या विक्रीपासून सुरुवात करून उभारलेल्या वितरण व्यवस्थेचा फायदा हा इतर उत्पादनांच्या (खेळणी, फर्निचर, रेडिमेड कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, सीडीज संगीत आणि किराणा माल देखील) विक्रीसाठी वापरता येईल हे लक्षात आले आणि केवळ अमेरिकेपुरताच आपला व्यवहार मर्यादित न ठेवता 'हे विश्वचि माझे घर' असे समजून आपला व्याप देशोदेशी पसरावा अशा प्रकारे आपली यंत्रणा व्यापक करण्याचा उद्देश समोर ठेवून हळूहळू पण धडाडीने हजारो कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करून त्यांना प्रशिक्षित केले. जोपर्यंत केवळ पुस्तकांचीच विक्री हे उद्दिष्ट बाळगून ॲमेझॉनचा कारभार चालू होता, तोपर्यंत फक्त लेखक, प्रकाशक यांच्याशीच ॲमेझॉनला संघर्ष करावा लागला. एक तर ॲमेझॉन कुठलेही पुस्तक घरपोच देत असे आणि तेही वितरणाकरता जास्त भुर्दंड न पडता किंवा पुस्तकाच्या दुकानात जाऊन खरेदी करण्याचा वेळ आणि त्रास वाचवून. ही कल्पना वाचकांना आणि ग्राहकांना आकर्षक आणि सोयीची वाटली. त्यामुळे ग्रंथविक्रीची दालने ओस पडली असे नाही परंतु ग्राहकांची वर्दळ थोडीफार कमी झाली. साहजिकच तेथील पुस्तकांच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न कमी होत गेले. इंग्लंडमधील वॉटरस्टोन या अग्रगण्य ग्रंथविक्री क्षेत्रातील कंपनीवर दिवाळखोरीची पाळी आली. तिने आपली १७३ विक्रीकेंद्रे बंद करण्याचा निर्णय घेतला. अमेरिकेतील त्यावेळची सर्वांत जास्त ग्रंथविक्री करणारी बार्न्स अँड नोबल ही संस्था देखील तोट्यात गेली आणि तिची अनेक ग्रंथदालने बंद पडली. बॉर्डर्सची देखील हीच अवस्था झाली. त्यामुळे अमेरिका आणि इंग्लंड येथे ॲमेझॉनविरोधी वातावरण तयार होऊ लागले.

प्रकाशक आणि ॲमेझॉन यांचे संबंधही ताणले गेले. ॲमेझॉनला जे कमिशन हवे होते ते देण्यास प्रकाशक नाराज होते. लेखकांच्या हक्कांचा आणि रॉयल्टीचा मुद्दाही महत्त्वाचा ठरला.

तशात ॲमेझॉनने २०१० साली किंडल हे वाचनयंत्र बाजारात आणले. सुटसुटीत पुस्तकाच्याच आकाराच्या या ई-रीडर वर कोणतेही पुस्तक अल्प किमतीत डिजिटल स्वरूपात वाचकांना घरबसल्या एका क्लिकसरशी वाचायला मिळू लागले.

आरंभीच्या किंडलची किंमत ५०० डॉलर होती त्यामुळे सर्वच वाचकांच्या आवाक्यात किंडल येणे कठीण होते. तेव्हा त्याच्या किमती कमी कमी करत आता १०० डॉलरपेक्षाही कमी झालेल्या आहेत. आणि वाचकांनी सुचवलेल्या सूचनांच्या प्रमाणे वेळोवेळी हव्या त्या सुधारणा व सोयी त्यात करण्यात येत आहेत. किंडलचा स्क्रीन हा पांढऱ्या शुभ्र कागदावर छापलेल्या पुस्तकाप्रमाणे असून तो वाचताना डोळ्यांना त्रास होत नाही. पुस्तक वाचताना आपण पाने मागेपुढे करतो, संदर्भासाठी खुणा करतो तसे यात ई-बुक वाचतानाही करता येते. त्याचबरोबर किंडलवर एका वेळी दोन-तीन हजार पुस्तकेही डाऊनलोड करून ठेवता येतात. आणि छापील पुस्तकापेक्षा ती फार स्वस्तातही उपलब्ध होतात. ती पुन्हा पुन्हा वाचता येतात. किंडल घेऊन आपण एकाच वेळी हजारो पुस्तकांचे ग्रंथालय खिशात ठेवून हिंडतो आहोत असा अभिमानही मिरवू शकतो.

गेल्या वर्षापासून भारतातही ॲमेझॉनने हातपाय पसरायला मोठ्या प्रमाणावर सुरुवात केली आहे. मोठ्या मोठ्या शहरांमध्ये ग्रंथविक्री दालने आणि वितरण केंद्रे उभी केली आहेत. ऑर्डर दिलेले पुस्तक २४ तासात ग्राहकाला घरपोच मिळावे आणि कॅश ऑन डिलेव्हरी या तत्त्वाने त्याची किंमत चुकती करावी हा मार्गही सर्रास वापरला जातो. क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड वगैरे द्वारे पेमेंट करण्याची गरज उरत नाही. ज्याला जे सोयीचे असते त्या मार्गाने किंमत चुकवता येते. भारतात क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड, इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर, इंटरनेट वगैरे वापरण्याचे प्रमाण कमी असल्यामुळे कॅश ऑन डिलिव्हरीचा पर्याय जास्त सोपा व सरळ ठरतो. ॲमेझॉनच्या पान पान भर जाहिराती सध्या भारतीय वृत्तपत्रात झळकू लागल्या आहेत. त्यात किंडलची किंमत ४९९९रु. पर्यंत खाली आली आणि 'किंडल पेपर व्हाइट' या मॉडेलची किंमत ११००० ऐवजी ८९९९ रुपये झालेली आहे. यामध्ये पन्नास हजार पुस्तके मोफत वाचता येतील आणि ११०० पुस्तके ही

सवलतीत वाचता येतील असे जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे वाचन संस्कृतीला मोठ्या प्रमाणावर चालना मिळेल. शाळकरी मुलांनाही आपल्या टॅब्लेटवर आपल्याला हवी ती पुस्तके ॲमेझॉनकडून वाचायला मिळू शकतील.

ॲमेझॉन मराठी व इतर प्रादेशिक भाषांतील पुस्तकांसाठीही आपले व्यासपीठ मुक्तपणे वापरू देईल अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही
बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी www.wordpowerbookshop@gmail.com येथे संपर्क साधा.

२री आवृत्ती

युथनेशिया



लेखिका
स्वाती चांदोरकर

किंमत - २२०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावक:।
न चैनं क्लेद्यन्त्यापो न शोषयति मारूत:।।
असं जरी असलं तरीही
'मृत्यू'
म्हटलं की भय, दु:ख, वेदना काही टळत नाहीत.
जगण्यावरचं अपरंपार प्रेम, मोह सुटत नाही.
'आयुष्य नको आता' असं म्हणणारी माणसं जास्तीत जास्त काळ जगतात. हे असं चित्रं सर्वत्र दिसतं. विकलांग झालेली शरीरंही खितपत पडतात,
ती अंतर्मनातल्या जगण्याच्या हव्यासापोटीच.
नकोशी झालेली ही शरीरं त्रास, अपमान सहन करतात आणि मग अशांना शांत-चित्त मरण द्यावं अशा विचारांना प्राधान्य दिलं जातं...
आपणहूनच.
निर्णय घेतला जातो...
मुक्ती दिली जाते...
दयामरण...
युथनेशिया...

तस्लिमा नसरीन अमेरिकेत वास्तव्यास

बांगलादेशातील इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी जीवे मारण्याची धमकी दिल्यानंतर वादग्रस्त लेखिका तस्लिमा नसरीन भारतातून अमेरिकेला गेल्या आहेत. बांगलादेशात फेब्रुवारीपासून मूलतत्त्ववाद्यांनी तीन धर्मनिरपेक्ष ब्लॉगरची हत्या केली. त्या पार्श्वभूमीवर तस्लिमा नसरीन यांनी अमेरिकेत जाण्याचा निर्णय घेतला आहे.

'अल कायदाशी संबंधित इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी अविजित रॉय, वशिकुर रेहमान आणि आनंदबिजॉय दास या ब्लॉगरच्या हत्येची जबाबदारी घेतली होती. याच मूलतत्त्ववाद्यांनी तस्लिमा नसरीन यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती, असे न्यूयॉर्क येथील 'सेंटर फॉर इन्क्वायरी' या समर्थक गटाने दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

'जीवाला गंभीर धोका असल्याने तस्लिमा नसरीन यांनी भारत सोडण्याचा निर्णय घेतला आहे. जीव वाचविण्यासाठी त्यांना अनिश्चित काळासाठी अमेरिकेत राहण्याची आवश्यकता आहे. अमेरिकेत त्यांना सध्या नोकरी किंवा घर नाही,' असे 'सेंटर फॉर इन्क्वायरी' गटाचे अध्यक्ष आणि सीईओ रोनाल्ड ए. लिंडसे यांनी म्हटले आहे.

इस्लामी मूलतत्त्ववादी संघटनांनी धमकावल्यानंतर १९९४ पासून तस्लिमा नसरीन बांगलादेशाबाहेर राहत आहेत. त्या सध्या स्वीडनच्या नागरिक असून त्यांना २००४ पासून नियमितपणे भारताचा व्हिसा मिळत आला आहे. कोलकाता येथे कायमस्वरूपी राहण्याची इच्छा त्यांनी अनेक वेळा व्यक्त केली आहे.

डी एस के - चरित्राचे प्रकाशन

'आठवीत असताना पेपरची लाइन टाकून मिळालेल्या ऐंशी रुपयांच्या

चिल्लरने आपण जगात सर्वांत श्रीमंत माणूस आहोत असे वाटले होते. आज सहा हजार कोटींची उलाढाल होत असतानाही ते ऐंशी रुपये जास्तच मोठे वाटतात.' अशी भावना ज्येष्ठ उद्योजक डी. एस. कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

प्रा. श्याम भुर्के यांनी लिहिलेल्या 'शून्यातून विश्व निर्माण करणारे डीएसके' या पुस्तकाचे प्रकाशन सिम्बायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार यांच्या हस्ते झाले. प्रकाशनानंतर ज्येष्ठ निवेदक सुधीर गाडगीळ यांनी कुलकर्णी यांच्याशी संवाद साधला. प्रकाशक सुधाकर जोशी, विजय कुवळेकर या वेळी उपस्थित होते. अरुण नूलकर यांनी सूत्रसंचालन केले.

'किर्लोस्करांच्या सूचनेवरून टाय बांधू लागलो. नंतर मध्यमवर्गीय ग्राहक डोळ्यांसमोर ठेवून तोच वेश कायम केला. आजही मी कामाशिवाय राहू शकत नाही. व्यवसाय कोणताही असला तरी ग्राहक कोण हे समजून घेतले पाहिजे. यशस्वी उद्योजक होण्यासाठी चांगल्या अर्थाने संधिसाधू व्हायला शिकले पाहिजे. आचार्य अत्रे यांच्यासारख्यांची भाषणे ऐकल्याने संवाद कला जमली. आता मी ब्रेक नसलेल्या गाडीत बसलो आहे. त्यामुळे कुठे थांबायचे हे कळत नाही. अजून खूप करायचे आहे. आत्मचरित्र लिहिण्यासाठी निवृत्त व्हायचे का असा प्रश्न पडतो,' असेही कुलकर्णी यांनी सांगितले.

''डीएसकेंचे वर्णन 'ड्रीमर' असेच करावे लागेल. भव्य काही करण्यासाठी स्वप्ने पाहिली पाहिजेत. डीएसके एकाच आयुष्यात अनेक आयुष्य जगले. त्यांनी कामात कधीच भेदभाव केला नाही. असमाधान हे उद्योजकाचे स्फूर्तिस्थान असते. डीएसकेंचे व्यक्तिमत्त्व तरुणांसाठी प्रेरणादायी आहे,'' असे मुजुमदार म्हणाले.

'गांधी' कवितेवरचा खटला

कवी वसंत दत्तात्रय गुर्जर यांच्या 'गांधी मला भेटला' या कवितेवरील खटल्यातून सुप्रीम कोर्टाने ही कविता प्रसिद्ध करणारे 'बुलेटिन' या द्वैमासिकाचे प्रकाशक-संपादकद्वय धनंजय कुलकर्णी व देवीदास तुळजापूरकर यांना विनाशर्त मुक्त केले आहे. याबद्दल त्यांनी २० वर्षांपूर्वीच माफी मागितलेली होती. मात्र, या कवितेतून गांधीजींची बदनामी झालेली नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी कवीवरच आहे, असे सांगून हा खटला

लातूर सेशन्स कोर्टाकडे वर्ग केला आहे.

१९८४ साली प्रास प्रकाशनने छापलेल्या 'गांधी मला भेटला' या पोस्टर पोएट्रीची साहित्यवर्तुळात प्रचंड चर्चा झाली होती. ही कविता त्यानंतर दहा वर्षांनी बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉइज युनियनच्या 'बुलेटिन' या मुखपत्रात कुलकर्णी व तुळजापूरकर यांनी गांधी जयंतीच्या निमित्ताने पुन्हा प्रसिद्ध केली. मात्र, त्यानंतरच्या 'बुलेटिन'च्या पुढच्याच अंकात त्यांनी, या कवितेने कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर आम्ही माफी मागतो आणि गांधीजींच्या बाबतची आमची भूमिका ही दि.के. बेडेकर यांच्या लेखातल्या प्रमाणेच आहे,' अशी स्वच्छ शब्दात दिलगिरी व्यक्त केली होती.

त्यानंतर दोन महिन्यांनी जानेवारी १९९५ मध्ये पतित पावन संघटनेने राष्ट्रपित्याची बदनामी केल्याचा आरोप ठेवून कवी, संपादक व प्रकाशक यांच्यावर गुन्हा दाखल केला होता. यातील असभ्यता आणि अश्लीलतेचे कलम तसेच ठेवून लातूर स्पेशन्स कोर्टाने उर्वरित दोन कलमे रद्द केली होती. उरलेले कलमही काढण्यात यावे याकरिता संपादक-प्रकाशकांनी हायकोर्टात धाव घेतली होती. मात्र हायकोर्टाने ही याचिका फेटाळली.

सुप्रीम कोर्टात न्या. दीपक मिश्रा व प्रफुल्ल पंत यांच्यापुढे तीन महिने चाललेल्या खटल्यात प्रकाशकांच्या बाजूने ॲड. गोपाल सुब्रमण्यम यांनी; तर 'ॲमॅकस क्युरी' म्हणून फली नरिमन यांनी काम पाहिले. ॲड. गोपाल सुब्रम्हण्यम यांच्या जोरदार प्रतिवादानंतर कोटाने निकाल दिला.

मालगुंड होणार 'पुस्तकांचे गाव'

निसर्गरम्य समुद्रकिनाऱ्यांनी पर्यटकांना कोकण आकर्षित करत असताना साहित्यप्रेमींचाही वावर वाढणार आहे. राज्य सरकारच्या वतीने आद्यकवी केशवसुत यांचे मालगुंड हे जन्मगाव 'पुस्तकांचे गाव' म्हणून विकसित करण्यात येणार आहे. कोकण मराठी साहित्य परिषदेकडे (कोमसाप) हे गाव वसवण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

मराठी भाषा संवर्धनाचा अनोखा प्रयोग म्हणून पाच लाख पुस्तके असलेले पुस्तकांचे एक गाव महाबळेश्वर किंवा गणपतीपुळेनजीक उभारण्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांनी केली होती. मात्र, केवळ कल्पनाच मांडून न थांबता तावडे यांनी ती मूर्त स्वरूपात आणण्याचीही कार्यवाही सुरू केली आहे. हे पुस्तकांचे गाव उभारण्यासाठी

आद्यकवी केशवसुत यांच्या जन्मगावाची निवड करण्यात आली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे जवळ असलेल्या मालगुंड येथे हे गाव साकारणार आहे.

कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांनी या पुस्तकांच्या गावाविषयीची माहिती दिली. 'मालगुंड या गावाला केशवसुतांमुळे आधीच वलय आहे. आता पुस्तकांचे गाव करण्याच्या कल्पनेमुळे या गावाचे महत्त्व अजून वाढणार आहे. पुस्तकांचे गाव वसवण्याचे काम तावडे यांनी कोमसापला दिले आहे. ग्रंथ ठेवण्यासाठीची रचना, देखभाल कोमसाप करेल. गावात असलेल्या केशवसुत यांच्या स्मारकात सुमारे वीस जणांचा स्टाफ आहे. तसेच, रंगमंच, काही हजार पुस्तकांचे सुसज्ज ग्रंथालय, काव्यदालन अशी पायाभूत व्यवस्थाही असल्याने पुस्तकांचे गाव साकारण्यास वेग येईल,' असे कर्णिक यांनी सांगितले.

अकराशे बेटे आणि तीनशे दीपगृहे

'देशाच्या सागरी भागात सुमारे अकराशे बेटे आणि तीनशे दीपगृहे विकसित करण्याच्या योजनेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लक्ष घातले आहे. त्यातून समुद्रातील पायाभूत सुविधा विकसित करण्यासोबतच पर्यटनाला चालना देण्याचा उद्देश आहे,' अशी माहिती परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

'देशातील १०१ नद्यांचे जलमार्गात रूपांतर करण्यासाठी केंद्र सरकार संसदेची परवानगी मागणार आहे. येत्या दोन-तीन वर्षांत हे जलमार्ग विकसित करण्यासाठी सुमारे ५० हजार कोटी रुपये खर्च करण्याचे नियोजन आहे,' असे गडकरी यांनी सांगितले. 'जलमार्गासंदर्भात पाठवलेल्या कॅबिनेट नोटमध्ये समुद्रात तीनशे दीपगृहे आणि अकराशे बेटे विकसित करण्याच्या प्रस्तावाचा समावेश करावा, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले,' अशी माहिती 'देशांतर्गत जलमार्ग' या विषयावर 'फिक्की'ने आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेत गडकरी यांनी दिली.

खासगी सार्वजनिक भागीदारी तत्त्वावर (पीपीपी) जलमार्ग विकसित करण्याचे सरकारचे नियोजन आहे. १०१ नद्यांचे जलमार्गात रूपांतर करण्याच्या योजनेपैकी १६ जलमार्गांचे तपशीलवार प्रकल्प अहवाल या

महिन्यात, तर इतर ४० जलमार्गांचे अहवाल डिसेंबरपर्यंत पूर्ण होतील. सध्या अस्तित्वात असलेल्या पाच जलमार्गांपैकी फक्त तीन जलमार्गच विकसित आहेत. इतर दोन मार्ग विकसित करण्याचे प्रयत्न झालेले नाहीत. वाराणसी ते हल्दिया या १६२० किलोमीटरच्या मार्गावर वाराणसी, हल्दिया, साहेबगंज आणि कोलकाता येथे 'मल्टिमॉडेल हब' विकसित केली जाणार आहेत. त्यासाठी भूसंपादन सुरू आहे,' अशी माहिती नितीन गडकरी यांनी दिली. आसाम, अंदमान आणि निकोबार, गुजरातमधील कांडला येथे जहाजबांधणी, तसेच दुरुस्तीचे प्रकल्प सुरू करण्याचे प्रस्तावित आहे.

कॉमन मॅन पुस्तकरूपात

दिवंगत व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांचा 'कॉमन मॅन' आता पुस्तकरूपाने मराठी वाचकांच्या भेटीला येत आहे. लक्ष्मण यांचा 'यू सेड इट' हा इंग्रजी व्यंगचित्रांचा संग्रह अनुवादाच्या माध्यमातून सात पुस्तकांच्या संचात लवकरच पुस्तकरूपाने मेहता पब्लिशिंग हाऊसच्या वतीने प्रकाशित होत आहे.

अविनाश भोमे यांनी हा अनुवाद केला आहे. आरकेंची 'यू सेड इट' ही व्यंगचित्रमालिका बरीच गाजली होती. नंतर ती पुस्तक रूपाने इंग्रजीतही प्रकाशित झाली. आता 'कसं बोललात' या नावाने हा सात पुस्तकांचा संच मराठीमध्ये येत आहे. यात लक्ष्मण यांनी १९८०च्या दशकात चितारलेली व्यंगचित्रे, लेख यांचा समावेश आहे.

प्रकाशक सुनील मेहता यांनी याविषयी माहिती दिली. 'आरकेंची व्यंगचित्रे व लेखन हे ८०च्या दशकातील असले तरी आजही समकालीन वाटते. त्यांची स्मृती चिरंतन ठेवण्यासाठी अनुवाद रूपाने पुस्तक करण्याचे ठरवले. वाचकांना आरकेंनी चितारलेला 'कॉमन मॅन' परिचयाचा आहे. मात्र, त्यांनी सामाजिक परिस्थितीवर केलेले भाष्यही तितकेच महत्त्वाचे आहे. यापूर्वी हे लेखन इंग्रजीत प्रकाशित झाले होते. त्यानंतर ते मराठीत होत आहे. आरकेंचे बहुतांश साहित्य हे इंग्रजी भाषेत आहे. त्यापैकी आतापर्यंत मराठीमध्ये आरकेंचे 'लक्ष्मणरेषा' हे आत्मचरित्र प्रकाशित झाले आहे. त्यानंतर 'कसं बोललात' हा चित्रमालिकेचा संच मराठीत येत आहे. या मालिकेतून आरकेंचा वेगळा पैलू वाचकांपुढे प्रकट होईल.

विश्वविक्रमी ६० तासांचे भाषण

छत्तीसगडच्या कोरबा जिल्ह्यातील मराठमोळ्या डॉक्टरने ६० तास ३० मिनिटे भाषण करून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. डॉ. अजय शेष यांनी अमेरिकेच्या झॅक झेहन्डर यांचा ५३ तास १८ मिनिटांच्या भाषणाचा विक्रम मोडून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये स्थान मिळवले.

डॉ. शेष यांनी या आधी ४९ तास ३९ मिनिटे भाषण देण्याचा विक्रम केला होता. त्यानंतर त्यांनी ५३ तासांचा विक्रम मोडण्याचे लक्ष्य नजरेसमोर ठेवले होते. त्यासाठी त्यांनी वर्षभर सराव केला. दिवसाला १२ तास भाषण देऊन त्यांनी शारीरिक क्षमता वाढवली. ध्यान, योगसाधना यांच्या आधारे झोप आणि थकव्यावर मात करण्याचा प्रयत्न करून सलग ६० तास भाषण देण्याचे ध्येय गाठले.

समाजातले नकारात्मक विचार व नैराश्य दूर करून सकारात्मकता रुजवण्यासाठी हा प्रयत्न केल्याचे डॉ. शेष यांनी सांगितले.

टागोरांची साहित्यसंपदा ऑनलाइन

संपूर्ण जगाला भुरळ घालणारे साहित्यनिर्माते महाकवी रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्यकृती आता ऑनलाइनदेखील वाचता येतील.

अँड्राइड मोबाईलधारकांना वैशिष्ट्यपूर्ण 'ॲप'च्या माध्यमातून त्यांचे वाचन करता येणार आहे. पश्चिम बंगाल सरकारच्या माहिती तंत्रज्ञान विभागांतर्गत काम करणाऱ्या 'सोसायटी फॉर नॅचरल लँग्वेज टेक्नॉलॉजी रिसर्च' (एसएनएलटी) या संस्थेने यासाठी वेगळ्या 'ॲप'ची निर्मिती केली आहे. पश्चिम बंगाल सरकारने २००७ मध्ये या संस्थेची स्थापना केली होती. हे अनोखे ॲप्लिकेशन युजर्सना थेट या संकेतस्थळाशी कनेक्ट करेल. या संकेतस्थळावर बंगाली साहित्यापासून ते संगीतापर्यंतच्या अनेक गोष्टींचा समावेश असेल.

आरोही संगीत अकादमीचे उद्‌घाटन

'भारतीय अभिजात संगीत चार गोष्टींनी बांधले गेले आहे. शास्त्र, तंत्र, विद्या आणि कला या त्या चार गोष्टी होत. कोणत्याही कलाकाराची वैयक्तिक अभिव्यक्ती म्हणजे कला. कलेची साधना आणि रियाज यामध्ये खूप फरक आहे. रियाज हा उद्दिष्टप्राप्तीसाठी केला जातो, तर साधना ही कधीच पूर्ण

होत नाही. साधनेचा प्रवास अखंड सुरू असतो,' अशा समर्पक शब्दांत तालयोगी पं. सुरेश तळवलकर यांनी 'आरोही संगीत ॲकॅडमी'च्या उद्‌घाटनप्रसंगी मार्गदर्शन केले. या वेळी गायक पं. विकास कशाळकर, ललित कला केंद्राच्या प्रमुख डॉ. शुभांगी बहुलीकर, नगरसेवक शाम देशपांडे, तबलावादक पांडुरंग मुखडे उपस्थित होते. वैयक्तिक आणि सामाजिक कलेचे महत्त्वही पं. तळवलकर यांनी या वेळी विशद केले.

उद्‌घाटनानंतर शास्त्रीय-उपशास्त्रीय आणि फ्युजन संगीताचा उपस्थितांनी आस्वाद घेतला. पहिल्यांदा अमानो मनीष (स्लाइड गिटार), सस्मित रुद्र (की-बोर्ड) यांनी फ्युजन सादरीकरण केले. त्यांना विवेक भालेराव यांनी तबल्याची साथ केली. किरवाणी आणि शिवरंजनी या रागांचे फ्युजन सादर करून त्यांनी वाहवा मिळवली.

त्यानंतर ॲकॅडमीच्या संचालिका गायिका संपदा विपट यांनी नंद रागात पारंपरिक बंदिश सादर केली. द्रुत एकतालातील 'आजा रे बालमवा' ही बंदिश आणि 'सैय्या रूठ गये' हा मिश्र पहाडी दादराही भाव खाऊन गेला. 'मी आहे श्रीनिधी' या नामावरच्या रचनेने त्यांनी आपल्या मैफलीचा समारोप केला. पं. कशाळकर यांनी सुरुवातीला राग पूरिया सादर केल्यानंतर प्रदीपकी रागात आग्रा घराण्याची वैशिष्ट्ये पेश केली. राग 'चंद्रकंस'मधली 'धनधन मंगल पायो' ही त्यांनी सादर केलेली बंदिशही रसिकांची दाद मिळवणारी ठरली.

ब्लॉग रायटिंग

फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲपच्या जमान्यात 'ब्लॉग रायटिंग' मागे पडण्याची शक्यता असताना प्रत्यक्षात वेगळेच चित्र दिसत आहे. ऑनलाइन प्रदीर्घ लेखन करण्याचे नवे माध्यम म्हणून 'ब्लॉग रायटिंग' पुन्हा नव्याने समोर येत आहे.

व्हॉट्सॲपच्या जमान्यात आपल्याला दररोज अनेक मेसेजेस येत असतात. त्यामध्ये कधी कधी प्रदीर्घ लेखही फॉरवर्ड केले जातात. हे लेख येतात कुठून, एवढे मोठे लेख लिहितात कोण असे प्रश्न पडतात. तर हे जे लेखक असतात ते बहुतेकवेळा 'ब्लॉगर्स' असतात. ऑनलाइन माध्यमांत ब्लॉगवर लेखन करणाऱ्यांना 'ब्लॉगर्स' म्हणतात. गुगल, वर्डप्रेससारख्या माध्यमातून आपल्याला हव्या त्या विषयावर अभिव्यक्त होण्यासाठी ब्लॉग हे

प्रभावी माध्यम आहे. जी-मेलचा ई-मेल आयडी वापरून आपण गुगलच्या 'ब्लॉगर' सेवेद्वारे स्वत:चा ब्लॉग सुरू करू शकतो. एका ई-मेलवरून आपण अनेक ब्लॉग तयार करू शकतो.

ब्लॉगिंगची सेवा नि:शुल्क उपलब्ध आहे. याशिवाय ब्लॉगला भेट देणाऱ्या 'व्हिजिटर्स'च्या संख्येवरून जाहिरातीही मिळू शकतात. गुगल ॲड्सच्या माध्यमातून मिळणाऱ्या जाहिरातीतून उत्पन्नही उपलब्ध होऊ शकते. मराठी भाषेत ही पद्धत अद्याप फारशी प्रचलित नाही. मात्र पाश्चिमात्त्य देशात ब्लॉगिंग हा मोठा व्यवसाय झाला आहे.

मराठीमधील ब्लॉग्ज्वर दर्जेदार साहित्य प्रकाशित होत राहते. प्रसार आणि प्रचाराअभावी 'मराठी ब्लॉगर' अद्यापही काही अंशी दुर्लक्षितच आहे. मात्र, अलिकडच्या काळात राजकीय विषयांवर काहीतरी खळबळजनक लिहिणारे ब्लॉगर अल्पावधीतच लोकप्रिय होत आहेत. फेसबुक, ट्विटर वगैरे म्हणजे एक प्रकारचे ब्लॉगिंगच आहे. ते मायक्रोब्लॉगिंग प्रकारात मोडते. ब्लॉगची लोकप्रियता वाढली, तर आपण विहित शुल्क अदा करून आपल्या ब्लॉगला संकेतस्थळात परावर्तित करू शकतो.

जॉन बर्गर यांनी १९९० मध्ये वेबलॉग ही संकल्पना आणली. पुढे तीच ब्लॉग म्हणून नावारूपास आली. दररोज विशिष्ट व्हिजिटर्सचा आकडा गाठला की ब्लॉगला गुगल ॲड्स मिळतात. अधिकृत शासकीय ब्लॉग तयार करणारा इस्त्राईल हा पहिला देश आहे. पाश्चिमात्त्य देशात वैयक्तिक ब्लॉगिंग हा मोठा व्यवसाय आहे.

किणीकरांच्या रुबायांना दाद

रे तुटला पतंग, तुटला मांजा दोरा
अंधार उतरला, सुटला वादळ वारा
तो पहा फाटला पतंग खाऊन गोते
चिमुकले पीस बघ घरटे शोधीत होते

रॉय किणीकरांच्या साहित्य वैशिष्ट्यांचे आणि स्वभावाचे सशक्त दर्शन नुकतेच स्वरभूमी, पुणे निर्मित 'घरटे शोधणारे पीस' या कार्यक्रमातून घडले. रंगत संगत प्रतिष्ठान (काव्यविभाग) आणि लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजिण्यात आला होता. संगीत, कविता आणि अभिवाचन यांच्या आविष्कारातून ते योगेश तपस्वी, सुचित

हसबनीस, धनश्री गणात्रा आणि अभिजित यांनी किणीकरांना जिवंत केले. या कार्यक्रमाची संहिता अनिल किणीकर यांची होती.

किणीकरांच्या 'रात्र' आणि 'उत्तररात्र' या दोन काव्यसंग्रहातील निवडक रुबायांचे सादरीकरण करण्यात आले. धनश्री यांच्या प्रयोगशील संगीत रचनाही दाद मिळवणाऱ्या ठरल्या. सतार आणि व्हायोलिन वापरल्यानेही अप्रतिम परिणाम साधला गेला.

'ते स्वप्न कालचे ठेव तिथे पायाशी', 'ही रात्र आजची पुन्हा न भेटायाचे', 'घे शब्दकोश-ई-ईश्वर शोधून काढ' यांसारख्या गूढार्थ रचना धनश्री यांनी सादर केल्या. सुचित यांनी सादर केलेली 'या पाणवठ्यावर आले किती घट गेले' ही विशेष सुंदर ठरली. अभिजित यांच्या ओघवत्या शब्दांतून किणीकरांच्या वैयक्तिक आयुष्याचे दर्शन घडले. तपस्वी यांच्या भावुक पण कणखर आवाजातील 'हा देह तुझा; पण देहातील तू कोण' या गीताने कळस गाठला. 'संपली कथा जी कुणी ऐकिली नाही, संपली रात्र वेदना संपली नाही' यांसारख्या काव्यातून किणीकरांच्या संघर्षाचे आणि चिंतनाचे सार मनावर ठसते.

व्यंगचित्रांचे प्रदर्शन

ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांच्या व्यंगचित्रांचे प्रदर्शन पु. ना. गाडगीळ सन्स यांच्यातर्फे औंध येथील रिलायन्स मार्टजवळील आर्ट गॅलरीत भरवण्यात आले. त्यात ८० हून अधिक व्यंगचित्रे होती. वाहनाला असतात त्याप्रमाणे बैलांच्या शिंगाला बसवलेले आरसे, स्कूटरवरून जाताना साडीचा हवेत तरंगणारा पदर, दुचाकीसाठी रस्त्यावरून जाणारी बैलगाडी अन् त्यास अडवणारा पोलिस, नांगररूपी सँडल, खेळायला जागा नसल्याने कारचा उपयोग घसरगुंडी म्हणून करणारी मुले अशा विविध विषयांवर तेंडुलकरांनी व्यंगचित्रांमधून भाष्य केले आहे.

भारतीय विद्यार्थ्यांची बाजी

अमेरिकेतील 'नॅशनल जिऑग्राफिक बी' या स्पर्धेत अमेरिकास्थित न्यूजर्सी येथील करण मेनन या १४ वर्षीय भारतीय वंशाच्या विद्यार्थ्याने बाजी मारली. विशेष म्हणजे या स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकाचे विद्यार्थी हे भारतीय वंशाचे असल्याने भारताचा चष्मावर राहिला आहे.

शालेय विद्यार्थ्यांना जगाची भौगोलिक माहिती मिळावी, हा या स्पर्धेमागील उद्देश आहे. करणच्या या विजयाने जिऑग्राफिक बी आणि स्पेलिंग बी या स्पर्धांमधील पारितोषिक म्हणून करणला यासाठी ८५ हजार डॉलरची स्कॉलरशिप, नॅशनल जिऑग्राफिक सोसायटीचे कायमस्वरूपी सदस्यत्व, गालापागोस बेटावर (दक्षिण अमेरिकेतील प्रशांत महासागरातील बेट) जहाजातून भ्रमंती करता येणार आहे.

द्वितीय क्रमांक – श्रिया यालांगड्डा (वय११) २५ हजार डॉलर, तृतीय पारितोषिक – सोजस वागळे (वय १३) १० हजार डॉलर

कपिल नाथन, निकोला मोनाहन, पॅट्रिक टायलर, अभिनव कार्तिकेय, लुसी चाए, श्रेयस वर्तन, तेजस बडगुजर या अंतिम स्पर्धेतील सात स्पर्धकांना प्रत्येकी ५०० डॉलरची पारितोषिके देण्यात आली.

आता विंडोज अपग्रेड

विंडोज १० या ऑपरेटिंग सिस्टीमला अपग्रेड करण्याची सुविधा मायक्रोसॉफ्टने २९ जूनपासून भारतासह १९० देशांमध्ये उपलब्ध करून दिली आहे. मात्र त्यासाठी तुमच्या कम्प्युटरमध्ये विंडोज ७, ८, किंवा ८.१ असणे गरजेचे आहे.

विंडोज १० ही सिस्टीम टच फ्रेंडली असणार आहे. सध्याचे विंडोज ७ आणि विंडोज ८.१ वापरणाऱ्यांनाही मोफत अपग्रेडेशनचा पर्याय उपलब्ध आहे. या ऑपरेटिंग सिस्टीमच्या अधिकृत व्हर्जन असणाऱ्यांना विंडोज १० मोफत मिळणार आहे. पायरेटेड व्हर्जन वापरणाऱ्यांना पैसे मोजावे लागतील. डिव्हाइस अपग्रेडसाठी एक जी हर्टचा प्रोसेसर, १ जीबी रॅम, १६ जीबी हार्ड डिस्क, डायरेक्ट एक्स ९ ग्राफिक्स कार्ड, १०२४ बाय ६०० चा डिस्प्ले आवश्यक आहे. विंडोज १० ची साईज १० जीबी आहे. त्यामुळे तुमच्या डिव्हाइसमध्ये किमान तेवढी जागा मोकळी असणे गरजेचे आहे. अपग्रेडेशन फाइल डाऊनलोड झाल्यावर इन्स्टॉल होण्यासाठी २० मिनिटे लागतात. विंडोज १० मध्ये काही नवी फीचर्स आली आहेत. यात विंडोज एज ब्राऊजर, चेहरा ओळखणे, बोटाच्या ठशांद्वारे लॉगीन यांसह फोटो, नकाशे, मेल, कॅलेंडर आदींसाठी विविध विंडोज ॲप्सही आहेत. कमर्शिअल वापरासाठी विंडोजची प्रो एडिशनही उपलब्ध होईल.

'सोशल नेटवर्किंग' शोषणाचे माध्यम

गेल्या दीड-दोन वर्षांत सोशल नेटवर्किंग साइट्सचा सुळसुळाट झालाय. त्यामुळे एकमेकांशी संपर्क ठेवणे सोपे झालेय. तरी त्याचा गैरवापरही वाढत चालल्याचे आता लक्षात येतेय. माहितीच्या महास्फोटाच्या काळात त्यातले धोकेही जाणवू लागलेत. त्यातलाच शोषण हा एक मोठा धोका आहे. विशेषत: हे लैंगिक शोषणाचंही माध्यम बनत चालले आहे. सर्वसाधारणपणे १० ते १८ वर्षे वयोगटात हे प्रकार अधिक दिसतात.

''तात्कालिक आकर्षण, प्रेमभंग, घरच्यांचे दुर्लक्ष, भावनिक गुंतागुंत, या कारणांनी पौगंडावस्थेतील मुलामुलींना सोशल नेटवर्किंगचा आधार वाटत राहतो. त्यामुळे ऑनलाइन फ्रेंडशिप आणि नंतर त्याचे दुष्परिणाम असं त्याचं स्वरूप बनत चालल्याचं दिसतंय,'' असं सांगून स्टेप अप फाउंडेशनच्या समुपदेशक गौर वेद म्हणाल्या, ''वय वर्ष १३ ते १७ मधील ज्यांना समुपदेशनाची गरज वाटली, त्यापैकी किमान ६० टक्के मुलामुलींना अशा स्वरूपाचा त्रास झाल्याचे दिसते. स्वत:चे आक्षेपार्ह फोटो शेअर करणे, ते चुकून पाठवलं गेल्याचा कांगावा करणे आणि नंतर त्रास झाल्याचे सांगत, ती चूक मान्य करणे, असे समुपदेशनात समोर येते.''

माहितीची देवाणघेवाण हल्ली सर्रास होते. त्यात शालेय मुलं-मुलीही मागे नाहीत. सगळेच तसे नसतात किंवा अनेकांची हिंमतही होत नाही; पण काहीजण या प्रकाराला बळी पडतात, त्यामध्ये एखाद्या फोटोवरून जीवघेणी चेष्टा होते तसंच ब्लॅकमेलही केलं जातं. हे फक्त शाळेतल्या मित्र-मैत्रिणींकडूनच होतं असं नाही, तर काही प्रौढही मुला-मुलींना नेटवर्किंग साइट्स दाखवून त्यांच्यावर अत्याचार करतात. त्यात बहुतांशी ओळखीचेच लोक किंवा नातेवाईक असल्याचं लक्षात आलंय.

समुपदेशक सहस्त्रबुद्धे म्हणाल्या, ''हे प्रकार गेल्या काही काळात द्रुत गतीनं वाढत असल्याचे आढळते. आम्ही अनेकदा समुपदेशनाच्या निमित्तानं मुलींशी बोलतो, तेव्हा न्यूड सेल्फीपाठोपाठ संबंधित मुलानं अनेक 'भलत्या' मागण्या केल्याचे अनुभव त्या सांगतात. एकदा अशी मागणी पूर्ण झाली की मग जवळच्या मित्रांचीही मागणी पूर्ण करावी यासाठी धमकावलं जातं. जिवाची भीती तर असतेच; पण काही वेळा असे आक्षेपार्ह फोटो सोशल नेटवर्किंग साइट्सवर टाकून बदनामीचीही धमकी दिली जाते. त्यावर मुलींबरोबरच मुलांचेही समुपदेशन हा मार्ग आहे. आम्ही तसा प्रयत्न त्या त्या

ठिकाणी करतो; पण प्रत्येकाची तक्रार वेगवेगळी असते. त्यामुळे त्या-त्या पद्धतीने बोलावे लागते. पण एकूण विचार करता, ही संख्या वाढत चालल्याचे लक्षात येतेय.''

ज्ञानदेवी चाइल्डलाइनकडे सोशल नेटवर्किंगमुळे होणाऱ्या त्रासाबद्दल सांगणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. बाललैंगिक शोषणविरोधात २०१२ मध्ये नवीन कायदा झाला. ''फक्त शोषणच नव्हे, तर इतरही अनेक गुन्हे अशा वेळी घडत असतात. त्यामुळे कायद्यात असलेल्या अधिकाधिक कलमांचा आधार घेतला तर कठोर शिक्षा होऊ शकेल आणि अशा शोषणाला पायबंद बसेल.''

फोटोंचे 'गुगल'विश्व खुले

सोशल नेटवर्किंग माध्यमातून आपले फोटो, व्हिडिओ शेअर करण्याचा ट्रेंड आहे. मात्र, इतक्या संख्येने काढले जाणारे, शेअर केले जाणारे फोटो साठवण्याचा आणि ते लगेच शेअर करण्यासाठी उपलब्ध होण्याचा प्रश्न जटिल असतो. ही अडचण आता गुगलने दूर केली आहे. फोटो, व्हिडिओ शेअर करणे गुगलने सोपे केले आहे. या सर्व गोष्टी 'गुगल फोटो' या सेवेद्वारे तुमच्या जी-मेल अकाउंटशी लिंक असलेल्या क्लाउडवर साठवून ठेवू शकता. त्यामुळे कोणत्याही गॅझेटवरून एका छोट्या लिंकद्वारे ते इतरांसोबत शेअर करता येतील. गुगल फोटो या सुविधेमध्ये १६ मेगापिक्सलपर्यंतचे फोटो आणि १०८०पी अर्थात फुल एचडी क्षमतेचे व्हिडिओ साठवून ठेवता येतील.

यापेक्षा अधिक क्षमतेचे व्हिडिओफोटो असतील तर त्यांचे रिझोल्यूशन कमी करून गुगल सेव्ह करून ठेवेल. हे सर्व क्लाउडवर सेव्ह होणार असल्याने मोबाइल, कम्प्यूटरमधील मेमरी वापरली जाणार नाही. याअंतर्गत अमर्याद फोटो व्हिडिओ साठवून ठेवू शकाल. १८ मेगापिक्सल किंवा १०८० पी पेक्षा अधिक दर्जेदार व्हिडिओफोटो साठवून ठेवायचा असेल तर गुगलच्या जुन्या सेवेमधील १५ जीबीची जागा वापरता येईल. त्यासाठी 'ओरिजिनल' किंवा 'हायक्वालिटी' प्लॅन घ्यावा लागेल.

फोटोचा प्रकार, त्यातील व्यक्ती व ठिकाणे यांचा विचार करून गुगल फोटो त्यांचे स्वत:हून वर्गीकरण करील. मुलांचे फोटो, पाळीव प्राण्यांचे फोटो असे वर्गीकरण तुम्ही करण्याची गरज राहणार नाही. हे फोटो सर्च

करणेही सोपे असून फोटोतील तुमच्या लक्षात असलेली गोष्ट सांगून तुम्ही सर्च केले की लगेच तशा प्रकारचे फोटो तुमच्यासमोर हजर होतील. यामध्ये फोटोचे बेसिक एडिटिंग करता येते.

फोटो नेमका कसा आणि कोठे एडिट करायचा हे तर तुम्हाला माहिती नसेल तर 'ऑटो फिक्स'चा पर्याय असून याद्वारे एडिट केलेला फोटो अधिक चांगला दिसेल असा प्रयत्न करते. यामध्ये कोलाज, पॅनोरमा, ॲनिमेटेड फाइल तयार करण्याचाही पर्याय आहे.

मोबाइल, कम्प्युटर, टॅबवरून https://photos.google.com/ ही लिंक ओपन केल्यावर तुम्हाला या सेवेचा लाभ घेता येईल. किंवा गुगल प्ले स्टोअरमधून नावाचे ॲपही डाउनलोड करून तुम्ही ही सुविधा वापरू शकता.

अशाच प्रकारची सेवा ॲपलच्या डिव्हाइसवर उपलब्ध आहे. मात्र फोटो साठवण्याची मर्यादित क्षमताच त्यात आहे. फ्लिकरमध्ये एक टीबीपर्यंतचे फोटो साठवता येतात. ॲमेझॉन अशाच प्रकारची अमर्याद साठवणूक क्षमता असलेली सेवा देते. मात्र त्यात व्हिडिओ साठवून ठेवता येत नाहीत.

गुगल होणार अधिक 'प्रायव्हेट'

जगभरातील सर्वांत लोकप्रिय सर्च इंजिन आणि अग्रगण्य ई-मेल वेबसाइट गुगल युजर्सच्या खासगी माहितीचा वापर व्यावसायिक कारणांसाठी करत असल्याचे आरोप काही काळ होत होते. माहिती शोधण्याच्या व साठवण्याच्या गुगलच्या पद्धती याविषयी युजर्सना चिंता वाटते. त्या पार्श्वभूमीवर गुगलने एक जूनपासून प्रायव्हसी सेटिंग्जमध्ये बदल केले असून युजर्सना नव्या प्रायव्हसी सेटिंग्जमध्ये अधिक अधिकार प्रदान केले आहेत.

आता युजर्सना महिना, वर्ष इत्यादी विशिष्ट कालावधीसाठी सेटिंग्ज निश्चित करता येऊ शकतात. त्याचप्रमाणे वेब ब्राउजर, लोकेशन हिस्ट्री इत्यादी ठिकाणी माहिती सेव्ह करतानाही युजरना अधिक संधी मिळेल. हीच माहिती जाहिरातदारांकडून वापरली जाते. तथापि ही कंट्रोल्स प्रस्थापित करण्यासाठी युजर्सना थोडा वेळ आवश्यक आहे. कारण हे सेटिंग्ज वेबसाइटवर अनेक ठिकाणी विखुरलेले दिसतात. माय अकाउंटमध्ये गेल्यास प्रायव्हसी चेकअप व सिक्युरिटी चेकअप हे दोन पर्याय युजरना उपलब्ध

होतील. यामध्ये कोणती माहिती जाहीर व कोणती माहिती खासगी हे ठरवण्याची मुभा युजरना आहे.

माहितीच्या वापराबाबतच्या सामान्य प्रश्नांची यादी गुगलने तयार केली आहे. त्यामुळे युजरची कोणती माहिती गुगलकडून जाहिरातदारांना पुरवण्यात येते याचे गुगलकडूनच उत्तर मिळणार आहे. प्रायव्हसी आणि सिक्युरिटी सेटिंग्ज यामध्ये काहीतरी गूढअसल्याचा समज युजर्समध्ये पसरला होता. त्यामुळे आम्ही त्याचे सुलभीकरण केले आहे असे गुगलचे अकाउंट नियंत्रण व्यवस्थापक गेमी किम यांनी सांगितले. दैनंदिन व्यवहार इंटरनेटच्या माध्यमातून करण्याचे प्रमाण वाढल्यानंतर आपल्या माहितीवरील नियंत्रण हे युजरसाठी अत्यंत आवश्यक बनले आहे. २०१३ मध्ये एडवर्ड स्नोडेनने अमेरिकन सुरक्षा संस्थांकडून युजरच्या गुगल, फेसबुकवरील माहितीचा वापर केला जात असल्याचे सिद्ध केले होते. नुकत्याच घेण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार केवळ ९ टक्के इंटरनेट युजरना आपली माहिती सुरक्षित असल्याचे वाटते. यामुळे गुगलने युजरना दिलेले हे अधिकार महत्त्वाचे आहेत.

सेन्सॉर बोर्ड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय चित्रपट परिनिरीक्षण महामंडळाची (सीबीएफसी) cbfcindia.gov.in ही अधिकृत वेबसाइट आहे. चित्रपटांना मान्यता देण्यासंदर्भातील कायदे, त्यातील सुधारणा, चित्रपटांचे वर्गीकरण करण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे, चित्रपट प्रमाणपत्रांची प्रक्रिया इत्यादी माहिती सविस्तररित्या या वेबसाईटवर देण्यात आली आहे. सीबीएफसीची कार्यालयीन संरचना, कार्यपद्धती, उपमंडळे इत्यादीविषयीही वेबसाइटवर माहिती मिळते. सेन्सॉर सर्टिफिकेटसाठी करावा लागणारा ऑनलाइन अर्जही वेबसाइटवरून डाउनलोड करता येतो.

सोलापूरला बालनाट्य साहित्य संमेलन

बालरंगभूमीवर पुन्हा उत्साहाचे वातावरण निर्माण करण्यासाठी यंदापासून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने बालनाट्य संमेलनाचे आयोजन करण्यात येणार आहे. यावर्षी पहिल्या संमेलनाचा मान सोलापूरला देण्यात आला आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी यांनी ही माहिती दिली.

बेळगाव येथे झालेल्या ९५व्या नाट्य संमेलनात नाट्य संमेलनाच्या धर्तीवर, बालनाट्य संमेलन भरण्याविषयीचा ठराव करण्यात आला होता. त्यानंतर परिषदेने बालनाट्य संमेलन आयोजित करण्याविषयी गांभीर्याने विचार करून संमेलनाच्या कल्पनेला मूर्त स्वरूप दिले आहे. राज्यभरातील नाटके, एकांकिका या संमेलनात होतील. तसेच बालनाट्याविषयीची चर्चा केली जाईल. सातत्याने बालनाट्य या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याची, राज्यभरात सक्षम व्यासपीठ उपलब्ध नसल्याची खंत अनेक ज्येष्ठ-श्रेष्ठ कलावंतांनी व्यक्त केली होती. त्यादृष्टीने नाट्य परिषदेने पुढाकार घेऊन बालरंगभूमीच्या संवर्धनासाठी त्याचा उपयोग करावा.

पाठ्यपुस्तकांचा कॉपीराइट

'बालभारती'च्या आणि राज्य बोर्डाच्या पुस्तकांचे कॉपीराइट अधिक सक्षम करण्यासाठी शिक्षण खाते प्रयत्न करीत आहे. 'बालभारती' आणि बोर्डाने तयार केलेल्या शालेय पाठ्यपुस्तकांच्या गाईडद्वारे चालणाऱ्या खासगी प्रकाशनांच्या नफेखोरीला चाप लागणार आहे. बालभारतीची पाठ्यपुस्तके बाजारात पोहचण्यापूर्वीच खासगी प्रकाशकांची गाईड्स बाजारात उपलब्ध होत असतात. 'बालभारती'कडे प्रभावी कॉपीराइट यंत्रणा नसल्याने खासगी प्रकाशक 'बालभारती'च्या पाठ्यपुस्तकांच्या आधारे आपली प्रकाशने बाजारात आणत असतात. राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी पाठ्यपुस्तकांसाठी कॉपीराइट तरतुदी अंमलात आणण्याची घोषणा जाहीर केली.

राज्यात पहिली ते आठवीच्या टप्प्यावरील पाठ्यपुस्तकांची निर्मिती आणि वितरणाची जबाबदारी 'बालभारती'कडे आहे. त्यानंतरच्या नववी ते बारावीच्या टप्प्यावरील पाठ्यपुस्तकांसाठीचा अभ्यासक्रम तयार करण्याची आणि मजकूर पुरविण्याची जबाबदारी राज्य बोर्डाची आहे.

पानिपतवरील पुस्तकाचे प्रकाशन

'मराठेशाहीचा समृद्ध आणि प्रेरणादायी इतिहास महाराष्ट्राला माहीत नाही. त्याला अभ्यासक्रमातही विशेष स्थान नाही. हा देदीप्यमान इतिहास नव्या पिढीपुढे आणून राष्ट्रभक्ती वाढीस लावणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी इंग्रजीसह भारतीय भाषांमध्ये मराठेशाहीचा इतिहास पोहोचणे आवश्यक

आहे,' असे मत इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक पांडुरंग बलकवडे यांनी मांडले.

मुळा-मुठा पब्लिकेशनच्या वतीने उदय कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'सॉल्टिस ॲट पानिपत १४ जानेवारी १७६१' या मूळ इंग्रजी पुस्तकाच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर यांच्या हस्ते झाले. अनुवादक डॉ. विजय बापये, मूळ लेखक उदय कुलकर्णी या वेळी उपस्थित होते. मंजिरी धामणकर यांनी सूत्रसंचालन केले.

'छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा समाजात इतकी दृढ आहे की समाज सतराव्या शतकातून बाहेर आलेला नाही. अठराव्या शतकाच्या इतिहासाच्या दालनात अद्याप प्रवेशच झालेला नाही. त्यामुळे हा इतिहास दुर्लक्षित राहिला. अठराव्या शतकातील मराठाकेंद्रित इतिहासाकडे उत्तरेतील इतिहासकार दुर्लक्ष करतात; मात्र त्याने इतिहास बदलत नाही. मराठ्यांचा देदीप्यमान इतिहास समाजापुढे आणणे गरजेचे होते. ते काम या पुस्तकातून साध्य झाले,' असेही बलकवडे यांनी सांगितले.

'आपल्या इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारे हे पुस्तक आहे,' असे सांगून कुवळेकर म्हणाले, 'इतिहासातील काही मूल्ये शाश्वत असतात. त्यांची जाणीव समाजाला करून देणे आवश्यक आहे. इतिहासाविषयीची अनास्था घातक आहे. इतिहासाचे महत्त्व पुढील पिढ्यांमध्ये कळते.'

'बॅटल ऑफ बँड्स'मध्ये 'आविष्कार'ची बाजी

रॉक, फ्यूजन, उपशास्त्रीय संगीत आणि तरुण कलावंतांच्या कल्पकतेला दाद देणारे रसिक अशा वातावरणात 'बॅटल ऑफ बँड' हे आगळेवेगळे संगीतयुद्ध रंगले. दहा बँडचा सहभाग असणाऱ्या या स्पर्धात्मक उपक्रमात 'आविष्कार' बँडने बाजी मारली.

सेंट्रल अमनोरा मॉल येथे हा कार्यक्रम झाला. आविष्कार बँडने विजेतेपद पटकावले. बँडची लीड सिंगर ऋचा बोंद्रे, तन्मय पवार, अद्वैत वैशंपायन (गिटार) आणि प्रियल पवार (ड्रम्स) यांच्या सादरीकरणाला उपस्थितांची दाद मिळाली. 'टंगस्टन बँड'चे प्रमुख गायक शीतलचंद्र कुलकर्णी आणि 'क्लासिक रॉक बँड'चे गायक विजय जोशी यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

हेमलता जोशींचे लेखसंग्रह

प्रा. हेमलता जोशी यांनी लिहिलेल्या 'मर्मबंधातली ठेव ही' व 'गंध दरवळे आनंदाचा' या लेखसंग्रहांचे प्रकाशन अनुवादक डॉ. विलास सांळुके, ज्येष्ठ कथाकार भारत सासणे यांच्या हस्ते झाले. संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. शं. रा. तळघट्टी, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र. ल. गावडे या वेळी उपस्थित होते. 'वाचकाला सामावून घेऊन साहित्यिक अलिप्तपणाची भूमिका राखून त्यातील आनंदाचा ठेवा लेखिकेने मांडला आहे. त्यामुळे हे लेखन कलात्मक अनुभूती देते', असे साळुंके म्हणाले. 'आत्मसंवाद पद्धतीने इतरांना आनंद वाटण्याची मानसिकता असल्याने हे लेखन अनुभवकथन न राहता प्रेरणादायी गंध देणारे आहे,' असे सासणे यांनी सांगितले.

ब्राह्मणांचा राष्ट्रवाद रोखण्यासाठी 'मराठा'

'सध्या मराठा आरक्षणावरून वाद सुरू आहे. मात्र, शंभर वर्षांपूर्वी मराठा अशी स्वतंत्र जात अस्तित्वातच नव्हती. सर्व कुणबी शेतकरीच होते. ब्राह्मणांचा राष्ट्रवाद कमी करण्यासाठी ब्रिटिशांनी राजकारण करून मराठा जात तयार केली. संत तुकाराम, शिवाजी महाराज स्वत:ला मराठा म्हणत नव्हते. नव्या पिढीने जातीची भुते आणली. पुढे कुणबी-मराठा त्यामुळेच निर्माण झाला,' अशा शब्दांत डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी स. प. महाविद्यालयाच्या शताब्दी निमित्त सूचक भाष्य केले. प्राचार्य डॉ. दिलीप शेठ, शिक्षण प्रसारक मंडळी या संस्थेचे ॲड. जयंत शाळिग्राम आदी या वेळी उपस्थित होते. नेमाडे यांनी आपल्या भाषणात मराठी साहित्य, जातीव्यवस्था, इंग्रजी भाषा, परंपरा अशा विविध मुद्द्यांवर परखड भूमिका मांडली.

नेमाडे म्हणाले, 'मराठी साहित्य हे जगातील सर्वांत समृद्ध साहित्यांपैकी एक आहे. गेल्या शंभर वर्षांत आपला समाज चिंताग्रस्त झाला. सुखी समाजाची लक्षणे आपल्या समाजात दिसत नाहीत. न सुटणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधत राहणे हे हिंदू समाजाचे लक्षण आहे. शंभर वर्षांपूर्वी जातीचे अवडंबर, स्त्रियांवर अत्याचार होत नव्हते. आता कोणत्याही क्षणी दंगे सुरू होतील, अशी स्थिती आहे.' मराठी माणसांची बौद्धिक उंची जितकी वाढली, तितकी मराठी साहित्याची उंची वाढली नाही, असेही मत त्यांनी मांडले.

जागतिक होण्यासाठी साहित्याचा इंग्रजीत अनुवाद होणे आवश्यक आहे, असे मानले जाते. मात्र, तसे काही नसते. आता जागतिक होण्याची व्याख्या बदलली पाहिजे. लेखकांना जागतिक होण्याचे व्यसन लागले आहे. आपल्या मनाला भावते ते जागतिक असा विचार केला पाहिजे, असे नेमाडे म्हणाले.

फेसबुक हॅकर्स

आनंदाचे क्षण शेअर करता करता फेसबुकचे माध्यम केव्हा मनस्ताप ठरेल, याची शाश्वती नाही. याची प्रचिती सध्या अनेक फेसबुक युजर घेत आहेत. फेसबुक हॅकर्सनी धुमाकूळ घातला असून एकाच दिवशी गोव्यातील सुमारे वीस टक्के फेसबुक खाती (अकाउंट) हॅक झाली आहेत.

फेसबुकच्या एका पोस्टवरील 'क्लिक' बदनामीच्या खाईत लोटू शकते. हॅकर्सच्या या षड्यंत्राला लाखो युजर्स बळी पडले आहेत. फेसबुकवर मित्राच्या नावे येणाऱ्या अश्लील चित्रफितींवर चुकूनही 'क्लिक' केल्यास खाते हॅक केले जात आहे. हॅक केलेल्या खात्यावरून त्याच्या मित्रांच्या यादीतील लोकांना पुन्हा अश्लील चित्रफितीचे प्रसारण करण्यात येते.

मंगळवारी ९ जून रोजी गोवा राज्यातील पोलिस आणि पत्रकारांसह अनेक लोकांनी हा अनुभव घेतला. आपल्या नावे शेअर झालेल्या अश्लील चित्रफिती पाहून अनेकांना जाहीर माफी मागावी लागली आहे. 'watch urgent, because it is your video' अशी सुरुवात असणारा संदेश प्रथम पाठवला जातो. ही चित्रफीत पाहण्याचा प्रयत्न केल्यास खाते हॅक केले जाते. मग तोच संदेश वापरकर्त्याच्या नावाने त्याच्या मित्रांना पाठवला जातो.

'मसाप'च्या शाखेचे उद्घाटन

फेसबुक व्हॉटसअप यासारख्या नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानामुळे युवकांच्या मनावर चुकीच्या गोष्टींचा परिणाम मोठ्या प्रमाणात होत आहे. युवकांना यातून बाहेर काढण्यासाठी वाचन, लेखन, व्यायामाची गरज आहे. त्यासाठी साहित्य चळवळ ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रुजण्याची गरज आहे. असे प्रतिपादन डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले.

उरुळी कांचन येथे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विनोदी कथालेखक सु. ल.

खुटवड होते.

डॉ. मोरे म्हणाले, ''गांधीजींचे विचार, अभिजात व कालस्वरूप आहेत. मात्र फेसबुक, व्हॉटसअप यासारख्या अनेक नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानातून नको त्या व अनेक खोट्या गोष्टींचा मारा तरुणाईवर मोठ्या प्रमाणात होत आहे. याचा परिणाम सध्या दिसत नसला तरी भविष्यात मात्र जाणवणार आहे. चांगले साहित्य निर्माण झाले, तरच तरुणाई वाचनाकडे वळणार आहे.''

खुटवड म्हणाले, ''विनोदी लेखकांचं हक्काचं व्यासपीठ म्हणून पुरवणीकडे पाहिले जाते. रविवार या पुरवण्यांनी लेखकांना घडवायचं आणि साहित्यिक वातावरणही निर्माण केलं आहे.''

विजय कोलते म्हणाले, ''आचार्य अत्रे यांचा साहित्यिक वारसा जनत करण्याच्या दृष्टीने आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. त्यासाठी आम्ही विविध कार्यक्रमांचे आयोजन करत आहोत. ग्रामीण भागात साहित्यिक चळवळ रूजली जात आहे, ही चांगली बाब आहे.''

विश्वकोशाचा २० वा खंड

महाराष्ट्र राज्य विश्वकोश मंडळातर्फे विश्वकोशाचा २०वा खंड (उत्तरार्ध) नुकताच तयार झाला आहे. १० जून रोजी वाई येथील महागणपतीसमोर राज्य विश्वकोश मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे चिरंजीव आणि विश्वकोश मंडळाचे सदस्य वासुदेवशास्त्री जोशी यांच्या हस्ते या २०व्या खंडाची प्रत गणपतीपुढे ठेवण्यात आली. या खंडात 'हर्षवर्धन सम्राट ते यज्ञेय ज्ञानेश्वर, ज्ञानेश्वरी' पर्यंतच्या एकूण ६३६ नोंदी आहेत

या विश्वकोशाच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन तेव्हाचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या झाले होते. त्यामुळे २०व्या खंडाच्या उत्तरार्धाचे प्रकाशन पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते व्हावे असा प्रयत्न आहे असे विश्वकोश मंडळाच्या अध्यक्षा डॉ. विजया वाड यांनी सांगितले.

९ डिसेंबर २००५ मध्ये राज्य विश्वकोश मंडळाच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली तेव्हा विश्वकोशाचे १६ खंड प्रकाशित झाले होते. मधली पाच ते सहा वर्षे एकही खंड प्रकाशित झाला नव्हता. १२ फेब्रुवारी २००७ रोजी नोंदी अद्ययावत करून १७ वा खंड प्रकाशित करण्यात आला. त्यानंतर

१५ ऑगस्ट २००८ मध्ये १८ वा, ८ ऑक्टोबर २०११ रोजी १९ वा आणि १२ जानेवारी २०१५ मध्ये २० खंड (पूर्वार्ध) प्रकाशित करण्यात आला. विश्वकोश मंडळातर्फे दोन कुमार विश्वकोशही प्रकाशित करण्यात आले. विश्वकोशाच्या आत्तापर्यंतच्या खंडांची २६ हजार पाने 'सीडॅक'च्या सहकार्याने माहितीच्या महाजालात टाकण्यात आली आहेत.

गंधर्वभूषणांचा प्रवास

रंगभूमी आणि चित्रपट या दोन्ही माध्यमांत स्वत:चा वेगळा ठसा उमटवणारे 'गंधर्वभूषण' जयराम शिलेदार यांचा जन्मशताब्दी निमित्ताने 'फोटोबायोग्राफी' प्रकाशित करण्यात येणार आहे.

शिलेदार यांच्या कन्या दीप्ती भोगले यांनी म्हटले, शिलेदार यांचे जन्मशताब्दी वर्ष ६ डिसेंबर रोजी सुरू होत आहे. वयाच्या १६व्या वर्षी शिलेदार यांनी रघुवीर सावकार यांच्या नाटक कंपनीतून रंगभूमीवर पाऊल ठेवले. पुढे गंधर्व नाटक मंडळींतर्फे नटसम्राट बालगंधर्वांबरोबर नायकाची भूमिका करण्याची संधी मिळाली. हिराबाई बडोदेकर, शांता आपटे, मीनाक्षी, जयमाला शिलेदार यांच्यासह त्यांनी केलेली नाटके गाजली. गणपतराव बोडस, चिंतामणराव कोल्हटकर, केशवराव दाते यांचे मार्गदर्शन लाभले. रंगभूमीवर कार्यरत असतानाच त्यांनी चित्रपटाच्या माध्यमातही लक्ष वेधून घेतले. त्यांनी 'मराठी रंगभूमी' ही स्वत:ची नाट्य संस्था स्थापन केली. त्या माध्यमातून पंचेचाळीसहून अधिक संगीत नाटकांचे प्रयोग केले. संगीत रंगभूमीच्या पडत्या काळात तिला सावरून धरण्याचे काम याच संस्थेने केले.

शिलेदार यांच्या जन्मशताब्दी वर्षात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. त्यात गाजलेली संगीत नाटके पुन्हा रंगभूमीवर आणणे, छायाचित्र प्रदर्शन, नाट्यसंगीताच्या व संगीत नाटकांच्या ध्वनिचित्रफिती करणे, संगीत नाटकांवर आधारित कॅलेंडर करणे, तरुण रंगकर्मींसाठी संगीत नाटकाची कार्यशाळा घेण्याची योजना आहे.

'मॅग्ना कार्टा'चा लेखनिक

ब्रिटनच्या आधुनिक राष्ट्र-राज्याचा पाया रचणारी 'मॅग्ना कार्टा' ही ऐतिहासिक सनद प्रत्यक्ष लिहिणाऱ्या दोन लेखनिकांना शोधण्यात संशोधकांना यश आले आहे. दोन्ही लेखनिक चर्चच्या बाजूने या प्रक्रियेमध्ये

सहभागी झाले असावेत, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

इंग्लंडमध्ये १२१५मध्ये जॉन या राजाविरोधात प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. त्याविरोधातील बंडानंतर, कँटबरीच्या आर्चबिशपच्या पुढाकाराने करार तयार करण्यात आला होता. या कराराची सनद म्हणजेच 'मॅग्ना कार्टा'! या करारानंतर राजाच्या अधिकारांमध्ये लक्षणीय प्रमाणात कपात झाली. या ऐतिहासिक कराराच्या सनदेला १५ जून रोजी ८०० वर्षे पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर या लेखनिकांचा शोध लागला आहे. असे या प्रकल्पाचे प्रमुख संशोधक निकोलस विन्सेट यांनी सांगितले. ते म्हणाले, ''जॉन राजाच्या बाजूने करार लिहिणाऱ्याऐवजी चर्चच्या बाजूने लिहिणाऱ्यांना महत्त्व आहे. आठशे वर्षांनंतर या लेखनिकांना शोधणे म्हणजे गवताच्या गंजीतून सुई शोधण्याएवढे कठीण आहे.''

'मॅग्ना कार्टा' लागू होऊ नये किंवा प्रसिद्धही होऊ नये, अशीच जॉनची इच्छा होती. मात्र बिशपनी आग्रह केल्यामुळे, तिचे देशभरात वितरण झाले आणि कॅथेड्रलच्या संग्रहालयामध्ये तिचे जतन करण्यात आले.

'मॅग्ना कार्टा'ला ८०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर या कराराच्या प्रतिमेची थेम्स नदीच्या किनाऱ्यावर मोठी मिरवणूक काढण्यात आली.

पहिल्याच दिवशी ९८ टक्के वितरण पूर्ण

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना यंदा शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके उपलब्ध व्हावी म्हणून बालभारतीने त्यासाठीची प्रक्रिया पूर्ण केली आणि जवळपास ९८ टक्के वितरणाचे काम पूर्ण केले आहे.

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी 'बालभारती'तर्फे पाठ्यपुस्तकांची छपाई केली जाते. यंदा पहिली ते आठवीच्या वर्गासाठी 'बालभारती'ने एकूण सात कोटी तीन लाख पुस्तकाची छपाई केली होती. सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून पाठ्यपुस्तकांचे वाटप केले जात आहे. यंदा पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी नव्या अभ्यासक्रमाची पुस्तके उपलब्ध करून दिली जात आहेत. सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून वितरित होणाऱ्या पुस्तकांवर यंदा अभियानाचा लोगो छापण्यात आला आहे. तसेच ही पुस्तके खासगी वितरकांमार्फत विक्रीला जाऊ नयेत यासाठी या पुस्तकांच्या कडेवर बारकोडही छापण्यात आल्याचे सांगण्यात आले.

'बालभारती'च्या पुणे विभागीय वितरण कक्षामधून पुणे, नगर आणि सोलापूर जिल्ह्यासाठीच्या पाठ्यपुस्तकांचे वितरण सुरू आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निवासस्थानाची खरेदी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वास्तव्यास असलेल्या लंडनमधील निवासस्थानाच्या खरेदीची औपचारिक प्रक्रिया पूर्ण झाली असून, भारत सरकारने ही वास्तू खरेदी करण्यासाठी ४० लाख पौंड खर्च केले आहेत. विद्यार्थीदशेमध्ये १९२० साली डॉ. आंबेडकर यांचे या घरामध्ये वास्तव्य होते. येथील 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या संस्थेमध्ये डॉ. आंबेडकरांनी उच्च शिक्षणाचे धडे गिरवले होते.

ब्रिटनमधील भारतीय उच्चायुक्तांनी या वास्तूच्या खरेदीला दुजोरा दिला असून, महाराष्ट्र सरकारने हे निवासस्थान खरेदी करण्याची तयारी दर्शविल्यानंतर या प्रक्रियेला वेग आला होता. या निवासस्थान खरेदीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्राचे सामजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांच्या नेतृत्वाखाली तीन सदस्यांचे शिष्टमंडळ एप्रिल महिन्यातच ब्रिटनच्या दौऱ्यावर गेले होते. दरम्यान, आंबेडकरांच्या निवासस्थानासाठी खर्च केली जाणारी रक्कम महाराष्ट्र सरकारकडूनच दिली जाऊ शकते अशी महिती सूत्रांनी दिली. अधिकृतपणे हे निवासस्थान ताब्यात आल्यानंतर त्याची डागडुजी केली जाणार असून त्यानंतर ते सर्वसामान्य लोकांसाठी खुले करण्यात येईल. ब्रिटनमध्ये उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना या वास्तूमधील पहिला मजला तात्पुरता निवारा म्हणून उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन आहे.

डॉ. आंबेडकरांचे वास्तव्य झालेले हे निवासस्थान भारत सरकारने खरेदी करावे यासाठी लंडनमधील 'फेडरेशन ऑफ आंबेडकर राईट्स अँड बुद्धिस्ट ऑर्गनायझेशन' (फॅबो) या संस्थेने सरकारदरबारी पाठपुरावा केला होता. २ हजार ५० स्क्वेअर फूट एवढ्या विस्तीर्ण भागावर असलेली वास्तू पूर्वीपासूनच अनेकांच्या आकर्षणाचा बिंदू होती. याच वर्षी फेब्रुवारी महिन्यामध्ये महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने या निवासस्थानाच्या खरेदीचा प्रस्तावाला मंजुरी दिली होती.

तीन अनुवादित पुस्तकांचे प्रकाशन

उषा पब्लिकेशनतर्फे किमया किशोर देशपांडे अनुवादित 'दास्ताने आग्रा' (कहाणी आग्र्याची), सुहासिनी देशपांडे अनुवादित जहाँआरा बेगम, (कहाणी मुघल शहजादीची) आणि मेवाराम 'गुनाहों की देवी' या तीन पुस्तकांचे प्रकाशन आमदार मेधा कुलकर्णी यांच्या उपस्थितीत पार पडले. लेखक व गीतकार संदीप अवचट, हिंदी कवी व समीक्षक टिकम शेखावत आणि प्रसिद्ध कथक नृत्यांगना नीलिमा हिरवे यांची या वेळी विशेष उपस्थिती होती.

याच कार्यक्रमात ज्येष्ठ हिंदी संशोधक व साहित्यिक डॉ. रजनी रणपिसे व ज्येष्ठ मराठी संशोधक डॉ. विजय अ. कुलकर्णी यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'दास्तान-ए-आग्रा आणि 'जहाँआरा' या पुस्तकांच्या निवडक अंशांचे अभिवाचन आणि संलग्न विषयांवरील नृत्य सादरीकरण झाले. या कार्यक्रमाची निर्मिती आणि संकल्पना किमया देशपांडे यांची होती; तर सुहासिनी देशपांडे यांनी संहितालेखन केले होते. नीलिमा नृत्यालयाच्या विद्यार्थिनीनी नृत्यप्रस्तुती केली.

'ग्रंथाली'चे ई-पब ॲप

छापील पुस्तके चाळताना आणि वाचताना आपण त्यांची पाने उलटतो. त्यात बुकमार्क ठेवता येते. आवडलेली वाक्ये अधोरेखित करता येतात; पण ही मजा ई-बुक्समध्ये कोठून येणार असे विचारणाऱ्यांना ई-पबमधून देण्याचा संकल्प ग्रंथाली वाचक चळवळीने सोडला आहे.

छापील पुस्तके स्कॅन केली की त्याचे ई-बुक होते, अशी कल्पना सर्वसाधारणपणे रूढ आहे. ई-बुकमधून पुस्तक वाचण्याची मजा घेता येत नाही; त्यामुळे मी चालणार नाहीत, असे म्हणणाऱ्यांचाही एक वर्ग आहे. मात्र, आजच्या टेक्नोसॅव्ही आणि गॅझेटप्रिय पिढीला साजेसे पुस्तकांचे तंत्रज्ञान ग्रंथाली चळवळीच्या ४०व्या वर्धापन वर्षानिमित्त देण्याची कल्पना 'ग्रंथाली'च्या सुदेश हिंगलासपूरकर यांनी मांडली. त्यातून ई-पबची कल्पना पुढे आली.

'ई-पब म्हणजे 'ई-बुक'ची पुढची पिढी आहे. या नव्या व्हर्जनमध्ये पुस्तके केवळ स्कॅनच होत नाहीत, तर ती उलटणे, त्यामध्ये बुकमार्क ठेवणे,

ओळी अधोरेखित करणे, पुस्तकातील मजकुराच्या आधारे केवळ चित्रच नाही, तर ॲनिमेशनही ठेवता येणे शक्य असल्यामुळे मुलांसाठी ही पुस्तके मनोरंजकही ठरतील.'

आयटी तज्ज्ञ असलेल्या प्रशांत कऱ्हाडे यांनी त्याला मूर्त रूप दिले. केवळ पुस्तकेच नाहीत, तर साहित्य-सांस्कृतिक विश्वाचा खजिना मराठी वाचकांपुढे एकत्रितरीत्या ठेवावा यासाठी 'ॲप'ची निर्मिती करण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रंथाली प्रकाशनाची पुस्तके ई-पबच्या माध्यमातून लवकरच ॲपवर उपलब्ध केली जाणार आहेत. अमेरिकेत जुलैमध्ये होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संमेलनात या 'ॲप'चे प्रकाशन प्रसिद्ध संगीतकार अवधूत गुप्ते यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

'ग्रंथाली'ची नव्या काळाला साद घालणारी दिनकर गांगल, अरुण साधू, विद्या हर्डीकर, अशोक सप्रे आदींची १० पुस्तके प्रथम या ॲपवर टाकण्यात येतील.

'ऑक्सफर्ड' शोधतेय 'नम्प्टी' शब्दाचे मूळ

नम्प्टी या शब्दाचा इंग्रजीत लेखी स्वरूपातील पहिला वापर कधी झाला, याचा शोध ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीने सुरू केला आहे. या शब्दाचा अर्थ मूर्ख किंवा बावळट मनुष्य (फूलिश ऑर स्टुपिड पर्सन) असा आहे. साधारणत: १९८०च्या दशकाच्या मध्यापासून ब्रिटनमध्ये 'नम्प्टी' हा शब्द सौम्य शिवी म्हणून वापरला जातो.

ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीच्या संशोधकांनी केलेल्या अभ्यासानुसार १९८८मध्ये मायकेल मन्रो यांनी लिहिलेल्या 'क्रॉनिकलिंग कोलोक्वियालिझम्स इन ग्लासगो, स्कॉटलंड' या पुस्तकात 'नम्प्टी' या शब्दाचा पहिला वापर केलेला आढळतो. ऑक्सफर्डवर्डस ब्लॉगवर ही माहिती देण्यात आली आहे.

'मेकओव्हर'ची क्रेझ

'मेकओव्हर' या शब्दातच जादू आहे. ती अनुभवण्यासाठी आणि सर्वांमध्ये व्यक्तिमत्व खुलून दिसण्यासाठी 'मेकओव्हर' करून घेणाऱ्या तरुणाईची संख्या वाढली आहे. यासाठी शहरातील मेकओव्हर सलूनमध्ये पॅकेजेस उपलब्ध आहेत.

प्रोफेशनल, ब्रायडल, स्टायलिश आणि कॉलेजियन्सच्या मेकओव्हरची सर्वाधिक क्रेझ आहे. संपूर्ण कायापालट करून स्वत:मध्ये स्टायलिशपणा आणण्यासाठीचा नवा फंडा युवक-युवतींकडून वापरला जात आहे. यात प्रोफेशनल मेकओव्हरला तरुणांची विशेष पसंती आहे. मेकओव्हरसाठी तरुण ३ ते २० हजार रुपये मोजायला तयार आहेत. विविध मॉल्ससह फर्ग्युसन रस्ता, डेक्कन, विश्रांतवाडी, कॅम्प, सिंहगड रस्ता या ठिकाणी मेकओव्हर सलून आहेत.

मेकओव्हरतज्ज्ञ ज्योती ढाणे म्हणाल्या, ''मेकओव्हरमध्ये तरुणांना व्यक्तिमत्त्वातील बदलाबद्दल मार्गदर्शन केले जाते. मेकओव्हरसाठी दोन दिवस ते एक महिना लागू शकतो. वधूच्या सौंदर्यात चार चाँद लावण्यासाठी प्रयत्न करतो. त्यांच्यावर आमचे स्टायलिस्ट काम करतात.''

स्मार्ट फोनवर नव्या सुविधा

तंत्रज्ञानातील बदलाचा वेग अफाट असल्याने 'अपडेटेड' न राहिल्यास 'आउटडेटेड' होण्याचा धोका अधिक असतो. अलीकडच्या मोबाइल क्रांतीच्या जमान्यात तर हे वास्तव जवळपास घरोघरी अनुभवले जात आहे. मोबाईल, स्मार्ट फोन, ॲप, सॉफ्टवेअर, गेम्स यामध्ये सतत बदल होत आहेत आणि नवनव्या तंत्रज्ञानासह हे वापरकर्त्यांना उपलब्ध होत आहेत.

व्यवसायवृद्धी तसेच ग्राहकांच्या सोयीसाठी तंत्रज्ञानातील बदलास उत्पादक कंपन्या प्राधान्य देत आहेत. बदलाची प्रक्रिया ही अपरिहार्य ठरली आहे. सॉफ्टवेअर, ॲप, लाँच केल्यानंतर व्यावसायिकता आणि स्पर्धा यांची चाचपणी करून त्यानुसार योग्य ते बदल करून ते पुन्हा बाजारात आणले जात आहेत. फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर यू ट्यूब, गुगल प्ले, जी-मेल अशा सर्वाधिक लोकप्रिय ॲप्सची नवनवीन व्हर्जन्स येत असतात आणि ती यूजर्स आपोआप अपडेट कशी करतील, याचीही तजवीज केलेली असते. यूजर्सना अपडेटेड व्हर्जन डाउनलोड करावे, यासाठी ॲपवरच नवीन व्हर्जन अपडेट करण्यासाठी प्रवृत्त केले जाते.

अशी आहेत व्हर्जन्स

गुगल : पहिले google beta आता device नुसार वेगळे

ॲन्ड्रॉइड : पहिले Android beta : आताचे lollipop - ५-०

व्हॉट्सॲप : पहिले १.० आताचे २.१२.१२६

फेसबुक : the facebook : आता device नुसार वेगळे
यू ट्यूब : पहिले you tube : आता device नुसार वेगळे
विंडोज : पहिले Windows NT ३.१ : आताचे Windows १०

पुस्तक वाचा, विचार बदलेल

वाचनामुळे आनंद मिळतो, हे सार्वत्रिक सत्य आहे. मात्र, एखादे पुस्तक वाचल्यानंतर मेंदूमधील प्रक्रिया आणि विचारांमध्येही बदल होत असल्याचे एका पाहणीमध्ये समोर आले आहे.

अमेरिकेतील एमॉरी विद्यापीठाने याविषयी अभ्यास केला आहे. त्यामध्ये पदवीसाठी शिकणाऱ्या २१ विद्यार्थ्यांना 'पोम्पेई' ही गाजलेली कादंबरी वाचायला देऊन त्यानंतर सलग १९ दिवस त्यांच्यातील बदलांचा अभ्यास करण्यात आला. या अभ्यासात पहिल्या पाच दिवसांमध्ये या विद्यार्थ्यांचे रोज सकाळी 'एमआरआय'ची नोंदणी घेण्यात येत होती. त्यानंतर सलग नऊ दिवस वेगळ्या पद्धतीने तपासणी करण्यात आली. या कादंबरीचे प्रत्येकी तीस पानांचे नऊ भागही करण्यात आले आणि रोज रात्री वाचून सकाळी तपासणीसाठी येण्यास सांगण्यात आले. ही पाहणी झाल्यानंतरही पाच दिवस त्यांची तपासणी करण्यात आली. त्यावरून त्यांच्या विचारांमध्ये आणि मेंदूच्या प्रक्रियेमध्ये बदल झाल्याचे दिसून आले, अशी माहिती न्यूरोसायन्टिस्ट ग्रेगरी बर्न्स यांनी दिली.

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सुलभा देशपांडे यांना जीवनगौरव

अखिल भारतीय नाट्यपरिषदेतर्फे दिल्या जाणाऱ्या जीवनगौरव पुरस्कारांसाठी यंदा नाट्यकर्मी सुलभा देशपांडे व अभिनेते जयंत सावरकर यांची निवड करण्यात आली.

२५ हजार रुपये रोख व शाल, श्रीफळ असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे.

जीवनगौरव पुरस्कारासह दिले गेलेले इतर पुरस्कार : सर्वोत्कृष्ट लेखक - अनिल काकडे (कळत नकळत), दिग्दर्शक - मंगेश कदम (गोष्ट तशी गमतीची), सर्वोत्कृष्ट नाटक - कळत नकळत, अभिनेता - संजय खापरे- कळत नकळत, विनोदी अभिनेता सागर कारंडे (जस्ट हलकं फुलकं), अभिनेत्री - स्पृहा जोशी (समुद्र), नेपथ्य - राजन भिसे (समुद्र), प्रकाश योजना - जयदीप आपटे (समुद्र), संगीत - पियूष साई (ढँण्टॅढॅण), सहायक अभिनेता - शशांक केतकर (गोष्ट तशी गमतीची), विनोदी अभिनेत्री - लीना भागवत (गोष्ट तशी गमतीची) सहायक अभिनेत्री - ज्ञानदा पानसे, सीमा गोडबोले, उत्कृष्ट व्यवस्थापक मामा पेडणेकर.

यंदा आणखी काही पुरस्कार देण्यात येणार आहेत. एकपात्री पुरस्कारासाठी संदीप पाठक (वऱ्हाड निघालंय लंडनला), व्यावसायिक संगीत नाटक - बया दार उघड, संगीत नाटकासाठी सं. स्वयंवर तर प्रायोगिक नाटकासाठी 'न ही वैरेन वैरानी' यांचा समावेश आहे. याखेरीज रंगभूषाकार रवींद्र जाधव, ऋषीकेश बडवे, सावनी कुलकर्णी, लीला रिसबुड हडप आदींची निवड करण्यात आली आहे.

तत्त्वज्ञान ऑलिंपियाडमध्ये पुण्याच्या अभिषेकला रौप्यपदक

उत्तर युरोपातील एस्टोनिया देशात नुकत्याच झालेल्या २३व्या

आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान ऑलिंपियाडमध्ये (आयपीओ) भारताने रौप्यपदक मिळवले. नुकताच बारावी झालेल्या पुण्याच्या अभिषेक देढे या विद्यार्थ्याने नेत्रदीपक कामगिरी केली आहे.

गेली आठ वर्षे या आंतरराष्ट्रीय शालेय भारत स्पर्धेत सहभागी होत आला आहे. दरवर्षी निरनिराळ्या देशांत होणाऱ्या या स्पर्धेत देशातून एक शिक्षक आणि दोन विद्यार्थी सहभागी होतात. यंदा केदार सोनी व मार्गदर्शकासह अभिषेक आणि नगर येथील निहार कुलकर्णी (बारावी) हिची निवड भारतीय संघात झाली होती. या स्पर्धेत चाळीस देशांतील नव्वद विद्यार्थी सहभागी झाले होते.

''या परीक्षेबद्दल वेगवेगळ्या इंटरनेट साइटसवरून माहिती मिळू शकते. मेंदूची कार्यपद्धती कशी चालते? जगणं म्हणजे नक्की काय? विचार कसे निर्माण होतात? बुद्धिमत्ता कशी कार्यान्वित होते? हे आणि असे विविध प्रश्न मला नेहमीच पडायचे. त्यातून 'न्यूरोसायन्स'ची आवड निर्माण झाली, त्याचाच पुढचा टप्पा तत्त्वज्ञानाच्या आवडीचा होता. या परीक्षेच्या निमित्ताने मी कान्ट, रुसो, बर्ट्रांड रसेल, सॉक्रेटिस अशा तत्त्ववेत्त्यांची पुस्तके अभ्यासू शकलो.'' असे अभिषेक देढे याने सांगितले.

''सर्व क्षेत्रांत उपयुक्त ठरणारा तत्त्वज्ञान हा विषय आहे. आम्ही अभिषेकला चाकोरीबाह्य आवडी जोपासण्यासाठी पाठिंबा दिला. शालेय अभ्यासापलिकडे त्याचा विकास होण्याबाबत आम्ही जागरूक होतो. मी इतर पालकांनाही हेच सांगेन, की 'हंटर' घेऊन आपल्या मुलांच्या पाठी लागू नका... त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करू द्या.'' असे मोहन देढे यांनी सांगितले.

धर्मवीर पुरस्कार

''छत्रपती संभाजी महाराजांच्या पुढच्या वर्षीच्या जयंतीदिनी पुरंदर ते वढू इथपर्यंत 'शंभूज्योत' सुरू करण्यात येईल तसेच लाल महाल येथे समूहशिल्प उभे करण्यात येईल,'' अशी माहिती डॉ. अमोल कोल्हे यांनी दिली.

इतिहासाचे अभ्यासक पांडुरंग बलकवडे, आमदार विजय काळे, विश्व हिंदू परिषदेच्या पुणे विभागाचे अध्यक्ष प्रदीप जगताप, प्रतापगड उत्सव समितीच्या अध्यक्ष विजयाताई भोसले, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुरेश

नाशिककर, दत्ता खाडे, नगरसेवक नीलिमा खाडे, विलास सोनवणे, सचिन पायगुडे उपस्थित होते.

डॉ. कोल्हे यांच्या हस्ते पंडितराव मोडक व ॲड. देविदास शिंदे यांना 'धर्मवीर पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. गोरक्षक पुरस्काराचेही वितरण झाले.

डॉ. कोल्हे म्हणाले, ''लाल महालात बाजी पासलकर, विठोबा तुपे, कान्होजी जेधे, राजमाता जिजाऊ आणि शहाजी राजे यांचे समूहशिल्प उभे राहील. छत्रपती संभाजी महाराजांचे कर्तृत्व असामान्य होते परंतु त्यांना योग्य न्याय मिळाला नाही.'

भारतीय अव्वल

अवकाशातील बुध ग्रहावरील ज्वालामुखीच्या विवरांना कर्तृत्ववान व्यक्तींची नावे देण्यात येणार आहेत. त्यासाठी घेण्यात आलेल्या स्पर्धेत गगन तूर या भारतीय नागरिकाने बाजी मारली आहे. त्याने सुचविलेल्या एनहेड्युअनना (देवांची हुशार धार्मिक गुरू) या नावाला यंदा प्रथम क्रमांकाचा मान मिळाला.

प्रथम पाच क्रमांकाच्या नावांमध्ये कॅरोलन (अंध आयरिश संगीतकार आणि गीतकार), कार्श (कनेडियन फोटोग्राफर), कुलथुम (इजिप्शियन गीतकार) आणि रिव्हिएरा (मेक्सिकन पेंटर) ही नावे पुढे आली.

एनहेड्युअन्ना ही कवयित्री तसेच लेखिका म्हणून मेसापोटोमिया या प्राचीन काळात प्रसिद्ध होती. ती उर देशातील सुमेरियन शहराची राजकन्या होती. ती त्या काळातील पहिली कवयित्री आणि लेखिका म्हणून ओळखली जाते.

ही स्पर्धा दर वर्षी स्पेस डॉट कॉमच्या वतीने आयोजित केली जात असून, ती सर्वांसाठी खुली असते. त्यासाठीचे प्रवेश १५ जानेवारीपर्यंत असतात, अशी माहिती स्पेस डॉट कॉम या वेबसाइटने दिली आहे. यंदा प्राथमिक फेरीत ३,६०० जणांनी भाग घेतला होता. त्यापैकी १७ जण हे उप अंतिम फेरीसाठी पात्र ठरवले होते.

ज्वालामुखींच्या विवरांना लेखक, कवी आणि संगीतकारांची नावे दिली जातात. नावे सुचविण्यात येणारे कलाकार ५० वर्षांपूर्वीच्या कालखंडात प्रसिद्ध असावेत; तसेच किमान तीन वर्षे आधी त्यांचे निधन झालेले असावे.

असा नियम आहे. यासाठी नवीन आलेली नावेही मंजूर करण्यात आली असल्याची माहिती आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्रीय संघटनेने (आयएयू) दिली आहे.

अकराव्या वर्षी पदवीधर

भारतीय वंशाच्या एका अमेरिकी मुलाने वयाच्या अकराव्या वर्षी पदवी मिळवली. तिच्या जोडीला गणित, विज्ञान,परराष्ट्र भाषा या इतर तीन संलग्न पदव्याही मिळवल्या आहेत.

तनिष्क अब्राहम हा मूळ कॅलिफोर्नियातील सॅक्रॅमेन्टो येथील रहिवासी असून तो अमेरिकन रिव्हर कॉलेजमधून पदवीधर झाला आहे. तेथे १८०० विद्यार्थी शिकतात. मात्र त्याने सगळे शिक्षण घरीच पूर्ण केले आहे. अमेरिकन रिव्हर कॉलेजमधून पदवीधर होणारा तो यावर्षीचा पहिलाच तरुण पदवीधर आहे. अमेरिकन रिव्हर कॉलेजचे प्रवक्ते स्कॉट क्रो यांनी सांगितले की, बहुधा तो आतापर्यंतचा सर्वात तरुण पदवीधारक असावा. वयाच्या सातव्या वर्षापासून अब्राहम याला घरी शिकवण्यात आले. त्याने गेल्या वर्षी एक परीक्षा देऊन माध्यमिक पदविकेसाठी पात्रता मिळवली. त्याच्या या कामगिरीबद्दल अध्यक्ष बराक ओबामा यांनी तनिष्कला अभिनंदन करणारे पत्र पाठवले. अब्राहम याने मेन्सा चाचणी वयाच्या चौथ्या वर्षी दिली.

त्याची आई ताजी अब्राहम यांनी सांगितले की, तो वर्गात नेहमीच पुढे होता. त्याला डॉक्टर व्हायचे आहे, वैद्यक संशोधक व्हायचे आहे व अमेरिकेचा अध्यक्ष व्हायचे आहे असे फॉक्स न्यूजला त्याने सांगितले.

बापूसाहेब जोशी पुरस्कार

'संस्कृती परंपरेचा अभ्यास करायचा असेल, तर संस्कृत भाषा शिकणे अनिवार्य आहे,' असे मत ज्येष्ठ पुरातत्त्वज्ञ डॉ. गो. देगलूरकर यांनी व्यक्त केले.

प्रसाद प्रकाशनतर्फे मनोहर तथा बापूसाहेब जोशी स्मृती गौरव पुरस्कार संस्कृततज्ज्ञ डॉ. सुचेता परांजपे आणि वनस्पतीतज्ज्ञ डॉ. प्र. के. घाणेकर यांना देगलूरकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. स्वामी श्रीसवितानंद, प्रसाद प्रकाशनच्या संचालिका उमा बोडस आदी या वेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून देगलूकरांनी उपस्थितांशी संवाद साधला.

‘पुणे हे विद्येचे माहेरघर आहे. पण पुण्यातून विद्या सासरी गेली की काय अशी शंका अधेमधे येत असते. आपली संस्कृती, परंपरा आणि भाषा जपणारे कार्यक्रम पाहिले की ती इथे अजूनही नांदतेय याची खात्री पटते. पुरातन गोष्टी आणि आपल्या संस्कृती परंपरा समजून घेण्यासाठी संस्कृत भाषेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.’ असे देगलूरकर म्हणाले.

‘‘हा प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे. आयुष्यात अनेक उत्तमोत्तम ‘टीचर’ नाही तर गुरू लाभले. त्यामुळे माझ्यासाठी हा पुरस्कार म्हणजे गुरूप्रसाद आहे,’’ अशी भावना परांजपे यांनी व्यक्त केली. ‘ऑक्टोबर १९८४ मध्ये माझे पहिले पुस्तक याच प्रकाशनाने प्रकाशित केले होते. त्यानंतर अनेक पुस्तके झाली ती माझ्यासाठी शाबासकीची थाप होती. बापूसाहेबांना ऐकता आलं, परिचय झाला ही माझ्यासाठी मोलाची गोष्ट आहे,’ असे घाणेकर म्हणाले.

प्रसाद प्रकाशनतर्फे ११ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. प्रकाशनाचे मंदाकिनी देशपांडे, कृष्णा नगरकर, संजीव लिमये, संगीता सरदेसाई, मयूर भंडारी आणि विक्रम गोगावले आदींचा या वेळी सत्कार करण्यात आला. सिंधुसंस्कृतीपासूनचा वेशभूषेचा प्रवास उलगडणाऱ्या डॉ. नितीन हडप यांच्या ‘पुरा’ फॅशन शो या रंगतदार सादरीकरणाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

सासवडमध्ये आचार्य अत्रे पुरस्कारांचे वितरण

‘‘लेखकाचे मोठेपण साहित्य संमेलन किंवा उच्च पातळीवरील पुरस्कार ठरवीत नाहीत, तर सामान्य वाचकाचा प्रतिसाद ठरविते. त्यामुळे मी वाचकांपुढे जातो.’’ असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांनी केले.

आचार्य अत्रे यांच्या जन्मगावी सासवड (ता. पुरंदर) येथे आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठन व महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या यंदाच्या अत्रे पुरस्कारांचे वितरण १३ जूनला करण्यात आले. यात साहित्यिक पुरस्कार डॉ. रंगनाथ पठारे यांना, कलाकार पुरस्कार वैभव मांगले व पत्रकार पुरस्कार सुरेश भटेवरा यांना रावसाहेब पवार यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी संयोजक व अत्रे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, उपाध्यक्ष जय पुरंदरे, माजी आमदार उल्हास पवार, सासवडचे उपनगराध्यक्ष सुहास लांडगे, साहित्य परिषदेचे अपाध्यक्ष ॲड. प्रकाश खाडे, श्रीकृष्ण नेवसे,

सुनील महाजन, शिरीष चिटणीस, तानाजी कोलते आदी उपस्थित होते. तिन्ही पुरस्कारांत रोख रक्कम, मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ आदींचा समावेश आहे.

'जुना वाचक म्हातारा झालाय. तर नव्या पिढीत वाचक निर्माण होणार नाही, अशी माणसाची जीवनशैली झाली आहे. त्यामुळे परीक्षेचे निकाल शंभर टक्के लागलेले दिसतील, मात्र बौद्धिकदृष्ट्या अडाण्यांची फौज वाढेल.'' अशी खंतही पठारे यांनी व्यक्त केली.

भटेवरा म्हणाले, ''जीवनाचा आनंद देणाऱ्या खिडक्या उघडल्या पाहिजेत; पण आपण कॉम्प्युटरच्याच खिडक्यात गुंतून पडलो आहोत. त्यामुळे ग्रामीण भागातच जाणिवांचा मराठी वाचक शिल्लक आहे.''

मांगले म्हणाले, ''बोलीभाषा टिकल्या पाहिजेत. मातृभाषा जपली पाहिजे. तरच साहित्याचा अस्सलपणा आपल्याला दिसेल.''

''अत्रे यांच्या राहून गेलेल्या कलाकृती रंगभूमीवर आणण्याचा प्रयत्न आहे. त्यास कोणी प्रतिसाद दिल्यास आम्ही तोही उपक्रम हाती घेऊ.'' असे कोलते यांनी प्रास्ताविकात सांगितले.

भाई वैद्य यांना महात्मा फुले पुरस्कार

''लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचे स्वातंत्र्य नव्हे. समतानिष्ठ समाज, बंधुभावही महत्त्वाचा आहे. त्यासाठी नितांत प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. त्याशिवाय लोकशाही परिपूर्ण होणार नाही.'' असे मत समाजवादी विचारवंत भाई वैद्य यांनी व्यक्त केले.

महात्मा फुले स्मारक ट्रस्टचा 'महात्मा फुले पुरस्कार' सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते वैद्य यांना प्रदान करण्यात आला. या वेळी माजी महापौर दत्ता एकबोटे, भीमराव पाटोळे, विश्वनाथ परदेशी, शिक्षणतज्ज्ञ पी. ए. इनामदार आदी उपस्थित होते.

वैद्य म्हणाले, ''देशाला स्वातंत्र्य मिळाले याचा अर्थ प्रत्येकाला स्वातंत्र्य मिळाले असे होत नाही. राजकीय स्वातंत्र्य मिळाले; पण सामाजिक स्वातंत्र्य कोठे आहे याचा विचार व्हायला हवा.'' महात्मा फुले यांच्या विचारांबद्दल देशभर औत्सुक्य निर्माण झाले आहे. त्यामुळे त्यांचे विचार आजच्या काळात देशभर पसरत आहेत. कारण भारतीय समाजाला या विचारांची आवश्यकता आहे, असेही ते म्हणाले.

पाटील म्हणाले, ''समाजातील विषमता दूर होणे, एकमेकांना मदत करण्याची प्रवृत्ती वाढणे गरजेचे आहे.''

यशवंतराव महाले यांना संगीत भूषण पुरस्कार

शास्त्रीय संगीतात बंदिशीचे अंतरे गायचे नाहीत, अशी सध्या फॅशन झाली आहे. मात्र अस्थाई आणि अंतऱ्याशिवाय कोणतीही बंदिश पूर्ण होऊ शकत नाही. युवापिढीने या गोष्टींकडे दुर्लक्ष करू नये. असा सल्ला ज्येष्ठ शास्त्रीय गायक पं. यशवंतराव महाले यांनी तरुण गायकांना दिला.

गानवर्धन संस्थेच्या वतीने भेंडीबाजार घराण्याचे बुजुर्ग गायक पं. त्र्यंबकराव जानोरीकर यांच्या नावाने देण्यात येणारा 'संगीत भूषण पुरस्कार' पं. यशवंतराव महाले यांना ज्येष्ठ शास्त्रीय गायक आणि गुरू पं. शरद साठे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. दहा हजार रुपये आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

याप्रसंगी ज्येष्ठ गायक डॉ. सुहासिनी कोरटकर, संस्थेचे अध्यक्ष कृ. गो. धर्माधिकारी आणि डॉ. नीलिमा राडकर उपस्थित होते. पं. महाले म्हणाले, गुरूंकडून जी परंपरा मिळाली आहे. ती पुढच्या पिढीला देणे हे आमचे कर्तव्य आहे. घरात गायनाचा वारसा नव्हता. घरात केवळ रेडिओ होता. रेडिओवर प्रसारित होणाऱ्या नाट्य आणि शास्त्रीय संगीतातून संगीताचे संस्कार मनावर रुजले. चार गुरूंच्या चरणी शिकण्याची संधी मिळाली. रचनाकार नसूनही वेगवेगळ्या बंदिशी रचण्याचा प्रयत्न केला. त्याशिवाय संगीताला पूर्णता येत नाही. युवा पिढीने ही गोष्ट ध्यानात घ्यावी.''

सध्याच्या शास्त्रीय संगीताविषयी भाष्य करताना ते पुढे म्हणाले, बंदिशींचे अंतरे न गाण्याची फॅशन रुढहोत चालली आहे. मात्र नदी-सागर,मात्रा-ताल या प्रमाणे अस्थाई-अंतरे बंदिशीचा अविभाज्य भाग आहे.

स्वाती राजे यांना पुरस्कार

पुण्यातील भाषा फाउंडेशनच्या संस्थापिका स्वाती राजे यांनी भाषा जतनासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. जगप्रसिद्ध आर्ची कॉमिक्सच्या सीईओ नॅन्सी सिल्व्हरक्लेट यांच्या हस्ते न्यूयॉर्क येथील भारतीय दूतावासामध्ये १३ जुलैला एका समारंभात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येईल. स्वाती राजे

या मूळच्या पत्रकार असून गेली सात वर्षे त्या भाषा फाउंडेशनच्या वतीने भाषा संवर्धनासाठी काम करीत आहेत. शहर आणि ग्रामीण वाड्या-वस्त्यांमध्ये पुस्तक, घरे, रुग्णालयांमध्ये पुस्तक ट्रॉलीज, शाळांमध्ये भाषा विकास प्रकल्प, विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात त्यांनी पुढाकार घेतला आहे. चित्रांगण हा चित्रपट महोत्सव तसेच कथायात्रा हा कथा महोत्सव आयोजित करण्यातही त्यांचा पुढाकार असतो.

२री आवृत्ती

बंजाऱ्याचे घर

यशोधरा काटकर

किंमत - १९०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

घर हे मानवस्पर्शी अवकाशाचे एक रेखीव रूप. माणसाने पृथ्वीवर घर बांधले व तो घरात राहू लागला. तेव्हापासून हे 'राहते घर' मानवी मनांत 'घर करून' राहू लागले. आणि त्याच क्षणी या घराचे आणि मनाचे अगदी पहिले नाते जुळले - आणि युगायुगांतून ते वाढत राहिले.

मानवाने आपल्या देहाच्या रक्षणासाठी मातीचे घर बांधले; आणि आपल्या 'आत्म्या'च्या निवासासाठी स्वत:च्या देहाचेच घर उभारले. या देहमंदिरातच मानवी आत्म्याला पहिला निवास मिळाला. तेव्हापासून मानवी आत्मा माणसाला आधार देत आला आहे. या अनंत अवकाशाच्या पोकळीत घरानेच माणसाला आधार दिला. घराप्रमाणेच आत्मा हा माणसाला दुसरा आधार लाभला. घराशिवाय व आत्म्याशिवाय माणूस निराधार, परात्म होईल, पोरका, एकाकी पडेल. म्हणूनच माणसाला जशी घराची एक मूलभूत ओढ असते, तशीच त्याला आपल्या आत्म्याची, 'स्वत्वा'चीही मूलभूत ओढ असते. घर हे मानवाला आतून व बाहेरून ओढीत व वेढीत असते. म्हणून मानवाच्या भावसृष्टीत व प्रतीकसृष्टीत मनाला व आत्म्याला साकार करणाऱ्या घराच्या आदिबंधरूप प्रतिमांना महत्त्वाचे स्थान आहे.

'घराची आदिप्रतिमा आणि 'नटसम्राट' मधील घर' मधून, लेखक - प्रा. गंगाधर पाटील, 'नटसम्राट : समीक्षा' मधून, संपादक - प्रा. गो. तु. पाटील

महाराष्ट्रीय चवीचा परदेशात प्रसार

केवळ तीन इयत्ता इतकेच शिक्षण झालेल्या कमलाबाई ओगले ह्यांचे अनेक वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेले पाककलेवरील पुस्तक 'रुचिरा' आजही देश-परदेशात 'सुपरहिट' आहे.

एका परदेशी तरुणीला आपल्या चाकोरीबद्ध आयुष्यातला तोचतोचपणा कंटाळा आणतो. जीवनात नाविन्याचे रंग भरणारे, वैचित्र्य आणणारे काहीतरी तिला हवे असते. अशातच एक प्रसिद्ध 'रेसिपी-बुक' तिच्या हाती लागते.

फ्रान्समध्ये राहत असलेल्या एका अमेरिकन महिलेने पाककलेचे आपले अनुभव त्यात मांडलेले असतात. पुस्तक पाहिल्यावर त्या तरुणीच्या मनात एक विचार येतो. पुस्तकातल्या एकूण एक म्हणजे ५२४ रेसिपीज आपण स्वत: वर्षभरात करून बघायच्या आणि सोबतच त्या ब्लॉगवरही लिहायच्या. एका वर्षाच्या ह्या कालावधीत काय काय घडते आणि तिचा हा प्रवास कसा मजेदार होत जातो ते हॉलिवूड स्टार मेरील स्ट्रिपच्या ज्यूली अँड ज्यूलिया ह्या चित्रपटात अतिशय सुरेख रीतीने मांडले आहे.

ही झाली हॉलीवूड चित्रपटाची गोष्ट; परंतु तिच्या तोडीस तोड अशी एक

सत्य घटना प्रत्यक्षात घडली आहे.

एकीकडे 'ब्लॅक अँड व्हाईट' जमान्यातल्या कमलाबाई ओगले आणि दुसरीकडे 'मॉडर्न' जमान्यातली प्रीती देव... त्यांचीच ही गोष्ट!

१९१३ साली महाराष्ट्रातल्या गणेशवाडी नामक लहानशा गावात जन्मलेल्या कमलाबाईंचे वयाच्या तेराव्या वर्षी लग्न झाले. पतीच्या नोकरीच्या निमित्ताने त्या सांगली, जळगाव, बेळगाव असे हिंडत शेवटी मुंबईला स्थायिक झाल्या. कमलाबाईंचे शिक्षण अवघे तीन इयत्ता झालेले, सासूबाईंचा स्वभाव कडक पण वागणे मायाळूपणाचे. सुनेला स्वयंपाक करायला शिकवता शिकवता शिवण वगैरे गोष्टीही करायला लावत. तशातच मुंबईच्या 'वनिता समाज'बद्दल कुठूनसे कळले. झाले, त्यानिमित्ताने कमलाबाईंनी स्वयंपाकात कौशल्य प्राप्त करायला सुरुवात केली. दरवर्षी वनिता समाजाच्या पाकस्पर्धेत त्या भाग घेत आणि एकापाठोपाठ एक बक्षीसं पटकावत.

स्वयंपाक करण्यात त्यांना असलेली रुची ओळखून त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांना पाककलेचे वर्ग सुरू करायचे सुचवले. त्यावेळी त्यांची गर्भवती कन्या माहेरी राहायला आली. सगळ्यांच्या तोंडून आपल्या आईच्या स्वयंपाकाचे कौतुक ऐकून तिलाही आईकडून स्वयंपाक शिकून घ्यावा असे वाटले. एक एक करत सगळे पदार्थ कमलाबाई शिकवत गेल्या. लेक ते आपल्या वहीत लिहून ठेवत गेली.

एके दिवशी अचानकच ती म्हणाली, ''आई, ह्याचे एक पुस्तकच होईल की!''

... कमलाबाई ओगले ह्यांच्या 'रुचिरा' पुस्तकाचा जन्म झाला तो असा!

कमलाबाईंचे पती कृष्णाजी ह्यांनी सगळा मजकूर व्यवस्थितपणे लिहून काढला. जिने स्वयंपाकघरात कधी पाऊलसुद्धा ठेवले नसेल अशा व्यक्तीलाही त्या रेसिपी नुसार उत्कृष्ट पदार्थ करता यावा अशा पद्धतीने त्यांनी सर्व लेखन केले.

ह्यासंबंधी अधिक जाणून घेण्यासाठी प्रियदर्शिनीने (प्रस्तुत लेखिका) पुण्यात राहणारे कमलाबाईंचे नातू श्री. प्रसन्न ओगले ह्यांच्याशी संपर्क साधला. मोठ्या उत्साहाने त्या दिवसांना उजाळा देत त्यांनी म्हटले, ''पुस्तकाचे आत्ता आहे हे स्वरूप सादर करण्यात आमच्या आजोबांचा खूप मोठा वाटा आहे. त्यांना स्वत:ला चहादेखील करता येत नसे, पण आजीच्या सगळ्या 'रेसिपी' त्यांनी अतिशय नेटकेपणाने लिहिल्या आणि रुचिरा

साकारलं.''

किर्लोस्कर प्रकाशनाने हे पुस्तक छापावे अशी कमलाबाईंच्या कुटुंबीयांची इच्छा होती. पण... असे पुस्तक छापते का कोणी?

सत्तरच्या दशकातली ही गोष्ट आहे. त्याकाळी 'रेसिपी'चे पुस्तक? त्यामुळे प्रकाशकांनी एक अट घातली. पुस्तक खपले नाही तर कमलाबाईंच्या कुटुंबानेच उलट दहा हजार रुपये दिले पाहिजेत. अट मंजूर झाली आणि रुचिरा छापायची तयारी सुरू झाली.

गंमत म्हणजे, रुचिराची प्रथम आवृत्ती प्रत्यक्ष छापण्याआधी आगाऊ नोंदणीतच विकली गेली. मग काय, एकामागून एक आवृत्त्या निघत गेल्या. आज मेहता पब्लिशिंग हाऊस रुचिराच्या आवृत्त्या प्रकाशित करत आहे. इंग्रजी, मराठी आणि कानडी मिळून आत्तापर्यंत रुचिरा पुस्तकाच्या जवळपास पाच लाख प्रती विकल्या गेल्या आहेत.

प्रसन्नने प्रस्तुत लेखिकेला आवर्जून सांगितले, ''एक काळ असा होता की लग्नात मुलीला आहेर म्हणून रुचिरा पुस्तक हमखास दिले जायचे.''

ह्या पुस्तकाचे उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे ह्यात ग्रॅम, लिटर अशी प्रचलित मापे न वापरता त्याऐवजी घरात नेहमी वापरली जाणारी वाटी-चमचा ह्यांच्या प्रमाणात मापे दिली आहेत.

पुण्यापासून साडेसात हजार किलोमीटर दूर इंग्लंडमध्ये राहणाऱ्या प्रीती देव ह्या तरुणीलाही तिच्या लग्नात रुचिरा पुस्तक भेट मिळाले होते. तसे पाहता प्रीतीला कधी स्वयंपाक करावा लागला नव्हता. पण इंग्लंडमध्ये महाराष्ट्रीय चवीच्या पदार्थांची तिला आठवण येऊ लागली. तसे तिने स्वत: स्वयंपाक करायचे ठरवले. स्वयंपाकाची फारशी आवड नव्हती, पण एकदा रुचिरामधले पदार्थ करायला प्रारंभ केल्यावर मात्र स्वयंपाक करणे हा तिच्या आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग होऊन बसला. प्रीती म्हणते, ''स्वयंपाक करणे हे मन हलके करायचे एक साधनच झाले आहे. कधी कसले टेन्शन वाटले, दिवस चांगला गेला नाही तर सरळ स्वयंपाकघरात जाऊन नवीन पदार्थ करायला घेतला की बाकी सगळे विसरायला होते.''

कमलाबाईंच्या रुचिरापासून प्रेरणा घेऊन प्रीतीने 'रुचिरा विदेशिनी' नावाचा ब्लॉग सुरू केला आहे. आपल्या ब्लॉगच्या माध्यमातून ती कमलाबाईंचे पदार्थ जगभरातल्या लोकांपर्यंत पोहोचवत असते.

प्रीतीने प्रस्तुत लेखिकेला सांगितले, ''आजवर मी रुचिरातले शंभर पदार्थ करून बघितले आहे आणि त्यापैकी सुमारे साठ पदार्थ ब्लॉगवर प्रसिद्ध

केले आहेत. आणि अजून सातशे पदार्थ करून बघायचे शिल्लक आहेत. केवळ गृहिणी असो की नोकरी करणारी स्त्री असो, स्वयंपाक सगळ्यांनाच करावा लागतो.''

इंग्लंडमध्ये भारतीय संस्कृती आणि कला ह्यांचा वारसा जपणाऱ्या संस्थेत प्रीती काम करते. त्याखेरीज, शारीरिक दृष्ट्या कमकुवत असणाऱ्या मुलांच्या शाळेला ती आपला वेळ देते.

कमलाबाई आणि प्रीती ह्यांसारख्या स्त्रिया म्हणजे देशभरातल्या स्त्रियांसाठी एक उत्तम उदाहरण आहे. आपल्या चाकोरीबद्ध सपाट आयुष्यातच जीव ओतून त्यांनी काही तरी नावीन्यपूर्ण करून दाखवले. दोन अतिशय विभिन्न काळातल्या ह्या स्त्रियांनी स्वयंपाक करणे ह्या सर्वसाधारण गोष्टीला आयुष्याला सार्थकता देणाऱ्या ध्येयाचे रूप दिले आहे.

प्रीतीच्या मते प्रत्येक स्त्री 'सुपर वुमन' असते. गरज आहे ती हे वास्तव मनोमन स्वीकारून आपली क्षमता ओळखण्याची आणि स्वत:ला अधिक समर्थ बनवण्याची!

मूळ गुजराती लेख
'विदेशमां जाम्यो महाराष्ट्रीयन चटको'
लेखिका : (प्रियदर्शिनी) अमी ढबुवाला
मराठी अनुवाद : सुषमा शाळिग्राम
मो. ९९२१०१४४३३

चंपी मालिश आणि था..था..था!

लेखक
राजीव तांबे

किंमत - ६०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.





‘स्वामी’कार रणजित देसाई



साठोत्तरी कालखंडात रणजित देसाई हे नाव चमकू लागले.

‘स्वामी’ प्रसिद्ध होऊन पन्नास वर्षे उलटून गेली. ‘स्वामी’च्या लोकप्रियतेत यत्किंचितही फरक पडला नाही. पिढ्या बदलल्या, परंतु ‘स्वामी’ची गारूडमोहिनी तितकीच घनदाट आहे.

‘स्वामी’ प्रसिद्ध होण्याअगोदर नाथमाधव आणि वि.वा.हडप ह्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांनीसुद्धा इतिहास घडविला होता. परंतु वि. स. खांडेकर यांच्या ‘ययाति’ पाठोपाठ ‘स्वामी’ प्रगट झाली आणि कादंबरी वाङ्मयाच्या नव्या इतिहासाची सुरुवात झाली. ‘स्वामी’ पाठोपाठ ‘श्रीमानयोगी’ लिहून रणजित देसाई ह्यानी छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र ललित गद्याच्या काव्यात्म पातळीवर कथन करून एक नवा प्रवाह निर्माण केला. वि.स.खांडेकर यांनी पौराणिक कथानकावर आधारित, महाभारताचा आधार घेत कादंबरी लेखनात ‘ययाति’ हा अनोखा प्रयोग केला तसाच प्रयोग रणजित देसाई यांनी ‘स्वामी’मधून केला. साठोत्तरी साहित्यात ‘स्वामी’चे स्थान ध्रुवासारखे अचल आहे. मराठी भाषेतले ऐतिहासिक कादंबरी लेखनाचे हडप – नाथमाधव युग मागे पडले होते. ‘ययाति’, ‘स्वामी’ आणि श्रीमानयोगी’ या तीन कादंबऱ्यांनी नवे सुवर्णयुग निर्माण केले. ऐतिहासिक सत्याचा अपलाप न करता, चरित्रनायकाला नव्याने न्याय देत, समर्थपणे नाट्य उभे करण्याची तरल भाषा रणजित देसाई ह्यांना जन्मजातच लाभली होती.

१९४६ साली 'प्रसाद' मासिकात त्यांची 'भैरव' ही कथा त्यांच्या वयाच्या अठराव्या वर्षी प्रसिद्ध झाली होती. लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ होण्याचे भाग्य रणजित देसाई ह्यांना ऐन तारुण्यात लाभले. अत्यंत उमद्या दिलाचे, मनस्वी वृत्तीचे, चरित्रनायकाच्या अथांग मनाचा तळ गाठणारे व्यक्तिमत्त्व समर्थपणे उभे करण्याचे कसब प्रगट करणारे रणजित देसाई हे एक अजब रसायन होते.

कोल्हापूरजवळ असलेल्या 'कोवाड' ह्या गावातल्या एका संपन्न खानदानी कुटुंबात त्यांचा जन्म ८ एप्रिल १९२८ रोजी झाला आणि ६ मार्च १९९२ रोजी वयाच्या ६४व्या वर्षी त्यांचे निधन झाले. १९५८ साली ऐन तिशीत त्यांचा 'रूपमहाल' हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला. १९६२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'स्वामी'ने त्यांना कीर्तीच्या कैलास शिखरावर नेऊन ठेवले. 'स्वामी'ला १९६४चा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. भारत सरकारने त्यांना 'पद्मश्री' हा मानाचा किताब बहाल केला. रसिकमान्यता, लोकमान्यता, राज्यमान्यता लाभलेले रणजित देसाई हे विन्रम स्वभावाचे मोठ्या दिलाचे, प्रतिभावंत होते. 'गंधाली' ह्या कथासंग्रहातील संभाजीराजांच्या जीवनावरील 'नक्षत्रकथा' 'स्वामी' सारखीच अजरामर आहे. 'पुतळाबाई'चे भव्य व्यक्तिमत्त्व आणि संभाजीराजांचे अवघे अस्तित्व उजळून टाकणारी 'नक्षत्रकथा' 'श्रीमानयोगी' नंतर प्रसिद्ध झाली. 'श्रीमानयोगी'ची पारायणे करणाऱ्या वाचकांनी 'नक्षत्रकथा' आवर्जून वाचावी. 'गंधाली' ह्या दीर्घकथासंग्रहात, प्रेमासाठी सर्वस्व पणाला लावणारे मेहरुन्निसा आणि सलिम जसे आहेत (विराणी) तशीच बाजीरावाच्या मृत्यूने विष प्राशन करणारी मस्तानीसुद्धा आहे. (अशी रंगली प्रीत) बंदेअलीच्या जीवनाचा सूर असलेली प्राणप्रिय पत्नी चुन्ना निवर्तल्यावर वेदनेने पिळवटलेला अस्सल कलावंत जसा आहे (अशी छेडली तार) तशीच सती गेलेली, परंतु सती जाता जाता इतरांची आयुष्यं उजळवणारी पुतळाबाईसुद्धा आहे. (नक्षत्रवर्षा) स्नेहाने मुत्सद्यांची हृदये जिंकणारी बुद्धिमान माहेलकासुद्धा आहे. (असा रंगला विडा). प्रेम हा गाभा असणारी 'गंधाली' प्रत्येक रसिकाने वाचावी अनुभवावी अशी कलाकृती आहे.

वामन देशपांडे
९३२४६१५०७७

मायकल जॅक्सन

मायकलचा करिष्मा

लेखक
जे. रँडी ताराबोरेली
अनुवाद
रेश्मा कुलकर्णी-पाठारे

‘किंग ऑफ पॉप’चा कलाकार व ‘वादग्रस्त व्यक्ती’ म्हणून गाजलेला ताल-सुरांच्या सुसाट आविष्काराने कोट्यवधी रसिकांना भुरळ घालणारा मायकल जॅक्सन याचे भन्नाट चरित्र

अमेरिकन पत्रकार जे. रँडी ताराबोरेली यांनी अग्रगण्य पॉपसिंगर मायकल जॅक्सन याचे चरित्र प्रथम १९९१ मध्ये लिहिले. नंतर इ.स. २००३, २००४ व २००९ मध्ये त्यात बरीच भर घातली. त्याबद्दलचे तपशील त्यांनी प्रस्तावनेत दिले आहेत.

मी मायकल जॅक्सनला पहिल्यांदा भेटलो; तेव्हा आम्ही दोघंही लहानगी, शाळकरी मुलं होतो. मला आजही ती तारीख अगदी आवर्जून आठवतेय : शनिवार, २ मे, १९७०. संध्याकाळची वेळ होती – नव्यानेच कीर्ती मिळवू लागलेले ‘द जॅक्सन ५’, मोटाऊन रेकॉर्ड्सशी झालेल्या त्यांच्या करारानंतरचा पहिला कार्यक्रम देण्यासाठी ‘फिलाडेल्फिया कन्व्हेन्शन सेंटर’मध्ये दाखल झाले होते. पाचही भावंडांसाठी तो काळ फारच उत्साहाचा होता. त्या वेळी झपाट्याने बदलणाऱ्या आयुष्याशी मेळ जमवताना ११वर्षांच्या मायकलची तर अंमळ दमछाकच होत होती. पण त्याच्या उत्साहाला असं काही उधाण आलं होतं की, ह्या गोष्टी फार किरकोळ वाटू लागल्या होत्या. त्या काळची मायकलची जी मूर्ती माझ्या डोळ्यांसमोर आहे; ती अतिशय आनंदी, खेळकर, जिवंत अशी....

नंतर मात्र सगळंच बदलत गेलं... विस्कळीत होत गेलं! आम्ही दोघेही मोठे झालो; पण अगदी परस्परविरोधी जीवनकहाण्या रचत....

वयाच्या १८व्या वर्षी, लॉस एन्जिलीसला जाऊन लेखक म्हणून कारकिर्द घडवण्याचा प्रयत्न करू लागल्यावर मी बऱ्याच मासिकांसाठी व नियतकालिकांसाठी मायकलच्या मुलाखती घेतल्या. आजही तो दिवस मला लख्ख आठवतोय, जेव्हा मी ‘मायकल टर्न्स २१’ हा लेख लिहिला. त्यानंतर ‘मायकल टर्न्स २५’, ‘मायकल टर्न्स ३०’ इत्यादी स्वरूपात, प्रसंगानुरूप त्याच्या व त्याच्या कुटुंबीयांच्या यशोगाथा सांगणाऱ्या लेखांची मालिका सुरूच राहिली.

मायकल जसजसा मोठा होत गेला – वयाने आणि महतीनेसुद्धा – तसतसा मी वाढत्या संभ्रमाने (आणि खेदाने!) त्याच्या चित्रविचित्र प्रवासाचा आढावा घेत राहिलो. एका गोंडस, उत्साही बालकापासून त्याच्या मृत्यूपर्यंत मायकलमध्ये झालेल्या शारीरिक व मानसिक बदलांनी मला हताश केलं. एक पत्रकार आणि त्यातही मायकलच्या अद्‌भुत प्रवासाचा सतत मागोवा घेणारा लेखक म्हणून, मला त्याच्या ह्या क्लिष्ट जीवनाकडे शक्य तितक्या तटस्थपणे पाहून त्यातून काहीतरी सूज्ञ असा अर्थ काढावा लागला. एखादं अजस्र, कठीण कोडं सोडवण्यासारखं काम होतं ते!

गेली कित्येक दशकं घेतलेल्या मायकलच्या मुलाखतींमुळे किंवा त्याच्याशी मारलेल्या अनौपचारिक गप्पांमुळे, मला ह्या पुस्तकामध्ये वेळोवेळी त्याने काढलेल्या उत्स्फूर्त उद्‌गारांना, केलेल्या टिप्पण्यांना आणि मारलेल्या टोमण्यांना, त्याच्या शब्दांत मांडता आलेले आहेत.

हे पुस्तक तुम्हाला मायकलचं आरस्पानी दर्शन घडवून देईल आणि त्याच्याशी अधिकच जवळीक साधून देईल, ह्यात शंका नाही!

१९७७मध्ये मी जॅक्सन कुटुंबाच्या कॅलिफोर्निया येथील एन्सिनो-मधल्या घरात मायकलची मुलाखत घेण्यासाठी गेलो होतो. त्याची वाट बघत दिवाणखान्यात थांबलो होतो. थोड्या वेळाने १९ वर्षांचा मायकल आत आला, तोच चेहऱ्यावर भरपूर पट्ट्या बांधून! त्याचं ते रूप पाहून मला भडभडून आलं – कारण मला त्या क्षणी खात्री पटली की, त्याचे वडील जोसेफ मायकलला बेदम मारायचे, ह्या वावड्या खऱ्या होत्या. मला हे समजायला बरीच वर्षं गेली की, त्या पट्ट्या मायकलच्या अगणित सौंदर्यवर्धक शस्त्रक्रियांपैकी एका शस्त्रक्रियेनंतरचे व्रण झाकण्यासाठी बांधल्या गेल्या होत्या.

त्यानंतर मी १९७८मध्ये मायकलची मुलाखत घेतली, जेव्हा तो नुकताच 'द व्हिज' बनवून न्यू यॉर्कहून परतला होता. त्या मुलाखतीत मायकलने मला सांगितलं की, त्याची काही खास गुपितं होती, जी त्याला कधीच कोणाहीसमोर उघड करण्यात रस नव्हता. 'सगळ्यांकडेच स्वत:ची अशी काही खास, गूढ गुपितं असतात. तशीच ती माझ्याकडेही आहेत; आणि ती मला कोणालाही सांगायची इच्छा नाहीये... तुलासुद्धा नाही!' पुढे जाऊन त्याचे ते शब्द, तो आवाज माझ्या मनात सतत रुंजी घालत राहिले... विशेषत: जेव्हा त्याचं वागणं अधिकाधिक अपारदर्शक, गोंधळून टाकणारं

बनत गेलं तेव्हा.

मायकल जॅक्सन ह्या व्यक्तिमत्त्वात असं काय आहे की, ज्याच्यामुळे आपण इतक्या वर्षांनंतरही त्याच्या करिष्म्याची चर्चा करीत राहिलेलो आहोत? त्याचे अद्वितीय कलागुण? निश्चितच, तो एक मोठा घटक आहेच. त्याचा आवाज हा एकमेवाद्वितीय म्हणण्यासारखा होता आणि त्याचं नर्तन तर आजही भल्याभल्यांना गारद करीत आहे; ज्याप्रमाणे मायकल स्वत: जॅकी विल्सन आणि जेम्स ब्राऊन यांच्या कलाकारीने प्रेरित होता. तसाच तो स्वत:देखील, तरुण कलाकारांच्या एका अख्ख्या पिढीसाठी प्रेरणास्रोत ठरलेला आहे. विचार करून बघा : जेव्हा तुम्ही आज जस्टिन टिंबरलेकला नाचता-गाताना पाहता, तेव्हा तुम्हाला मायकलची आठवण येते ना?

मात्र मायकलचा करिष्मा हा केवळ त्याच्या दैवी कलागुणांतून तर जाणवतोच. तसेच आपल्यापैकी लाखो लोकांच्या आयुष्याचा प्रवास हा मायकलच्या प्रवासाशी समांतर असा झाला आहे. तीसपेक्षा अधिक वर्षं लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ह्या कलाकाराच्या जीवनातील कित्येक महत्त्वाचे टप्पे, आपण आपल्या स्वत:च्या आयुष्याशी सांगड घालून आठवू शकतो. आपल्यापैकी बऱ्याच जणांना, 'द जॅक्सन फाइव्ह'च्या ह्या त्या काळी लहान असलेल्या मुख्य गायकाचा लोभसवाणा आवाज आणि निरागस आविर्भाव स्पष्टपणे आठवत असेल. त्यानंतर, ही पाच भावंडं लोकप्रियतेची शिखरं लीलया सर करताना आपण स्वत: कुठे होतो, हेदेखील आपल्याला आठवत असेल. आपल्याला तो दिवस आठवत असेल, जेव्हा मायकलने पहिल्यांदा आपल्या सुप्रसिद्ध 'मूनवॉक'ने चक्रावून सोडले. तोही दिवस आठवत असेल, जेव्हा मायकलने 'वी आर द वर्ल्ड'म्हणत, प्रसिद्ध कलाकारांच्या एका गटाचं नेतृत्व करत, पहिली चित्रफीत सादर केली. त्याची एकापेक्षा एक सरस अशी गाणी, कार्यक्रम (कॉन्सट्र्स) आणि नृत्ये तर केवळ अविस्मरणीय!!!

मायकलने अगदी देदीप्यमान कारकिर्द बनवली असं म्हणणं, हे केवळ एका अटळ सत्याचं पुनरुच्चारण ठरेल. मात्र, त्याच्या नवा इतिहास रचणाऱ्या कारकिर्दीहून अधिक जर आपल्याला अजून कशाने खिळवून ठेवलं असेल, तर ते मायकलच्या खासगी आयुष्याने!

मायकलच्या गाण्यांप्रमाणेच त्याची 'नवनवीन रूपं' आपल्यासमोर येत राहिली... ती बघून, वाटत असे की 'काय खेळ चालवलाय ह्या माणसाने

आपल्या आयुष्याशी!'

तुम्ही कधी ना कधी हा विचार केला असेलच की, मायकल समलिंगी होता की 'अ-लैंगिक' होता?

त्याच्यावर 'पेडोफाईल' (लहान मुलांचं लैंगिक शोषण करणारा.) असा ठपका लागल्याचं समजताच, तुमच्या मनात सगळ्यात आधी कुठला विचार चमकून गेला?

तुम्हाला मायकलने 'नेव्हरलॅन्ड'मधून केलेलं ते भाषण आठवतंय का? त्यामध्ये त्याने तो 'विदारक' अनुभव कथन केला. 'पोलिसांनी माझ्या सगळ्या शरीराचे फोटो काढले – माझ्या मांड्या, माझी कंबर, माझे नितंब, माझं शिश्न... ज्या कुठल्या भागांचे त्यांना फोटो काढायचे होते, ते सगळे काढले...!'

आणि लिसा मारी प्रेस्ली व डेबी रोए ह्या त्याच्या गूढ, घटस्फोटित बायकांचं काय? मायकल आणि त्यांच्यातल्या नात्याच्या खऱ्या स्वरूपाबद्दल तुम्ही कधीतरी विचार केलाच असेल ना?

मायकलला मुलं झाली आणि त्याने त्यांना लोकांमध्ये नेलं, पण बुरख्यांमध्ये दडवून, मुखवट्यांमागे लपवून!

'स्ट्रेंजर इन मॉस्को' ह्या गाण्यात मायकलने कळवळून विचारलं होतं की, 'हाऊ डझ इट फील व्हेन यू आर अलोन ॲन्ड यू आर कोल्ड इन्साइड?' हंऽऽ... तो असा का बनला? ...

अर्थात, आपल्या सगळ्यांनाच हे माहितेय की, 'कीर्ती' ही गोष्ट भल्याभल्यांना आधी 'वेड लावते' आणि मग 'वेडं बनवते'! 'लोकप्रियतेची नशा' ही संकल्पना त्यांनाच उमजते, जे त्या स्तराची लोकप्रियता उपभोगतात. पण तरीही, जरा कल्पना करून बघा : तुमचं संपूर्ण आयुष्य, घरामध्ये एका हुकूमशहा बापाच्या भीतीच्या छायेत आणि घराबाहेर, तुमच्या प्रत्येक शब्दाचं, कृतीचं जिथे सतत निरीक्षण केलं जातं, त्याच्या अर्थ-अन्वयार्थाची चिरफाड करून तुमच्या मन:स्थितीबद्दल तर्क-कुतर्क केले जातात अशा वातावरणात गेलं, तर तुम्ही कसे बनाल? लहानपणापासून तुमच्यात दिव्य असे कलागुण दिसल्यावर तुम्हाला सतत गोंजारून ठेवणाऱ्या, तुमचे नको ते लाड करणाऱ्या चाहत्यांच्या गराड्यात तुम्ही मोठे झालात, तर तुम्ही कसे बनाल? असं वाटतं का की, त्या परिस्थितीत तुम्ही (वयाने) मोठे झाल्यानंतर, लोकांचं गोंजारणं थांबल्यावर, ती पोकळी भरून काढण्यासाठी तुम्ही स्वत:च स्वत:ला गोंजारत

राहाल? स्वत:चे चित्रविचित्र लाड पुरवत राहाल? नैराश्याने, रटाळपणाने, जराशा अपयशाने तुम्हाला ग्रासल्यावर, तुम्ही तुमच्या सगळ्या सदसद्विवेकबुद्धीला झुगारून, असे काही माकडचाळे कराल का, ज्यामुळे तुमच्या मानसिक-संतुलनाबद्दलच शंका घ्यायची वेळ येईल?

तुमच्याकडे जर अमाप पैसा असेल – इतका की, त्यामधून तुम्ही तुम्हाला पाहिजे ती; वाट्टेल त्या किमतीची गोष्ट विकत घेऊ शकाल – आणि त्यातही तुमच्या बेसुमार खर्चाबद्दल अटकाव करायला आणि त्यामागे दडलेल्या टोकाच्या असुरक्षिततेला ओळखून त्याबद्दल समुपदेशन करायला तुमचं कुणीच आप्तस्वकीय जवळ नसेल, तर तुम्ही कसे वागाल? काय-काय खरेदी कराल? स्वत:च्या त्वचेचा रंग आवडत नाही म्हणून वैद्यकीय मदतीने तो बदलून टाकाल? तुमचं सगळं बालपण नासून गेलं... किंबहुना तुम्हाला बालपण असं मिळालंच नाहीतर काय कराल? 'नेव्हरलॅन्ड'सारखं काहीतरी विस्मयचकित करणारं बांधकाम करून त्यात तुमचं हरवलेलं बालपण शोधत बसाल? तुम्हाला लहान पोरांना कुशीत घेऊन झोपायला आवडत असेल, तर काय कराल?...अरे, ते तर फार सोपं आहे... चार-सहा पोरं गोळा करून त्यांना आपल्यासोबत राहायला बोलवू शकाल, हो की नाही?! बरंऽऽ तुम्हाला तुमचा चेहराच आवडत नसेल, तर काय कराल? नवा चेहराच 'विकत' घ्याल? आणि तोसुद्धा नाही आवडला तर? तर काय? अजून एक चेहरा विकत घ्याल, असंच ना? मग अजून एक... अजून एक....!

आपण आयुष्यभर स्वत:लाच विचारत राहिलो की, 'मायकलने स्वत:शी जो जीवघेणा खेळ चालवलाय, त्याचे परिणाम किती भयानक होतील, हे त्याला समजत का नाहीये? का समजत नाहीये त्याला?'

तसंही मायकलच्या मनात त्याची स्वत:ची प्रतिमा होती तरी कशी? त्याने स्वत:कडे काय म्हणून बघितलं? चाहत्यांवर आपल्या कलेचं गारुड टाकलेला 'किंग ऑफ पॉप' म्हणून? सदैव वादाच्या भोवऱ्यात सापडलेला एक अतिप्रसिद्ध पण तितकाच वादग्रस्त कलाकार म्हणून? की केवळ एक असा दु:खी माणूस म्हणून, ज्याच्याकडे वाट्टेल ते करून आपल्या दु:खाला दूर सारण्याइतपत सत्ता आणि पैसा दोन्हीही होतं?

ह्या सगळ्यातून, एकच गोष्ट खरी वाटते : तुम्ही जर या 'गुणविशेषां'ना एकत्र करून निर्माण झालेली व्यक्ती असता, तर तुम्ही असता... मायकल जॅक्सन!!!

सिनेतारका तातुम - पहिली गर्लफ्रेंड

ऑगस्ट १९७७मध्ये १९ वर्षांचा मायकल आपल्या काळातला अत्यंत लोकप्रिय कलाकार आणि तरुण मुलींच्या 'दिल की धडकन' म्हणून नावाजला जाऊ लागला. त्याचे भाऊ जरी बिनदिक्कतपणे आपल्याभोवती घुटमळणाऱ्या मुलींचा यथेच्छ 'फायदा' घेत असले; तरी मायकलला कधीच तसं करावंसं वाटलं नाही. त्याच्या गाण्यांमध्ये बराच मादकपणा असला आणि त्याचे नृत्याविष्कारही त्या दृष्टीने बरेच बिनधास्त (आणि प्रसंगी बटबटीत!) असले, तरी वैयक्तिकरीत्या मायकलची कामोपासना त्याच्या भावंडांप्रमाणे मोकाट सुटलेली नव्हती.

१९७७मध्ये एका मुलाखतीत मायकलने मला सांगितलं, ''मुलींना मी 'सेक्सी' वाटतो, हे ऐकून मला छान वाटतं. पण खरं सांगायचं तर, मी स्वत:बद्दल कधीच तसा विचार करत नाही. हे सगळं माझ्या निर्माण केलेल्या प्रतिमेचा भाग आहे की, मुलींना मी आकर्षक वाटतो. आणि माझ्या चाहत्यांना जर माझ्या गाण्यामुळे नृत्यामुळे आनंद मिळत असला – जर त्यांना मी त्यामुळे रोमॅन्टिक वाटून हवाहवासा वाटत असेन – तर मला त्याबद्दल मनापासून आनंद आहे आणि त्यांच्याबद्दल कृतज्ञताही. पण प्रत्यक्ष आयुष्यात मी तसा मुळीच नाहीये.''

मायकल किशोरवयीन असताना त्याच्या निकट आलेले लोक एकमुखाने कबूल करतात की, त्याच्या वयाची मुलं जेव्हा पहिल्या प्रेमाची गोडी चाखत होती, त्या वेळी मायकलला मात्र आपल्या कामाशिवाय जग नव्हतं. त्याने त्या काळी कधीच कुठल्या मुलीला, एखादं गोड नातं बनवण्याच्या दृष्टीने 'डेट' केल्याचं ऐकिवात नाही. मायकलच्या ह्या विरक्तीमागचं असंही कारण असू शकेल की, इतकं गहन नातं बनवण्यासाठी जो विश्वास लागतो, तोच कुणावर दाखवायला तो तयार नसायचा. कदाचित त्याने आतापर्यंत ज्या व्यक्तींवर प्रेम केलं, विश्वास दाखवला – मग ते वडील जोसेफ असोत, वा त्याचे भाऊ वा बेरी गॉर्डी – त्या सगळ्यांनी ह्या ना त्या प्रकारे मायकलचा विश्वास तोडला असल्यामुळे त्याला आता कुणावर विश्वास दाखवणं कठीण जाऊ लागलं. मायकलने जणू आपल्याभोवती एक संरक्षक कवच बांधून घेतलं – ते अभेद्य कवच फोडून मायकलच्या मनाला हात घालणं, कुठल्या मुलीला जमेचना. तरीही मायकलला कलाकाराच्या

आयुष्यात 'जनसंपर्क' आणि 'प्रतिमा' ह्या दोन गोष्टींचं अनन्यसाधारण महत्त्वं चांगलंच माहीत असल्यामुळे तो आपल्या चाहत्यांना खूश ठेवण्यासाठी काही लुटुपुटुचे नातेसंबंध जोडायचा खरा.

२००३मध्ये मार्टिन बशीरला दिलेल्या मुलाखतीमध्ये मायकलने म्हटले होते की, सिनेतारका तातुम ओ'नील ही त्याची सगळ्यात पहिली 'गर्लफ्रेंड' होती. १९७७मध्ये तातुम १३ वर्षांची असताना मायकल आणि तिचं सूत जमलं. मात्र ती त्यांची पहिली भेट नव्हती. दोन वर्षांपूर्वी (१९७५ मध्ये) ते दोघं कॅलिफोर्नियाला भेटले होते. कॅलिफोर्नियातल्या लाँग बीच येथे आपल्या क्वीन मेरी ह्या जहाजावर पॉल म'कार्टनीने दिलेल्या एका पार्टीत मायकल आणि तातुमची पहिली भेट झाली होती. त्यानंतर दोन वर्षं त्यांच्यात काही संपर्क नव्हता. मग १९७७च्या वसंतात मायकलने तातुमला लॉस एन्जिलीसच्या एका क्लबमध्ये हेरलं. ती तिथे आपले वडील रायन ओ'नीलसोबत आली होती. सुझॅन ब्लॉन्ड आणि स्टीव्ह मॅनिंग ह्या एपिकच्या दोन जनसंपर्क अधिकाऱ्यांसोबत मायकल चर्चा करण्यात गुंतला असताना – त्याने सांगितल्याप्रमाणे – ''माझ्या मागून एका गोरापान, नितळ हात येऊन, त्याने माझ्या हाताला करकचून धरलं. वळून पाहतो, तर समोर तातुम उभी.'' तातुमने चक्क आपला हात धरला, ही गोष्ट मायकलसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली. ''माझ्या दृष्टीने तातुमने जे केलं त्यातून काहीतरी खूप गंभीर, खूप दीर्घकालीन असं प्रकट होत होतं. तिने चक्क माझा हात धरला. बापरे! मी तर आनंदाने घेरी येऊन पडायचाच बाकी होतो.''

दुसऱ्या दिवशी तातुमने मायकलला ह्यूग हेफ्नरच्या घरी होत असणाऱ्या पार्टीला तिच्यासोबत येण्याचं आमंत्रण दिलं. हा ह्यूग हेफ्नर म्हणजे अमेरिकेतल्या सुप्रसिद्ध 'प्लेबॉय' मासिकाचा प्रकाशक. आणि ती पार्टी होती त्याच्या हॉल्म्स्बी हिल्स इस्टेटमध्ये. तातुम आणि मायकल त्या पार्टीला गेले आणि मोठ्यांच्या गप्पांना कंटाळून शेजारच्या एका खोलीत ॲलेक्स हॅलीच्या सुप्रसिद्ध 'रूट्स' ह्या कार्यक्रमाचे व्हिडीओ-टेप पाहू लागले. थोड्या वेळाने तातुमला कार्यक्रम बघण्याचाही कंटाळा आला. तसं तिने मायकलला तिथल्या न्हाणीघरात असलेल्या प्रशस्त बाथ-टबमध्ये तिच्यासोबत डुंबायचं आमंत्रण दिलं. मायकल आढेवेढे घेऊ लागला – तातुमने त्याला त्यामागं कारण विचारल्यावर मायकलने तिला सांगितलं, ''आपल्याकडे बेदिंग-सूट्स

(पोहण्याचे पोशाख) कुठे आहेत?''

त्यावर तातुमने गालात जीभ घोळवत मायकलला विचारलं, ''आपल्याला बेदिंग सूट्सची गरजच काय?''

तिचा तो लाडिक प्रश्न ऐकून मायकलला जो घाम फुटला, ते पाहून तातुम खळखळून हसली आणि तिने एका सेवकाला त्यांच्यासाठी बेदिंग सूट्स घेऊन यायला सांगितलं.

तातुम खरोखरीच गोड मुलगी होती – अगदी एखाद्या परीसारखी. खांद्यावर रुळणारे तिचे सोनेरी केस रेशमासारखे मऊसूत होते. तिची कांती अगदीच लहान बाळासारखी गुलाबी-गोरी आणि नितळ होती आणि तिचा बांधा कमनीयच म्हणावा लागेल. ''ती स्वर्गातून आलेल्या एखाद्या बाहुलीसारखी आहे.'' मायकलने त्याच्या एका मित्राला तातुमबद्दल बोलताना सांगितलेलं.

त्या दिवशी ह्यूगच्या त्या प्रशस्त टबमध्ये डुंबताना मायकल आणि तातुम यांनी एकमेकांना आपली स्वप्नं उघड करून सांगितली.

त्या प्रसंगानंतर बऱ्याच वर्षांनी एका नियतकालिकातून ही बातमी फुटली की, त्या दिवशी मायकल आणि तातुम नग्नावस्थेत एकमेकांसोबत टबामध्ये डुंबले होते. मायकलला ती वार्ता वाचून किळस वाटल्याचं मला स्पष्ट आठवतंय. मी त्याला त्याबद्दल छेडल्यावर मायकलने मला ठाम स्वरात सांगितलेलं, ''छे! काहीतरीच काय? आम्ही अजिबात नग्न नव्हतो. दोघांनीही छान बेदिंग सूट्स घातलेले. काही लोकांना प्रत्येक गोष्टीत काहीतरी बीभत्सच का दिसतं?''

तातुम ओ'नीलने वयाच्या अवघ्या ९व्या वर्षी 'पेपर मून' ह्या चित्रपटातल्या आपल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल ऑस्कर पुरस्कार पटकावला होता. एका देवभोळ्या ठकसेनाच्या सिगारेटी फुकणाऱ्या, शिव्या घालणाऱ्या साथीदाराची भूमिका तातुमने खरंच झकास रंगवली होती. ठकसेनाच्या भूमिकेत तिचे वडील रायनच होते.

अशा ह्या गुणी नटीचं बालपण मात्र फारच दयनीय आणि क्लिष्ट गेलं. जोॲन्ना मूर आणि रायन ओ'नील ह्या सिनेतारकांची मुलगी असलेल्या तातुमला, वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षी आपल्या आई-वडिलांच्या घटस्फोटाचं दुःख भोगावं लागलं. त्यानंतर काही वर्षं तातुम आपल्या

आईसोबत एका ओस पडलेल्या शेतावरच्या पडक्या घरामध्ये राहिली. एक मरतुकडा घोडा, पटापट मरून पडणाऱ्या काही कोंबड्या आणि अमली पदार्थाच्या नशेत आपली कला व आयुष्य हरवून बसलेली आई ह्यांच्या सान्निध्यात तातुमने पाच वर्षं काढली. वयाच्या सातव्या वर्षापासून तातुम स्वत:साठी आणि तिची आई व लहान भाऊ ग्रिफिनसाठी जेवण बनवू लागली, जमेल तशी फुलांची शेती करू लागली. रायनला आपल्या मुलांना शनिवार-रविवारी भेटायला यायची मुभा होती.

रायन एकदा म्हणाला होता, ''तातुम आपल्या आईसोबत राहात असताना मी तिच्या केसांकडे बघून हे सांगू शकायचो की, ती कितपत दु:खात किंवा आनंदात आहे. कारण तातुम खुशीत असताना तिचे केस छान बांधलेले असायचे. पण जर तिला तणाव सोसावा लागला, तर तिच्या केसांचे पुंजकेच्या पुंजके गायब असायचे. ताण असह्य झाला की, तातुम आपले केस कापून टाकायची.''

१९७२मध्ये थकल्या-भागल्या जोॲन्नाने अखेर परिस्थितीसमोर शरण जाऊन, रायन तिला देऊ करत असलेल्या प्रतिवर्ष ३०,००० डॉलर्सच्या पोटगीचा स्वीकार केला. रायनने मात्र आपल्या ह्या मदतीच्या बदल्यात जोॲन्नाकडून तातुमला मागून घेतलं. तोपर्यंत तातुम ८ वर्षांची झालेली आणि तिच्या मनात आपल्या आईबद्दल प्रचंड तिरस्कार रुजला होता. त्यामुळे आपण आता रायनसोबत राहायला जाणार, हे समजल्यावर तिच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. जोॲन्नाबद्दल तातुमच्या मनात किती संताप होता, हे त्या प्रसंगावरून लक्षात येईल, जेव्हा तिला जोॲन्नाला भेटायला इस्पितळात नेलं गेलं. आपल्या आईला तिथे त्या गर्भगळित अवस्थेत पाहून तातुमला तिचा इतका द्वेष वाटला की, ती चक्क आपल्या आईच्या तोंडावर पचकन थुंकली....

तातुमने आपली ही जीवनकहाणी सांगितली, तेव्हा मायकलला आपले अश्रू आवरेनात. त्याने सांगितलं की, आतापर्यंतच्या आयुष्यात कधीच इतकी दु:खद घटना ऐकली नव्हती.

१९७७मध्ये मायकलने केलेलं एक विधान बरंच बोलकं आहे. तो म्हणाला, ''माझी आई तर संताचा अवतार आहे. मी जेव्हा तातुमकडून तिच्या आईबद्दल ऐकलं, तेव्हा मी मनोमन देवाचे हजारदा आभार मानले की,

त्याने मला कॅथरीनसारखी आई दिली. लोकांना वाटतं की, माझं आयुष्य कठीण आहे; पण तातुमकडे बघा. इतक्या समस्यांनी घेरूनदेखील तिने आपल्या हिमतीवर त्यातून मार्ग काढला. तिच्या ह्या जिगरबाज स्वभावासाठीच ती मला फार आवडते.''

त्याच्या आत्मकथनामध्ये मायकलने नमूद केलंय की, तातुम त्याचं पहिलं प्रेम होतं – ''अर्थात डायनानंतर.'' तातुम मात्र नेहमी असंच म्हणत आली की, मायकल तिचा खूप जवळचा मित्र होता, अजून काही नाही.

त्या काळी तातुमची मैत्रीण असलेली सिनेतारका सारा जॅक्सन (मायकलच्या परिवाराशी हिचं काहीही नातं नाही.) सांगते, 'तातुमने मला सांगितलेलं की, मायकल खूप सालस मुलगा आहे आणि अतिशय लाजाळूसुद्धा. मला माहितेय की, तो अजूनही त्याचं कौमार्य जपून आहे. त्याच्या मनात 'सेक्स' ह्या संकल्पनेबद्दल कसलीशी भीती दाटून राहिली आहे. त्याला शरीरसंबंध ठेवण्यात कधीच रस वाटत नाही.' ''

बहुतांश वेळेला प्रसारमाध्यमांनी मायकलबद्दल धादान्त खोट्या आणि (त्याच्यावर) अन्यायकारकच बातम्या प्रसारित केल्या. मायकल लिंग-परिवर्तन शस्त्रक्रिया करून क्लिफ्टन डेव्हिस नावाच्या देखण्या नटाशी लग्न करणार होता. (डेव्हिस हा प्रसिद्ध नट असून, 'नेव्हर कॅन से गुडबाय'चा लेखकही होता.) अपेक्षितरीत्या त्या बातमीने मनोरंजन-क्षेत्रात एकच खळबळ माजवली.

मायकलने मला पुढे एकदा सांगितलं की, ती बातमी फुटली, तेव्हा तो दक्षिणेतल्या एका शहरामधल्या डिपार्टमेंटल स्टोरच्या संगीत विभागामध्ये हजर होता. मायकलने वर्णन करत मला सांगितलं, ''इतक्यात एक मुलगी माझ्याजवळ धावत आली आणि रडवेल्या स्वरात मला विनवू लागली, 'प्लीज! प्लीज मला सांग की, हे खोटं आहे. मी पाया पडते तुझ्या मायकल.' मला तर काही समजेचना. मी स्वत:शी विचार करू लागलो की, कशाबद्दल बोलत असावी ही मुलगी? शेवटी मला काहीच न सुचल्याने मी तिलाच थेट विचारलं की, 'कशाबद्दल बोलतेस तू? काय खरं नाहीये असं सांगू मी तुला?' तर ती माझ्याकडे अश्रूभरल्या डोळ्यांनी बघत उत्तरली, 'हेच... की, तू मुलगी बनणार आहेस. सांग मला की, हे खोटं आहे.' ''

त्याने त्या मुलीला विचारलं, ''कोणी सांगितलं हे तुला? कुठं वाचलंस

तू हे?''

तर ती मुलगी म्हणाली, '' 'जेट' मासिकात. त्या लेखात लिहिलंय की, तू लिंग-परिवर्तन शस्त्रक्रिया करून मुलगी बनणार आहेस.''

ती बातमी फालतू असली, तरी मायकलची पाठ सोडली नाही, हे तितकंच खरं. तो जिथे जाईल तिथे लोक त्याच्या ह्या लिंग-परिवर्तनाबद्दल कुजबुजू लागले. १९ वर्षांच्या त्या नाजूक वळणावर मायकलला – तो समलिंगी बनत असल्याचं – त्याच्यावर विनाकारण लागलेलं लांच्छन सहन करणं खूप कठीण जाऊ लागलं.

१९७९मध्ये घेतलेल्या त्याच्या एका मुलाखतीदरम्यान मी मायकलला विचारलेलं, ''तू एकदाच ठामपणे का स्पष्ट करत नाहीस की, तू 'गे' (समलिंगी) आहेस की, नाहीयेस?''

त्यावर मायकलने प्रचंड वैतागून मला उत्तर दिलेलं, ''नाऽऽही. मी गे नाहीये. मी समलिंगी नाहीये. मी अगदी साधासरळ मुलगा आहे. काही निरुद्योगी लोकांना जर असं वाटतं की, मी मला पुरुषांसोबत लैंगिक संबंध ठेवायला आवडतात, तर त्यामुळे मी माझं डोकं का फिरवून घ्यावं? मला माहितेय ना की, मी तसं काही करत नाही आणि मला तसं काही करायला आवडतही नाही... मग झालं तर!''

मायकल स्वत:शीच बडबडत असल्यागत पुढे बोलू लागला, ''माझ्या आवाजामुळे त्यांना असं वाटतं का? माझा आवाज असा मुलीसाखा किनरा असल्यामुळे त्यांना मी बायकी, आहे असं वाटतं का? पण आमच्या घरात सगळ्यांचेच आवाज तसे आहेत. मग का?... किंवा मग असं आहे का की, माझी कोणी गर्लफ्रेंड नाही, म्हणून त्यांना वाटतं की, मला मुलींमध्ये रसच नाहीये? मला तर काही समजेनासंच झालंय.'' मायकल हताशपणे उद्‌गारला.

मायकलची धार्मिक जडणघडण इतकी सनातनी होती की, तसल्या भावना त्याच्या मनाला कधीच पटल्या नसत्या आणि त्यातून उद्‌भवणारं, शरीर आणि मन यांमधलं द्वंद्व त्याला झेपलंही नसतं. जेहोवाज विटनेस पंथीय ह्या विचारावर ठाम असतात की, एक ना एक दिवस जगबुडी होणार आणि त्यात फक्त तेच लोक वाचणार, जे देवाला सर्वांत प्रिय आहेत. त्या पंथाची शिकवण अंगी बाणवत मोठ्या झालेल्या मायकलला सतत एक प्रश्न

सतावत असे की, जगबुडी झाल्यावर आपली राख होईल की, आपल्याला मुक्ती मिळेल? आणि त्याला अनुसरून मायकलच्या डोक्यात सतत एकच विचार येत असे की, त्याला जर आपल्या प्राणप्रिय आईसोबत जगाच्या अंतापर्यंत राहायचं असेल, तर त्याला तिने दिलेली एकन्एक शिकवण पाळणं भाग आहे. आणि त्या शिकवणींनुसार मायकलने समलिंगी असू शकणं म्हणजे अक्षम्य पातकच. मायकलने तसलं पातक करण्याचा विचारही करणं शक्य नव्हतं. कारण जेहोवाज विटनेस पंथात वाट चुकणाऱ्या वाटसरूला माफी नसते. त्याला वा तिला तात्काळ आपल्या गटामधून बाहेर फेकलं जातं. मायकल किशोरवयाचा होईपर्यंत त्याला आपलं आयुष्य जगण्यासाठी एक विशिष्ट आचरण-पद्धती आखून दिलेली होती आणि तिचा त्याच्या मनावर इतका खोलवर परिणाम झाला होता की, मायकलने ती आचरण-पद्धती धुडकावून काही निराळं करण्याचं धाडस करावं, हे केवळ अशक्य होतं.

भरीसभर म्हणजे इतकं सगळं असूनही जर मायकलने समलिंगी असण्याचं वा होण्याचं धाडस दाखवलंच असतं, तरी त्याला समाजासमोर आपल्या जीवनशैलीचं उघडपणे प्रदर्शन करणं अशक्य झालं असतं. मायकलला माहिती होतं की, त्याने कुणाशीही प्रेमसंबंध जोडले – मग ती स्त्री असो वा पुरुष – तरी त्याला सतत हे भय होतं की, समोरची व्यक्ती आपल्यातल्या नाजूक संबंधांचा बाजार मांडण्यात मुळीच पुढे-मागे बघणार नाही. एखाद्या सनसनाटी वर्तमानपत्राला वा नियतकालिकाला आपल्यातल्या खासगी गोष्टींबद्दल खरी-खोटी माहिती देऊन, ती व्यक्ती पैशाने गब्बर होऊन बसण्यात मुळीच कुचराई करणार नाही. मायकलला ह्या शक्यतेचंही सतत भान ठेवावं लागायचं की, आपली प्रत्येक कृती टिपायला आणि त्यातून खरे-खोटे तर्ककुतर्क काढून आपले लचके तोडायला प्रसारमाध्यमरूपी लांडगे टपूनच बसले होते. आज जरी कित्येक कलाकारांनी बिनधास्तपणे प्रसारमाध्यमांसमोर येऊन आपण समलिंगी असल्याची कबुली दिली असली, तरी १९७०च्या दशकात ती फार खळबळजनक आणि म्हणूनच गुप्त ठेवण्यालायक बाब मानली जायची. त्या काळी असलं धाडस करणारे कलाकार अगदी बोटावर मोजण्याइतपत होते. इतकंच काय, तर आजच्या युगातही असे कित्येक कलाकार आहेत, जे आपल्या निराळ्या

लैंगिक निवडींबद्दल सपशेल मौन पाळतात, कारण त्यांना हे भय असतं की, आपल्या चाहत्यांना जर आपलं सत्य रूप रुचलं नाही, तर आपण आपली कारकिर्द आणि त्यातून वाहणाऱ्या पैशांचा ओघ आयुष्यभरासाठी गमवून बसू.

प्रत्येक गोष्टीचा अत्यंत व्यवहारी दृष्टीने विचार करणाऱ्या मायकलला ह्याची जाणीव होती की, तो समलिंगी असल्याच्या अफवांची मुळं जर खोलवर रुजू लागली, तर त्याची कारकिर्द धोक्यात येईलच; पण त्याला आपल्या आई-वडिलांनाही तोंड दाखवायला जागा उरणार नाही. कॅथरीन एकदा म्हणाली होती, ''मी जेव्हा पहिल्यांदा मायकल समलिंगी असल्याच्या अफवा ऐकल्या तेव्हा मला अक्षरश: वेड लागायचं बाकी, होतं. पण शेवटी तो माझा मुलगा आहे. मी त्याला सगळ्यात जवळून ओळखते. खरं काय आहे ते मला माहितेय आणि त्याला माहितेय. आम्ही दोघांनी त्या अफवांबद्दल खूप चर्चा केली, गळ्यात गळे घालून रडलोदेखील. त्याच्यावर नाहक उडवल्या जाणाऱ्या त्या शिंतोड्यांबद्दल मायकल खूप निराश झालेला. मायकल समलिंगी नाहीये. ते आमच्या धार्मिक विचारसरणीत आचार-पद्धतीत बसत नाही.'' मायकलच्या त्या कठीण काळात कॅथरीनने त्याला खूप आधार दिला. आई-लेकराने एकमेकांच्या गळ्यात गळे घालून ह्या निर्दयी दुनियेच्या क्रूरपणाबद्दल पोटभर रडून घेतलं. त्यांना ह्या गोष्टीचं फार वाईट वाटलेलं की, मायकलच्या इतक्या खासगी बाबतीत ते लोक गावगप्पा करत होते, जे मायकलला बोटभरसुद्धा ओळखत नव्हते.

विचार करण्यालायक गोष्ट ही आहे की, जर मायकलने आपण समलिंगी असल्याची कबुली दिली असती, तर त्याच्या भावंडांची प्रतिक्रिया काय झाली असती? १९७०च्या दशकाचा विचार करायचा झाला, तर त्यांच्या ते मुळीच पचनी पडलं नसतं; कारण मायकलच्या त्या कबुलीने अवघ्या जॅक्सन समूहाची प्रतिमा 'सनसनाटी' वा 'वादग्रस्त' अशी झाली असती. पण हेच जर मायकलने आजच्या काळात केलं असतं तर? तर समाजासमोर तरी त्याची भावंडं मायकलच्या बाजूने उभी राहिली असती. मात्र वैयक्तिक-दृष्ट्या विचार करायचा झाला, तर त्यांना आजच्या काळातही ती कल्पना पचनी पडली नसती. आपल्या आईप्रमाणे मायकलची भावंडंही फारशा पुढारलेल्या विचारांची नव्हती. थोडक्यात, जर मायकल समलिंगी असता – आणि तो

तसा होता, असं मी मुळीच म्हणत नाहीये – आणि जर वयाच्या चाळिशीत त्याने अचानक जगासमोर येऊन ही गोष्ट कबूल करण्याचा निर्णय घेतला असता, तर (माझ्या लेखी) जॅक्सन कुटुंबीयांपैकी, एकच व्यक्ती त्याच्या बाजूने उभं राहण्याचं धाडस दाखवू शकली असती – ती म्हणजे जॅनेट जॅक्सन. जॅनेट ही त्या सगळ्या भावंडांपैकी एकच अशी व्यक्ती आहे, जिने आजच्या घडीपर्यंत आयुष्याची निरनिराळी रूपं अनुभवली आहेत आणि जिने एवढं समजण्याइतपत निश्चितच दुनिया बघितलीय की, समलिंगी लोक म्हणजे कुणी परग्रहावरून आलेली माणसं नव्हे. ती तुमच्या-आमच्यासारखीच सामान्य माणसं आहेत आणि अशी बरीच माणसं ह्या जगाच्या कानाकोपऱ्यांत, निरनिराळ्या प्रांतात गुण्यागोविंदाने आयुष्य घालवत आहेत.

आपल्या लैंगिकतेविषयी अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांशिवाय १९७०च्या दशकात मायकलला इतरही अशा बऱ्याच अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांची उत्तरं द्यावी लागायची. अर्थात सगळ्याच मुलांसाठी पौगंडावस्था म्हणजे आयुष्याचं नाजूक वळण असतं – त्या वयात बऱ्याच गोष्टींबद्दल गोंधळ वा शंका निर्माण होतात, मन जरा जास्तच संवेदनशील बनतं... पण मायकलच्या बाबतीत ह्या सगळ्याच समस्या अधिकच जोराने उफाळून आल्या, कारण तो सतत प्रसिद्धीच्या झोतात असायचा. उदाहरणार्थ, वयानुसार जेव्हा त्याचा चेहरा तारुण्यपिटिकांनी भरून गेला, तेव्हा त्याला स्वत:च्या रूपाची इतकी लाज वाटू लागली की, तो घराबाहेर पडायलाच तयार होईना. मायकल म्हणाला, ''त्या काळात मला असं वाटू लागलं की, माझ्या चेहऱ्याच्या प्रत्येक छिद्रावर मुरूम आलं आहे.'' रंगमंचावर असताना त्याची ही समस्या मेकअपच्या जाड थरांखाली झाकली जायची; पण एरव्ही हे लगेच लक्षात यायचं की, मायकलला त्वचेची समस्या होती. त्याची मुलाखत घेताना, वार्ताहर एकमेकांशी त्याच्या चेहऱ्यावरच्या मुरमांबद्दल कुजबुज करायचे. त्याचं ते रूप पाहून चाहत्यांना तर धक्काच बसायचा. आणि ह्या सगळ्या प्रतिक्रियांचा मायकलच्या मनावर भलताच परिणाम व्हायचा; त्याला स्वत:च्या चेहऱ्याची खूप लाज वाटायची.

मायकलने स्वत: कबूल केल्याप्रमाणे, ''त्या तारुण्यसुलभ समस्येमुळे आणि त्यातून मिळणाऱ्या प्रतिक्रियांमुळे माझ्या मनावर खूप खोलवर

परिणाम झाला. मी लोकांना भेटायचं टाळू लागलो, घराबाहेर पडायचं टाळू लागलो... अतीव शरमेमुळे माझ्या मनावरच नाहीतर माझ्या अवघ्या व्यक्तिमत्त्वावर विपरीत परिणाम झाला.''

लोकांशी बोलताना मायकल त्यांच्या डोळ्यांत पाहून बोलेनासा झाला. त्याला कुणाकडे थेट बघण्याची शरम वाटू लागली. अगदी कॅथरीनशी बोलतानासुद्धा मायकल इथे-तिथे पाहत बोलू लागला. कॅथरीन सांगते, ''त्या काळी मायकलला घराबाहेर पडणं अगदी नकोसं होऊन गेलेलं. आणि जेव्हा कधी तो बाहेर पडायचा, तेव्हा शक्य तितकं आपली मान खाली घालूनच वावरायचा.'' त्या फुटकळ मुरमांमुळे त्याच्या मनावर जे आघात झाले, त्यातून मायकल कधी सावरलाच नाही. कॅथरीन सांगते, **''मुरमांमुळे मायकलचं व्यक्तिमत्त्व जे बदललं, ते कायमचंच. तो कधी पूर्वीच्या बडबड्या, मस्तीखोर, खोडकर मुलासारखा वागलाच नाही. उलट तो दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर, शांत आणि एकलकोंडा बनत गेला.''**

मायकलची ही समस्या अजूनच जटिल झाली, ती त्याच्या ह्या विचारामुळे की, आपण दिसायला मुळीच चांगले नाही. आपलं नाक फारच फताडं आहे आणि आपला रंग अतीच काळा. त्यात, मायकलच्या कुटुंबीयांना जरी त्याच्या अति-संवेदनशील स्वभावाची जाणीव होती, तरी जोसेफ आणि मायकलच्या भावंडांनी त्याच्या कलाकलाने घेत वागण्यापेक्षा सगळं हसण्यावारी नेतच निभावलं. अर्थात त्यात त्यांना कुठेही मायकलला दुखावण्याचा हेतू नसला, तरी ह्या गमतीजमतीला कोणतं मूल कसं घेतं, हे ज्याच्या-त्याच्या स्वभावावर आणि नशिबावर अवलंबून असतं म्हणा.

१९ वर्षांचा होईपर्यंत मायकल म्हणजे विविध प्रकारच्या विरोधाभासांचं आगार बनला होता. एकीकडे मोटाऊनच्या अध्यक्षांना थेटपणे भेटून चर्चा करण्याइतपत हिंमत ठेवणाऱ्या ह्या मुलाला साधी गाडी चालवण्याच्या कल्पनेनं कापरं भरायचं. त्याच्या वयाची इतर मुलं जिथे आपण कधी एकदा १६ वर्षांचे होतोय आणि आपल्याला गाडी चालवण्याचा परवाना मिळतोय, ह्याची वाट बघत असायची; तिथे मायकलला गाडीचं चाक हातात घ्यायच्या विचारानेच घाम फुटायचा. त्याला त्याबद्दल जास्त छेडलं, तर तो कळवळून म्हणायचा, ''पण मला नाही चालवायचीय गाडी. मला इच्छाच नाहीये गाडी

चालवायची. काहीही करायचं झालं, तर तुम्हाला ती गोष्ट करावी असं मनातून वाटायला हवं ना? पण मला गाडी चालवावी असं मनातून वाटत नाही. आणि जरी मला माहितेय की, प्रत्येक मनुष्याला काही ज्या मूलभूत गोष्टी यायला हव्या, त्यांपैकी गाडी चालवणं ही एक महत्त्वाची गोष्ट आहे, तरी मला ते गरजेचं वाटत नाही. आणि मला त्याबद्दल खंतही नाही. मला गाडी चालवण्यात काहीही खास वाटत नाही.'' मायकलला कुठेही जायचं झालं, तर त्याच्या दिमतीला लिमूझीन गाडी असायची आणि बरेचदा त्याचे भाऊच त्याला इथे-तिथे घेऊन जायचे.

मायकलला गाडी चालवण्याचं भय होतं, ही गोष्ट जरी खरी असली, तरी त्याच्या नकारामागचं अजून एक कारण असंही होतं की, मायकलला चालकाचा परवाना मिळवण्यासाठी लागणारी परीक्षा द्यायला 'डिपार्टमेंट ऑफ मोटर व्हेइकल्स'च्या पुढ्यात मुळीच उभं राहायचं नव्हतं. त्याला असा गंड होता की, तिथलं लोक त्याला ओळखतील आणि मग १९व्या वर्षीदेखील ह्या मुलाकडे साधा चालक-परवाना नाही म्हणून त्याची खिल्ली उडवतील, ह्याच विचाराने मायकलची गाळण उडायची आणि तो गाडी चालवण्याचा विचार सोडून द्यायचा. एकदा कधी नव्हेतो मायकलला गाडी शिकण्याची इच्छा झाली आणि त्यासाठी त्याने 'डिपार्टमेंट ऑफ मोटर व्हेइकल्स'कडून आपल्याला कलाकार म्हणून परीक्षा देण्यातून काही सवलत मिळतेय का ह्याची चौकशी केली. पण नित्यनेमाने कलाकारांच्या चित्रविचित्र मागण्यांना तोंड द्यायची सवय असलेल्या आणि कलाकारांना सामान्य जनतेच्याच तोडीचं मानणाऱ्या एन्सिनोच्या अधिकाऱ्यांनी मायकलला ती परवानगी नाकारली. तेव्हापासून मात्र मायकलने तो नाद कायमचा सोडून द्यायचा निर्णय घेतला. कॅथरीनने त्याला गाडी चालवता येणं किती महत्त्वाचं होतं, हे पटवून देण्याचा खूप प्रयत्न केला. ''मायकल, अरे, तुला उद्या कुठे जायचं झालं आणि तुझा चालक आजारी पडला असेल, तर तू काय करशील? काही नाहीतर ह्या असल्या प्रसंगांना तोंड देण्यासाठी तरी तुला गाडी चालवता येणं भाग आहे रे!'' असं कॅथरीनने मायकलला पटवून देण्याचा खूप प्रयत्न केला. अखेर, मायकलच्या वयाच्या २३व्या वर्षी कॅथरीनच्या प्रयत्नांना यश आलं. मायकलने एकदाचा चालक-परवाना मिळवला.

५वी आवृत्ती

स्टीव्ह जॉब्ज

एक झपाटलेला तंत्रज्ञ!



लेखक
अच्युत गोडबोले / अतुल कहाते

किंमत - १४०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

तंत्रज्ञानाच्या जगामधला सगळ्यात प्रसिद्ध जादूगार - हे जग सोडून गेला...

पण त्यानं आपल्या अद्‌भुत कल्पनाशक्तीच्या जोरावर तयार केलेले कम्प्युटर्स, मोबाईल फोन्स, म्युझिक प्लेअर्स, टॅब्लेट पीसीज हे सर्व या जगाला त्याची आठवण देत राहतील. जगभरातल्या लोकांच्या कल्पनाशक्तीपलीकडची उत्पादनं जॉब्जनं प्रत्यक्षात आणून दाखवली.

आपलं आयुष्यच तो एका वेगळ्या विश्वात जगला. राजाचा रंक आणि परत रंकाचा राजा असं सनसनाटी आयुष्य जॉब्जच्या वाट्याला आलं. सगळ्यांहून वेगळं आणि अगदी सर्वोत्तम असंच कायम करून दाखवण्यासाठी तो आयुष्यभर धडपडला. कर्करोगानं जॉब्जचं शरीर पोखरून टाकलं, तरी त्याही स्थितीत त्यानं शेवटपर्यंत आपल्या कल्पनांच्या भराऱ्या मारायचं काम थांबवलं नाही.

अशा या हट्टी, जिद्दी, कलाकार तंत्रज्ञाला सलाम करणारी ही रंजक सफर!

असाध्य ते साध्य

एक निर्भय साहसी आणि दिव्य वसुंधरा

ध्रुवीय प्रदेशातील (-१.७ से.) जगातील सर्वांत थंड पाण्यात आणि पाचही महासागरात पोहण्याचे विविध विक्रम करणारा पहिला साहसवीर लुईस गॉर्डन पगची रोमहर्षक जीवनकहाणी त्याच्याच शब्दांत...



लेखक
लुईस गॉर्डन पग
अनुवाद
मोहन गोखले

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत शिक्षकांच्या वाट्याचा किंवा प्रभावाचा कितपत भाग असतो, हे मला वाटते, फार काही नव्याने सांगण्याची गरज नाही. विशेषत: शाळेचे मुख्याध्यापक, हॉस्टेलचे प्रमुख यांची व्यक्तिमत्त्वे, विचारसरणी या गोष्टी शाळेच्या संस्कृतीत काळाबरोबर झिरपत जातात आणि शाळेची ती एक कायमची ओळख होऊन बसते. टोनी वर्थहॅम, मेजर टोनी क्रँकशॉ आणि जॉन इन्स या अशा तीन माणसांनी माझ्यावर टाकलेल्या प्रभावाचा, केलेल्या संस्कारांचा मला कृतज्ञतेने उल्लेख करावा लागेल. प्रत्येकाने आपल्या पद्धतीने मला खूप शिकवले. तरुणांशी वागताना कसे वागावे, कसे वागू नये, याचे तारतम्य बाळगण्याचे भान दिले.

डेव्हॉनमधील 'टाव्ही स्टॉक' गावातील माउन्टहाउस स्कूलचे टोनी वर्थहॅम हे मुख्याध्यापक आणि मालक दोन्ही होते. आमची फक्त मुलांसाठी असलेली माध्यमिक शाळा होती. शाळेत वसतिगृहाचीपण सोय होती. वसतिगृहात राहणे अनिवार्य नव्हते, तरी बरीच मुले वसतिगृहात राहणे पसंत करत. आमची शाळा जेव्हा अगदी लहान होती आणि तितकीशी प्रसिद्ध नव्हती, तेव्हा टोनी वर्थहॅम यांनी शाळेची धुरा हाती घेतली आणि थोड्याच वर्षांत आमची शाळा पश्चिम इंग्लंडमधील एक उत्तम माध्यमिक शाळा म्हणून ओळखली जाऊ लागली. एवढेच नाही, तर शाळेने इंग्लंडमधील एक अत्युत्तम शाळा म्हणूनही नावलौकिक मिळवला. त्यांच्या या यशाचे गमक त्यांच्या विचारसरणीत होते. मुलांच्या विचारस्वातंत्र्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. ते मुलांच्या विचारांना तितक्याच गांभीर्याने घेत आणि विचारातल्या मतभेदांचे स्वागतच करत. विचार किंवा मतभेद दाबून टाकणे त्यांना सर्वस्वी अमान्य होते.

शाळेत शिक्षक समोर आल्यावर विद्यार्थ्याने 'गुड मॉर्निंग सर' म्हणून त्यांना अभिवादन करणे अगदी स्वाभाविक असते. पण टोनी वर्थहॅम यांचे वैशिष्ट्य होते की, ते तुम्हाला तुमच्या नावाने संबोधून तुमच्या शुभेच्छांचा स्वीकार करत. वसतिगृहात प्रत्येक खोलीत आठ ते दहा मुलांची सोय केलेली असे.

प्रत्येक खोलीला ब्लेक, नेल्सन, ड्रेक, रॅले इत्यादी आरमारांच्या सेनानींची नावे दिलेली होती. शाळेच्या अभ्यासक्रमात अभ्यासावर भर तर दिलेलाच होता; पण फक्त अभ्यासालाच नव्हे, तर विविध प्रकारच्या

खेळांनापण प्राधान्य दिले होते. मुख्याध्यापकांनी प्रत्येक शिक्षकाची निवड करताना खूपच खबरदारी घेतली होती, हे जाणवत असे. शाळेच्या आवारात 'वर्थहॅम' यांनी एक तळे तयार केले होते. त्यात त्यांनी आम्हाला शिडाची बोट आणि कयाक (एक किंवा दोन माणसांनी वल्हवत नेण्याची अगदी अरुंद चिंचोळी बोट) चालवण्याचे शिक्षण दिले. कधी ते आम्हाला जवळच्या डार्टमूर नॅशनल पार्कमध्ये घेऊन जात आणि मोकाट सोडत.

आमच्या शाळेपासून डार्टमूरचा तुरुंग फार लांब नव्हता. त्यामुळे शाळेत येता-जाताना कधीकधी एखादा शिक्षा झालेला कैदी तुरुंगातून पळून जातानाच्या घटना बघायला मिळत. एके दिवशी संध्याकाळी आमचे भूगोलाचे शिक्षक कॅप्टन ग्लॉसीप यांना शाळेतून परतल्यावर, शिक्षा झालेला एक कैदी पळून जाण्याच्या प्रयत्नात त्यांच्या घरात कपाटात लपलेला आढळला होता. असेच एकदा आमच्या 'वर्थहॅम' सरांच्या घरात फाटके कपडे घातलेला भिकाऱ्यासारखा दिसणारा माणूस आला आणि त्याने प्यायला पाणी मागितले. सरांनी त्याला आत बोलावले आणि चहा देऊ केला. त्या दोघांनी चहा घेतला आणि थोड्या वेळाने तो त्याच्या मार्गाने निघून गेला. संध्याकाळच्या बातम्यांवरून सरांना कळले की, दुपारी त्यांनी ज्याचा पाहुणचार केला होता, तो तुरुंगातून निसटलेला एक कैदी होता.

दक्षिण आफ्रिकेला स्थलांतरित होण्याचा निर्णय झाल्यावर माउन्टहाउस शाळेला मी राम-राम ठोकला, तेव्हा मी १० वर्षांचा होतो. तरीही नंतर कित्येक वर्षे मी वर्थहॅम सरांच्या संपर्कात होतो. पुढे मी जेव्हा केंब्रिजच्या जीझस कॉलेजमध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश मिळाल्याचे त्यांना सांगितले, तेव्हा त्यांना खूप आनंद झाला. ते स्वत: जीझस कॉलेजचेच विद्यार्थी होते आणि जीझस कॉलेजसारख्या प्रतिष्ठित कॉलेजात प्रवेश मिळवणे, म्हणजे काय चीज आहे, याची त्यांना कल्पना होती. पुढे ते जेव्हा मला भेटायला दक्षिण आफ्रिकेला आले, तेव्हा तर मी अक्षरश: भारावून गेलो. तेव्हा सर ऐंशीच्या घरात होते. त्यांच्या वास्तव्यात मी त्यांना अटलांटिक समुद्रात पोहायला घेऊन गेलो. तो दिवस माझ्या दृष्टीने अविस्मरणीय असा होता. त्यांना झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. ते २००४ साली गेले, तेव्हा ८४ वर्षांचे होते.

'द टाइम्स' पेपरमध्ये त्यांच्यावर मृत्युलेख छापून आला होता. त्या लेखात माउन्टहाउस शाळेची जडणघडण आणि मिळालेल्या

नावलौकिकाबाबत सरांनी केलेल्या कामाचा मोठ्या गौरवाने उल्लेख केला होता. 'त्या शाळेतल्या मुलांना अभ्यास असो, मैदानी खेळ असो; किंवा कर्तव्य असो या सर्वांची शिकवण तारतम्य बाळगून त्यांचा सर्वांगीण विकास डोळ्यांसमोर ठेवून दिली गेली,' असे त्या लेखात लेखकाने म्हटले होते. सरांच्या शिकवण्याचे सार एका शब्दात सांगायचे झाले, तर 'तारतम्य' ('a sense of proportion') असेच सांगता येईल. 'द टाइम्स' मधल्या या लेखात पुढे असे लिहिले होते की, 'सरांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत सौम्य आणि मृदू होते. विशेष म्हणजे नवख्या मुलालापण पहिल्या भेटीतच त्यांचा आधार वाटेल, असे होते.' माउन्टहाउस शाळेच्या वसतिगृहात राहण्यासाठी पहिल्या शैक्षणिक सत्रात मी जेव्हा घर सोडले, तेव्हा माझ्या वडिलांच्या डोळ्यांत पाणी आले. त्या एकाच वेळी मी वडिलांना रडताना पाहिले. सुरुवातीला मला घराची आठवण यायची, पण थोड्याच दिवसांत मी वसतिगृहात रुळलो. घरच्या वातावरणापेक्षा वसतिगृहातील वातावरण खूपच वेगळे होते, पण मुले एकमेकांना मदत करायची आणि तशा प्रकारे राहण्यातपण एक प्रकारची मजा होती. वर्थहॅम सरांचे सर्वांवर लक्ष असायचे. त्यामुळे कधी एकाकी वाटायचे नाही.

साधारणत: प्रत्येक आईवडिलांची त्यांच्या मुलांना शिक्षण असो किंवा राहणीमान असो; ते उत्तम प्रतीचे पुरवण्याची इच्छा असते. 'इस्ट केप'मधील ग्रॅहम्सटाऊनला घर करण्याच्या अनेक कारणांपैकी महत्त्वाचे कारण म्हणजे माझ्या आजीचे (वडिलांच्या आईचे) बालपण, शिक्षण त्या गावात झाले होते आणि दुसरे म्हणजे तिथे आमचे बरेच चुलत नातेवाईक होते. आणखी एक कारण म्हणजे 'ग्रॅहम्सटाऊन'मध्ये उच्च माध्यमिक शिक्षणाचीपण चांगली सोय होती. शैक्षणिक संस्थांसाठी ते गाव नावाजलेले होते. त्या गावात युनिव्हर्सिटी होती. सेंट ॲन्ड्र्यू कॉलेज होते आणि त्याच संस्थेची मुलींची डायोसियन शाळा होती. फी आकारून उत्तम शिक्षण देणाऱ्या दक्षिण आफ्रिकेतील खाजगी शैक्षणिक संस्था-कॉलेजेस यांमध्ये सेंट ॲन्ड्र्यू कॉलेजचा क्रमांक फार वरचा होता. एवढेच नाही; तर त्या कॉलेजच्या नावाला, किर्तीला १३० वर्षांची परंपरा होती. वडिलांच्या दृष्टीने ज्या शाळेत त्यांची आई आणि आजी शिकली, त्या डायोसियन स्कूलमध्ये कॅरोलीनला

आणि सेंट ॲन्ड्र्यू कॉलेजमध्ये मला पाठवणे ही एक अभिमानाची गोष्ट होती. आमच्या शाळा, कॉलेजच्या फिया भरमसाट होत्या, पण वडिलांचे ठाम मत होते की, उत्तम शिक्षणासाठी कितीही फी द्यायला लागली, तरी ती कमीच असते. मी सेंट ॲन्ड्र्यू शाळेमध्ये माझ्या प्राथमिक शिक्षणाला सुरुवात केली. दोन वर्षांनंतर प्राथमिक शिक्षण पूर्ण करून उच्च माध्यमिक शिक्षणासाठी सेंट ॲन्ड्र्यू कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतली आणि त्या कॉलेजमध्ये माझ्या उच्च माध्यमिक शिक्षणाची तीन वर्षे 'पार पाडली'. 'पार पाडली.' हा शब्दप्रयोग मी मुद्दाम वापरतो आहे.

सेंट ॲन्ड्र्यू कॉलेजमध्ये वसतिगृहात राहून किंवा वसतिगृहात न राहतापण शिक्षण घेण्याची सोय होती. माझे घर कॉलेजच्या जवळच असल्यामुळे मी वसतिगृहात न राहण्याचे ठरवले. अर्थात त्यामुळे तसा फार फरक पडणार नव्हता कारण आमचे कॉलेज सकाळी आठ वाजता सुरू व्हायचे आणि रात्री आठ वाजेपर्यंत काही ना काही चालू असायचे. दिलेले होमवर्क मी शाळेतच करायचो. संध्याकाळी आई मला घरी नेण्यासाठी यायची. घरी पोचल्यावर इतर काही करण्यासाठी वेळच उरलेला नसायचा, त्यामुळे जेवण आणि नंतर झोप.

सर्वसाधारण खाजगी शाळांमध्ये जशी प्रथा असते, त्याप्रमाणे आमच्याही शाळेत वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या गटांत विभागणी केलेली होती. प्रत्येक गटाचा प्रमुख म्हणून एक शिक्षक 'हाउस मास्टर' म्हणून काम बघत. मी वरिष्ठ किंवा 'अप्पर हाउस' या गटात होतो आणि आमचे 'हाउस मास्टर' होते. मेजर क्रँकशॉ. चार्ल्स डिकन्सने त्याच्या कादंबरीतील एखाद्या उर्मट आणि हुकूमशहा हाउस मास्टरच्या व्यक्तिरेखेला 'क्रँकशॉ' हे नाव सहज दिले असते आणि ते चपखलपण बसले असते. सेंट ॲन्ड्र्यू कॉलेजची वेबसाइट पाहिली, तर त्यात 'अप्पर हाउस'चा इतिहास थोडक्यात वाचायला मिळेल व मेजर क्रँकशॉ (१९८०) एक खऱ्या-खोट्याचा, सत्य-असत्याचा अत्यंत सुस्पष्ट कल्पना असलेला शिस्तप्रिय माणूस. अशी नोंद आढळेल. असो! पण माझ्या आठवणी, माझे अनुभव काही वेगळेच आहेत.

प्रथमत: एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, माझे आईवडील जरी जन्माने 'वेल्श' होते, तरी शाळेतील दक्षिण आफ्रिकन विद्यार्थ्यांच्या दृष्टीने मी एक इंग्लंडहून आलेला मुलगा होतो. शाळेतील दक्षिण आफ्रिकन विद्यार्थी

मुख्यत्वेकरून जरी इंग्रजी बोलणारे होते; तरी त्यांच्या मनात, वागणुकीत इंग्लंडविषयी एक सूक्ष्म पण स्पष्ट अशी अढी होती, द्वेष होता. पॉमेरियन कुत्र्याकडे बघण्याचा जसा एक सर्वसाधारण दृष्टिकोन असतो, तसा त्यांचा माझ्याकडे बघण्याचा होता. वयाच्या १२व्या वर्षी माझी शरीरयष्टी तशी नाजूकच होती आणि अत्यंत सुरक्षित अशा वातावरणात माझे बालपण गेले होते. अमेरिकन फुटबॉल (रग्बी) हा खेळ मला नीट खेळता येत नव्हता आणि मला त्यात रसही नव्हता. तो खेळ माझ्या प्रकृतीलाच मानवणारा नव्हता. त्या सगळ्याचा एकत्रित विचार केला, तर मेजर क्रँकशॉ यांचे 'अप्पर हाउस' ही जागा किंवा हे ठिकाण माझ्यासाठी नव्हते. मी त्या चौकटीत कोठेच बसत नव्हतो. सर्वसाधारणपणे आतापर्यंत आयुष्यात मी नशीबवान ठरलो आहे, पण त्या वेळी मात्र काहीतरी गोंधळ झाला होता. माझ्या नशिबाचे फासे काही वेगळेच पडले होते.

या कर्मकहाणीची सुरुवात एका छोट्याशा पुस्तकापासून सुरू होते. शाळेत प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक नव्या विद्यार्थ्याला शाळेसंबंधी, शाळेचे वेगवेगळे भाग, उपक्रम, त्या संबंधित व्यक्ती इत्यादींची माहिती असलेले एक पुस्तक देण्यात येई. त्या पुस्तकात शाळेच्या सिनियर रग्बी टीमच्या सर्वच्या सर्व १५ खेळाडूंची नावे, सर्व वर्गातील मॉनिटर्सची नावे, शाळेच्या क्रिकेटटीम आणि ॲथलेटिक्सच्या टीममधील खेळाडूंची नावे इत्यादी माहिती खच्चून भरलेली असे. एवढेच नाही, तर नवीन विद्यार्थ्याला त्या पुस्तकातील सर्व माहिती तोंडपाठ करण्याची सक्ती केली जायची आणि विद्यार्थ्याला परीक्षेच्या– ज्याला 'न्यू बॉईज टेस्ट' म्हणत त्या दिव्यातून पार पडावे लागे. या परीक्षेत सर्वच्या सर्व प्रश्नांची बरोबर उत्तरे देता येणे ही जवळ-जवळ अशक्य कोटीतीलच गोष्ट होती. अगदी हुशारातल्या हुशार मुलालापण सर्व उत्तरे बरोबर देता येतीलच, याची खातरी नसे. वर्गाच्या मॉनिटरने घेतलेल्या या परीक्षेत नापास झाल्यावर मग मेजर क्रँकशॉ यांच्यापुढे हजर होण्याचे समन्स त्या विद्यार्थ्यावर बजावण्यात येई.

ही परीक्षा ठरल्याप्रमाणे रविवारच्या शाळेतल्या चर्चमधील प्रार्थनेनंतर घेण्यात यायची आणि नापास झालेल्यांना सोमवारी सकाळी मेजर क्रँकशॉ यांच्यासमोर हजर व्हायला सांगण्यात येई. या सत्त्वपरीक्षेचा सर्वांत कठीण काळ कोणता असेल तर उद्या सकाळी मेजर क्रँकशॉ यांना भेटायचे आहे, ही भीती पोटात ठेवून काढलेल्या त्या रविवारच्या अनेक रात्री. सगळ्यांना

दुसऱ्या दिवशीच्या शिक्षेची चांगलीच कल्पना होती. मेजर क्रँकशॉ यांच्या ऑफिसबाहेर अशा समन्स मिळालेल्यांची रांग लागलेली असायची आणि एका वेळेला एकालाच प्रवेश मिळायचा.

''हं! तू काय केलंस?'' मेजर क्रँकशॉचा ठरावीक प्रश्न असे.

''सर, मी न्यू बॉईज टेस्टमध्ये नापास झालो'', विद्यार्थी.

'ठीक. 'त्यासाठी माझ्याकडे उत्तम उपाय आहे', असे म्हणून मेजर क्रँकशॉ कपाटामागे ठेवलेली छडी काढायचे आणि पाठीवर किंवा मांड्यांमध्ये सणसणीत दोन वळ उठवायचे. जेव्हा ते जास्त रागावलेले असत, तेव्हा ते पायावर जरा खाली जेथे जास्त दुखते, तिथे मारत. खरे तर हा सगळा प्रकारच एक प्रकारे हाउस मास्टर आणि विद्यार्थी या दोघांसाठीही रानटी आणि लज्जास्पद होता. पण माझ्या अल्पसमजुतीप्रमाणे त्यांना मात्र या सगळ्याचे काही विशेष वाटत नसावे. माझ्या पहिल्या वर्षात हा अनुभव मला एक दोनदाच नाही, तर अनेक वेळा आला. त्या छोट्याशा पुस्तकात नावे आणि माहिती खूपच होती. अगदी तुम्ही ठरवून जरी घोकंपट्टी करून सर्वच्या सर्व उत्तरे बरोबर दिलीत, तरी वर्गाचा मॉनिटर काही ना काही तरी खुसपट काढून मेजर क्रँकशॉकडे पाठवायचाच.

पहिल्या वर्षातले काही विद्यार्थी, इतरांपेक्षा या प्रकाराला बऱ्याच धीराने सामोरे जायचे. माझा एक वर्ग मित्र ॲड्रियन फोर्ड हा त्यांपैकी एक होता. त्याला असल्या या छड्याबिड्या खाण्याच्या शिक्षेचे काहीच वाटत नसे. त्याची अशा शिक्षेकडे बघण्याची वृत्ती अगदी निर्लेप होती. तो शरीरावरचा वळ मनावर उठू देत नसे. मेजर क्रँकशॉ यांच्या खोलीत त्यांच्यासमोर हा अगदी गंभीर चेहऱ्याने उभा राहायचा. पण खोलीच्या बाहेर पडताक्षणी सोड्याची बाटली फुटावी, तसे फस्सकन हसायचा. परंतु इतर विद्यार्थी मात्र शिष्टपणाचा आव आणून 'थँक यू सर' वगैरे पुटपुटायचे. पण जी गोष्ट मला मुळातच चूक वाटत होती, त्या गोष्टीला मी 'थँक्स' वगैरे म्हणणे कधीच शक्य नव्हते आणि कधी म्हणालोपण नाही.

आमच्या वर्गात कॅमरॉन होवे नावाचा एक हुशार आणि अभ्यासू मुलगा होता. त्याने एखादी गोष्ट मनावर घेतली, तर तो तिचा अगदी पाठपुरावा करत असे आणि मग त्याची कधी चूक होत नसे. या न्यू बॉइज टेस्टच्या बाबतीतही त्याने हेच केले. हां हां म्हणता त्याने त्याच्या स्मरणशक्तीच्या जोरावर ते छोटे पुस्तक अगदी तोंडपाठ केले आणि प्रत्येक रविवारी तो त्या परीक्षेत यशस्वी

ठरला. पण असा हा अपवाद करू दिला जाणे योग्य दिसणार नाही, असे वाटल्यामुळे की काय कोण जाणे, त्याला त्या पुस्तकात नसलेल्या गोष्टींवर प्रश्न विचारण्यात आले आणि अर्थातच तो उत्तर देऊ शकला नाही, आणि कॅमरॉनवरपण मेजर क्रँकशॉ यांच्या खोलीबाहेर आमच्याबरोबर रांगेत उभे राहाण्याची वेळ आली. माझ्या मते, कॅमरॉनला झालेली शिक्षा हा त्याच्यावर शाळेसारख्या संस्थेकडून झालेला सरळसरळ अन्याय होता.

आमच्या अप्पर हाउसमध्ये एक प्रकारचे टगेगिरीचेच वातावरण होते. रॅगिंगचीही प्रथा होती. वरच्या वर्गातील सिनिअर मुले प्रथम वर्षात दाखल झालेल्या ज्युनिअर मुलांकडून त्यांची खोली लावून घेणे, केर काढून घेणे, रग्बीचे बूट पॉलिश करून घेणे, नेहमीचा बुटांचा जोड पॉलिश करून घेणे इत्यादी अंगमेहनतीची कामे करून घेत. त्याच्या मोबदल्यात सिनिअर मुलांकडून ज्युनिअर मुलांना शाळेत काय प्रथा आहेत, कायदेकानून आहेत, त्यांचा त्रास कसा कमी करायचा किंवा त्यापासून कशी सुटका करून घ्यायची, याचे शिक्षण किंवा कानमंत्र मिळायचे. एखाद्या सिनिअरला त्याच्या ज्युनिअरचे काम जर पसंत पडले नाही, तर त्याचे नाव हाउस मास्टरला सांगितले जाई किंवा तो स्वत:च त्याला शिक्षा करत असे. मी मात्र माझ्या सिनअरच्याबाबतीत तसा नशिबवान ठरलो. माझा सिनिअर क्रेग रिप्पॉन हा चांगला मुलगा होता. त्याने मला आणि माझ्यासारखा दुसरा ज्युनिअर, रिचर्ड स्मार्ट याला चांगली वागणूक दिली. शक्य होते, तिथे तो आमच्या बाजूने उभा राहिला. एखादे वेळी आमच्या हातून तो गुन्हा आहे, याची जाणीवही नसताना एखादी गोष्ट घडली, म्हणजे उदाहरणार्थ हिरवळीवरून चालणे इत्यादी तरी तो आम्हाला शांतपणे आमच्या हातून काय चूक झाली आहे, हे सांगायचा आणि प्रकरण तिथेच मिटवायचा. नाही तर इतर सिनिअरांकडून त्यांच्या ज्युनिअर्सना सररास मारहाण पण व्हायची.

अप्पर हाउसमध्ये चालणाऱ्या अशा अनेक प्रकारांमध्ये एक प्रकार म्हणा किंवा रूढ झालेली पद्धत तर फारच हास्यास्पद होती. या छळवणुकीच्या नाटकाचा अंक जवळ-जवळ रोज संध्याकाळी जेवणानंतर नियमितपणे पार पाडला जायचा. रात्रीच्या जेवणानंतर सबंध दिवसभरात झालेला खोल्यांमधला केरकचरा, तसेच मधल्या सामाईक व्हरांड्यातला केरकचरा इत्यादी साफसफाई करणे हे काम आम्हा ज्युनिअर्सचे असे. एकदा हे काम आटोपले, की आम्ही आमचे होमवर्क करायला अभ्यासिकेत जाण्याआधी

‘चेंजिंग रूम्स’मध्ये जमायचो. दुसऱ्या व तिसऱ्या वर्गाची मुले चेंजिंग रुम्स ते अभ्यासिकेच्या दरम्यानच्या व्हरांड्यात दुतर्फा उभी राहत आणि त्यांनी ‘गो’ म्हणताच आम्ही धावत सुटायचे आणि त्या मधल्या अवधीत त्यांनी आम्हाला लाथाबुक्क्यांनी यथेच्छ मारायचे, असा एकंदरीत प्रकार असे. हे सर्वच हास्यास्पद होते, पण हा प्रकार रूढ झाला होता खरा.

स्पेन आणि फ्रान्स यांच्या पश्चिम सीमारेषेजवळ स्पेनमध्ये ‘पॅम्पलोना’ गावात ‘रनिंग ऑफ द बुल्स’ हा खेळ किंवा रूढी दर वर्षी जुलैमध्ये पार पाडली जाते. त्या खेळात गावातले तरुण गावातल्या अरुंद रस्त्यांमधून बैलांना डिवचत त्यांच्या पुढे धावतात. मला काही त्या खेळाचा अनुभव नाही, पण सेंट ॲन्ड्र्यू शाळेच्या दिवसांत मला त्या खेळाची थोडीफार कल्पना आली.

खरे तर सिनियर मुलांसाठी हा खेळ एक गमतीचा, करमणुकीचा प्रकार असायचा; पण आमच्यासाठी मात्र ती नक्कीच गंमत नसायची. या छोट्याशा धावण्याच्या गोंधळात स्वत:ला कमीत कमी मार कसा बसेल आणि त्यासाठी स्वत:ला त्या गर्दीत कसे व कोठे ठेवायचे, याच्यासाठी मग डावपेच आखणे सुरू व्हायचे. जर तुम्ही पळणाऱ्यांच्यामध्ये सर्वांत पुढे राहिलात, तर आपोआपच तुम्ही सर्वांचे लक्ष्य व्हायचात, अगदी शेवटी राहिलात, तरी सिनिअरांसाठी तुम्ही आणखीच सोपे लक्ष्य ठरायचात. माझा मित्र ॲड्रियन फोर्ड याच्या पायात थोडा दोष असल्यामुळे तो किंचित लंगडत चालायचा. त्यामुळे बहुतेक वेळा पळताना तो मागे पडायचा आणि बिचारा बऱ्याच माराचा धनी व्हायचा. त्यामुळे पळताना मी त्याच्या जवळ राहण्याचे टाळायचो. त्या उलट दुसरा मित्र डेव्हिड स्पेन्सर हा चांगला धावपटू होता आणि पळताना नेहमी पुढे असायचा आणि त्याच्या वेगामुळे बऱ्याच प्रमाणात मार चुकवण्यात तो यशस्वी व्हायचा. डेव्हिडच्या वडिलांनी १९६०च्या रोम ऑलिम्पिकमध्ये ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत रौप्यपदक पटकावले होते. मार चुकवण्यासाठी माझा प्रयत्न साधारणत: डेव्हिडच्या मागे-मागे राहण्याचा असायचा, पण मी त्याच्या इतका वेगाने धावू शकत नसल्यामुळे मला बऱ्यापैकी मार खायला लागायचा. चेंजिंग रूमहून अभ्यासिकेत जाणारा रस्ता मेजर क्रॅकशॉ यांच्या घरावरून जात होता आणि या अशा विचित्र खेळामुळे तो रस्ता आम्ही नेहमी किंचाळत आणि आरडाओरडा करत पार करत असू.

बरेचवेळा माझ्या हातापायावरच्या खरचटल्याच्या खुणा आईवडिलांच्या नजरेला पडायच्या आणि साहजिकच ते चिंताग्रस्त व्हायचे. मी मात्र त्यांना फार काळजी वाटू नये, म्हणून त्याला फारसे महत्त्व द्यायचो नाही आणि जणूकाही विशेष नाही, असे भासवायचो. मात्र एके दिवशी सकाळी वडिलांनी माझ्या हातावरच्या खरचटल्याच्या, माराच्या खुणा पाहिल्या आणि त्यांचा पारा चढला. ते सरळ आमच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. ऑर्थर कॉटन यांच्याकडे गेले आणि त्यांनी स्पष्ट विचारले की, हा नक्की काय प्रकार होता? वडिलांच्या या तक्रारीमुळे शाळेत मला त्रास सहन करावा लागणार, याची पूर्ण जाणीव होती, म्हणून मला जेव्हा ऑर्थर कॉटन यांनी विचारले, तेव्हा मी कोणाची नावे सांगितली नाहीत. पण शाळेतील सर्वच शिक्षकांना टगेगिरी करणाऱ्या मुलांची अर्थातच माहिती असल्यामुळे त्यांच्यातल्या तीन-चार नेतेगिरी करणाऱ्यांना मुख्याध्यापकांपुढे उभे करण्यात आले आणि त्यांना छडीचा मार खावा लागला. माझ्या वडिलांचा माझा त्रास कमी करण्याचा हा प्रयत्न मात्र माझ्या चांगलाच अंगाशी आला आणि शाळेतल्या टग्यांकडून मला होणारा त्रास आणखीच वाढला.

सेंट ॲन्ड्र्यू शाळेतले ते पहिले वर्ष फारच भयानक गेले. फक्त माझाच नाही, तर अप्पर हाउसमधल्या खूपशा मुलांचा हाच अनुभव होता. यातून एक जर कोणती चांगली गोष्ट झाली असेल, तर अशा टग्या आणि दादागिरी करणाऱ्या प्रवृत्तींबद्दल माझ्या मनात कमालीचा द्वेष निर्माण झाला. नंतर बऱ्याच वर्षांनी इंग्लंडमध्ये मी जेव्हा 'एसएएस' प्रशिक्षण घेऊ लागलो, तेव्हा तिथे एक मुख्य प्रशिक्षक होते. त्यांच्याविषयी सर्वांनाच खूप आदर होता. त्यांना पण अशा प्रवृत्तींबद्दल कमालीचा तिरस्कार वाटत होता. माझ्या तेथील प्रशिक्षणाच्या दरम्यान त्यांना आमच्या तुकडीतील दोन जवानांमध्ये अशी प्रवृत्ती असल्याचे जाणवले होते. त्या दोन जवानांवर २४ तास पाळत ठेवून त्यांना सुधारण्याची संधी त्यांनी दिली होती; पण त्यांच्यात काही सुधारणा होत नाही, असे जेव्हा दिसले, तेव्हा पूर्ण युनिटला धोका निर्माण होण्याआधीच त्या दोघांना त्यांनी डच्चू दिला होता.

सेंट ॲन्ड्र्यू शाळेच्या अप्पर हाउसमधील मुलांच्या अशा क्रूर वागणुकीची एक पद्धतच पडून गेली होती. शाळेच्या पहिल्या वर्षात सर्व छळवणुकीचा रोख तुमच्यावरच असे, पण एकदा का तुम्ही दुसऱ्या वर्षात

गेलात की, तुमच्यावरचे सिनिअरचे लक्ष कमी होत असे आणि प्रथम वर्षातील मुलांचा छळ करण्याची, त्यांच्याशी कसेही वागण्याची एक प्रकारे तुम्हाला अलिखित परवानगीच मिळे. मला मात्र या असल्या गोष्टीत अजिबात रस नव्हता. मी सिनिअर झाल्यावर त्या चेंजिंग रूम ते अभ्यासिका या दरम्यानच्या पळापळीच्या वेळी मी मुद्दाम तिथे उपस्थित न राहण्याची खबरदारी घेत असे. या सगळ्या पद्धतीचाच मला तिटकारा होता. जेव्हा-जेव्हा मी विचार करायचो, तेव्हा मला प्रश्न पडायचा की मेजर क्रँकशॉ या सगळ्या प्रकारचे आणि त्यांच्या या सामान्य अपराधासाठी आणि कधीकधी निरपराध्यांनापण छड्या मारण्याच्या शिक्षेचे खरोखरच कसे काय समर्थन करू शकतात? कदाचित त्यांचा असा समज असेल की, त्यांच्या या अशा वागणुकीमुळे आम्ही कणखर आणि टणक होऊ आणि शाळेनंतरच्या आयुष्यातल्या पुढल्या वाटचालीत येणाऱ्या प्रसंगांना तोंड द्यायला अधिक लायक होऊ किंवा अधिक सक्षम होऊ. या सर्वांमुळे अप्पर हाउसला एक ख्याती, एक वलय प्राप्त झाले होते. शाळेतल्या सर्व खेळांच्या स्पर्धांमध्ये बक्षिसे अप्पर हाउसलाच मिळत. रग्बींच्या खेळामध्ये अप्पर हाउसने चांगले नाव कमावले होते. अर्थात ते वेगळे सांगण्याची गरजच नाही की शाळेच्या रग्बी टीमचा शनिवारी जेव्हा सामना असे तेव्हा सर्वांना उपस्थित राहण्याची सक्ती असे. पण असा पाठिंबा मिळण्याचे भाग्य मात्र शाळेच्या हॉकी टीमच्या नशिबी नव्हते. उलट त्यांची 'मॉफ स्टॉक' म्हणून संभावना केली जायची. 'मॉफ म्हणजे समलिंगी आणि स्टॉक म्हणजे हॉकीची स्टिक'. शाळेतल्या माझ्या दुसऱ्या-तिसऱ्या वर्षांत रॅगिंगचे प्रकार कमी-कमी अनुभवायला यायला लागले आणि माझे शाळेतले दिवस जास्त सुसह्य झाले. माझ्या वडिलांना नेव्हीतून मिळणाऱ्या निवृत्तीवेतनाचा बऱ्यापैकी भाग माझी शाळेची फी भरण्यासाठी खर्च व्हायचा, याची मला पूर्ण जाणीव होती आणि मला तो एक प्रकारे पैशाचा अपव्यय वाटत होता. नंतरच्या काळात सेंट ॲन्ड्र्यू शाळेतून शिकून बाहेर पडलेल्या खूप जणांच्या गाठीभेटी झाल्या व प्रत्येकाला तिथल्या आलेल्या कडू-गोड अनुभवांबद्दल विचारले. बऱ्याच जणांच्या शाळेबद्दलच्या आठवणी रम्य होत्या, पण एकतर ते शाळेच्या वेगळ्या कालखंडातले विद्यार्थी होते किंवा त्यांच्या वाट्याला वेगळे वसतिगृह आलेले होते. उदाहरणच द्यायचे झाले, तर माझ्या अनेक साहसी मोहिमांमधील माझा सहकारी 'नीक मार्शल' याचेपण शिक्षण सेंट ॲन्ड्र्यू

शाळेतच झाले होते, पण त्याला रॅगिंगचा त्रास अजिबात झाला नव्हता. कारण तो अप्पर हाउसमध्ये नव्हता आणि मुख्य म्हणजे मी शाळा सोडल्यानंतर जवळ-जवळ १४ वर्षांनी तो त्या शाळेत शिक्षण घेत होता. माझ्या मालदीवच्या मोहिमेवरचा माझा फोटोग्राफर मित्र 'मायकेल वॉकर' हा माझ्याबरोबरच त्या शाळेत होता आणि त्याच्यापण रॅगिंगच्या कटू आठवणी होत्या.

आता तुम्हाला शाळेच्या त्या प्रसिद्ध पुस्तकात स्प्रिंग बोक रग्बी प्रशिक्षक 'नीक मीलेट, स्प्रिंग बोक खेळाडू; रायन कानकोव्हस्की, दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेट टीमचा कप्तान पीटर व्हॅन डर मेरवे यांच्या नामावलीत माझेही नाव एक प्रसिद्ध साहसवीर जलतरणपटू माजी विद्यार्थी म्हणून वाचायला मिळेल. एक 'प्रतिष्ठित साहसवीर माजी विद्यार्थी, म्हणून शाळेकडून आपली ओळख सांगितली जाणे, हे खरे तर अभिमानास्पद आहे आणि तसे वाटायलापण पाहिजे. पण मला मात्र त्याचा निर्भेळ आनंद घेता येत नाही. अगदी अलीकडे शाळेला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल एक स्मरणिका काढण्यात आली होती. त्यात माझा तो दक्षिण धुव्रावरच्या समुद्रात उडी मारतानाचा जगभर प्रसिद्ध झालेला फोटा छापला होता. तो बघताना पण माझ्या शाळेसंबंधीच्या भावनांमधली, ती सूक्ष्म का होईना, कटुता अजूनपण कमी झाली नसल्याचे माझे मलाच जाणवले. त्या फोटोखाली आमच्या शाळेचे बोधवाक्य छापलेले होते. 'संकटांनी आम्ही खचत नाही.' आणि पुढे लिहिले होते, 'मी शाळेचे बोधवाक्य शब्दश: जगलो आहे.' या सगळ्याने माझी छाती अभिमानाने खरे तर फुलून यायला हवी होती, पण तसे काही झाले नाही हे खरे! जेव्हा एखाद्या जागेबद्दलच्या तुमच्या आठवणी तितक्याशा चांगल्या नसतात, पण त्या ठिकाणी मात्र तुमची प्रेमाने आठवण काढली जाते, तेव्हा परिस्थिती खरोखरच अवघड होऊन बसते. माझ्या आधीच्या 'माउन्टहाउस' शाळेत सररास शारीरिक शिक्षा करण्याची पद्धत नव्हती. शाळेतील विद्यार्थ्यांची वर्तणूक तिथे शिस्तबद्ध आणि आदर्श अशी होती. पण त्या उलट अप्पर हाउसमध्ये शिक्षकांच्या हातात कायम छडी असायची आणि छोट्या-छोट्या कारणांसाठी तिचा मुक्त वापर व्हायचा, तरीपण बेशिस्तपणा आणि टगेगिरी हा विद्यार्थ्यांचा स्थायिभाव झाला होता, हे कसे? हा प्रश्न मला मेजर क्रँकशॉ यांना ते जेव्हा कधी भेटतील तेव्हा विचारायला नक्कीच आवडेल.

सन १९८५ साली वडिलांच्या औषधोपचाराच्या सुविधेच्या दृष्टीने विचार करून आम्ही 'ग्रॅहम्सटाऊन' सोडले. वडिलांच्या विसराळूपणात क्रमाक्रमाने होणारी वाढ, त्यांच्या मन:स्थितीत वारंवार होणारे बदल यांच्या कारणांचा उलगडा होण्यात काही वर्षे गेली आणि जेव्हा अल्झायमरचे निदान झाले, तेव्हा मग आम्हाला त्यांना उत्तम उपचार मिळण्याच्या दृष्टीने योग्य असे केपटाऊनमधील एक हॉस्पिटल सुचवण्यात आले. भविष्यात पुढे काय वाढून ठेवले होते याची आम्हाला कोणालाच कल्पना नव्हती, पण त्या रात्री आमची 'रॉयल मेल सर्व्हिस'ची सेंट हेलेना बोट जेव्हा बंदराला लागली, तेव्हा का कोण जाणे, मला सारखे वाटत होते की राहण्याच्या दृष्टीने हे ठिकाण सुंदर असणार. कॅरोलीनची डायनोसियन स्कूलमधील शेवटची एकच टर्म राहिली होती म्हणून ती तिथेच वसतिगृहात राहिली. येथील माझ्या नव्या शाळेचे नाव होते 'कॅम्पस बे हायस्कूल' आणि ते आमच्या नव्या घराच्या अगदी जवळ होते.

आमचे टोनी वर्थहॅम सर नेहमी म्हणायचे की, एखाद्या शाळेची परीक्षा किंवा खरी ओळख मी त्या शाळेच्या स्वच्छतागृहाच्या अवस्थेवरून एका क्षणात करेन. ''कॅम्पस बे हायस्कूल'बद्दलचे माझे चांगले मत सुरुवातीच्या काही घटनांमुळे जवळ-जवळ लगेचच बनून गेले. शाळेच्या पहिल्या दिवशी मी सेंट ॲन्ड्र्यू शाळेतील प्रथेप्रमाणे युनिफॉर्मच्या शर्टाची वरपर्यंतची बटणे लावून, टाय अगदी प्रमाणबद्धपणे लावून, जॅकेटची खालपर्यंतची बटणे लावून अगदी टिपटॉप युनिफॉर्ममध्ये दाखल झालो. मी शाळेत नव्याने दाखल झालो होतो, ही गोष्ट खरी असली, तरी मी तिसऱ्या वर्षाचा विद्यार्थी होतो आणि मला इतरांचे लक्ष वेधून घेण्यासाठी इतक्या औपचारिकपणे युनिफॉर्म घालण्याची गरज नव्हती. थोड्याच दिवसांत बेथ नावाच्या मुलीने स्वत:ची ओळख करून देत मला स्पष्टच सांगितले की, तो टाय जरा सैल कर. ब्लेझरची एक-दोन बटणे काढआणि अरे माणसा, जरा मोकळाढाकळा हो. शाळेत नव्याने दाखल झालेल्या आणि अवघडलेल्या परिस्थितीतील मुलाला मदत करण्याचा आणि त्याचे सुरुवातीचे दिवस सुखावह करण्याचा यापेक्षा दुसरा चांगला मार्ग मला तरी सुचत नाही. हा फक्त बेथच्या मैत्रीचा परिणाम नव्हता, तर एकंदरीतच शाळेचे वातावरण खूपच मोकळे आणि आश्वासक होते. कॅम्पस बे शाळेचे एकंदरीत वातावरण आणि तिथली

संस्कृती मला एकदम भावली, मी तिच्या प्रेमातच पडलो आणि हीच शाळा माझ्यासाठी योग्य होती, याची मला खातरीच पटली.

मला वाटते, शाळेची खरी ओळख, शाळेचा स्वभाव, वर्गांना जोडणाऱ्या सामाईक व्हरांड्यावरून कळतो. येथे मुलामुलींच्या वागण्या-बोलण्यात एक प्रकारचा मोकळेपणा होता. शाळेचे बोधवाक्य होते 'उत्तुंगतेचा ध्यास घ्या' आणि खरोखरच कॅम्पस बे शाळेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या किंवा तिच्या आवडत्या क्षेत्रात, विषयात उत्तुंगतेचा ध्यास घेण्यासाठी प्रोत्साहित केले जायचे. येथेही शाळेची रग्बीची टीम होती, पण तुम्हाला जर त्यात भाग घ्यायचा नसेल किंवा तुम्हाला नीट खेळता येत नसेल, तरी तुम्हाला कमी लेखले जायचे नाही किंवा तुमच्यावर वैयक्तिक खेळांच्या स्पर्धांमध्ये भाग घेण्याची सक्ती केली जायची नाही. एवढेच नव्हे, तर तुम्हाला जर बुद्धिबळात रस असेल किंवा सर्फिंग करायला आवडत असेल, तुम्हाला अभिनयाची आवड असेल किंवा लांब अंतरांच्या शर्यतीत पळण्याची आवड असेल तरी तुमचे रग्बी खेळणाऱ्या खेळाडूइतकेच कौतुक व्हायचे, तितकेच प्रोत्साहन तुम्हाला मिळायचे. माझ्या वर्गातील जस्टिन स्ट्राँगने १९९१ साली जगातील सर्फिंग चॅम्पियनशिप मिळवली. तुम्ही स्पर्धेमध्ये पहिले, पाचवे किंवा शेवटचे आलात, याला तिळमात्र महत्त्व नव्हते; तर तुम्ही स्पर्धेमध्ये भाग घेतलात आणि मनापासून प्रयत्न केलात, याचेच कौतुक होत असे.

या सगळ्याचे श्रेय खरे तर त्या सदा हसतमुख, रूपेरी केसाच्या माणसाकडे नि:संशयपणे जाते. आमच्या शाळेत हेडमास्तर म्हणून येण्याआधी ते केपटाऊनमधल्या प्रसिद्ध 'एसएसीएस' शाळेत शिक्षक होते. त्या सद्‌गृहस्थाचे नाव होते जॉन इंक ते कोणत्याही विद्यार्थी किंवा विद्यार्थिनीला फक्त त्याच्या किंवा तिच्या नावानिशीच ओळखत नव्हते, तर त्याच्या किंवा तिच्या पालकांशीही त्यांचा संवाद असे. म्हणूनच सरांच्या नावाचा उल्लेख आल्यावर त्यांना ओळखणाऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलल्याशिवाय राहत नसे.

कॅम्पस बे हायस्कूलची जागा किंवा ठिकाण अशा काही मोक्याच्या जागी आहे की, तिथून संपूर्ण केपटाऊन शहर तर नजरेत येतेच; पण जगातील सर्वांत नयनरम्य असा देखावा या शाळेतून दिसतो, असे माझे ठाम मत आहे. शाळेची इमारत छोट्याशा टेकडीवर आहे. तिथून खाली नजर टाकली, तर

खडकाळ पसरलेले 'मेडनस कोव' दिसते. थोडे डाव्या बाजूला कॅम्पस बे बीचचा पांढऱ्या वाळूचा समुद्रकिनारा नजरेस पडतो, पण खरे तर डोळ्यांत मावत नाही तो समोर पसरलेला अथांग अटलांटिक महासागर. शाळेच्या कोणत्याही भागातून पाहिले, तरी नजरेस पडतो तो अथांग पसरलेला असा अटलांटिक महासागर. मी सांगतो आहे, त्यात अजिबात अतिशयोक्ती नाही, कारण वर्गातला माझा बराचसा वेळ त्या महासागराकडे पाहण्यात, काल्पनिक मोहिमा आखण्यात आणि निरनिराळी स्वप्ने पाहण्यात जायचा. पहिल्याच दिवशी, आम्हाला 'आफ्रिकान' भाषा शिकवणाऱ्या 'ख्रिस व्हॅन जार्सवेल्ड' सरांच्या तासाला वार्गातले बेंच इंग्रजी यू अक्षराप्रमाणे मांडले गेले आणि अर्थातच समुद्राचा अथांग विस्तार सतत डोळ्यांसमोर राहिल अशी जागा मी पटकावणे क्रमप्राप्तच होते. (आफ्रिकान ही दक्षिण आफ्रिकेची राष्ट्रभाषा आहे. ही भाषा बरीचशी डच भाषेशी मिळतीजुळती आहे.) माझ्या बाजूला माझा मित्र लेनजॉन व्हॅनडर वेल बसायचा. आम्हाला एकत्र आणणारा समान दुवा म्हणजे दोघांनाही असलेले समुद्राबद्दलचे आकर्षण आणि अतोनात प्रेम. दुसरी गोष्ट म्हणजे लेन जॉनला आफ्रिकान भाषेची माझ्यापेक्षा जास्त चांगली समज होती. तो माझा मित्र आणि आफ्रिकान भाषेचा वैयक्तिक शिक्षकपण होता. वर्गात बसल्या-बसल्या आमच्या बाकावरून समुद्रावरील वाऱ्यांचा, त्यांच्या वेगांचा, त्यांच्या दिशांचा अंदाज आम्ही करत असू. जर वारा जोरात म्हणजे साधारणत: ३५ नॉट वेगाने आणि आग्नेय दिशेने वाहत असेल, तर समुद्राचा सपाट असा बिलोरी आरसा व्हायचा व त्या चमचमणाऱ्या पाण्यावर आम्ही कल्पनेतून बऱ्याच आकृत्या बघायचो. अगदी क्षितिजापर्यंत पसरलेल्या पाण्यावरच्या त्या नाचऱ्या आकृत्या आणि अधूनमधून उडणारे तुषार इत्यादी अगदी स्पष्ट दिसायचे. त्या आग्नेय वाऱ्याचा परिणाम फक्त पाण्याच्या पृष्ठभागावरच जाणवायचा. पाण्याचा पृष्ठभागच फक्त नाचरा व्हायचा, त्यावर अस्पष्ट लाटा उठायच्या. या आग्नेय वाऱ्यामुळे उन्हाळ्यात पाण्याचे तापमान आल्हाददायक अशा १६°से.वरून घसरून बोचरे थंड असे जवळ-जवळ १०° से. पर्यंत उतरायचे. त्या उलट थंडीत नैऋत्य वारे वाहायचे आणि उबदार पाण्याचे प्रवाह यायला सुरुवात व्हायची, त्यामुळे समुद्राचे पाणी उन्हाळ्यापेक्षा थंडीत अधिक उबदार व्हायचे. जेव्हा नैऋत्य वारे त्यांच्या पूर्ण जोशात वाहायचे, तेव्हा समुद्र खवळलेला असायचा. मोठ्या-मोठ्या लाटा किनाऱ्यावर येऊन थडकायच्या.

मी आणि लेन जॉनने त्या काळात खूप स्वप्ने पाहिली. खूप काल्पनिक धाडसी मोहिमा आखल्या आणि कधी ना कधी त्या वास्तवात आणण्याच्या आणाभाका घेतल्या. पुढे लेन जॉन हॉलंडला त्याच्या देशात परतला. नंतर त्याने शिडाच्या बोटीतून अटलांटिक समुद्र पार करण्याच्या शर्यतीत भाग घेतला होता.

आमचे कॅम्पसबे मधले घर मधल्या रस्त्याने, शाळेपासून पाचच मिनिटांच्या अंतरावर होते. हा मधला रस्ता किंवा शॉर्टकट छानशा घनदाट झाडी असलेल्या भागातून, नदीच्या कोरड्या पडलेल्या पात्रातून आणि शेवटी आमच्या शाळेच्या एका मैदानातून शाळेपर्यंत जात होता. आमचे घरपण जरा उंचावरच, म्हणजे जवळ-जवळ शाळेच्याच पातळीवर होते. रात्री गादीवर पडल्यावर, रात्रीच्या नीरव शांततेत, खालच्या अंगाला खडकावर येऊन आदळणाऱ्या लाटांचा आवाज सतत ऐकू येत असे. एखाद्या वादळी रात्री घोंघावणाऱ्या वाऱ्यामुळे घराचे छप्पर, खिडक्यांची तावदाने इत्यादी उडून जातील की काय; अशी भीती वाटायची. शाळा संपल्यावर माझा बहुतेक वेळ समुद्रात किंवा समुद्राच्या काठी चौपाटीवर जात असे. समुद्रात पोहणे, पांढऱ्या वाळूत पळणे, पाण्यावर सर्फिंग करताना तोल सांभाळण्याचा सराव करणे इत्यादी माझे उद्योग सतत चालू असत. त्या दूरवरच्या क्षितिजापलीकडे काय आहे, ते बघण्याची अनिवार ओढमला लागली होती. पोर्तुगीज दर्यासारंगांनी जवळ-जवळ ५०० वर्षांपूर्वी, शिडाच्या बोटींतून केप ऑफ गुड होपला वळसा घालून जगाच्या पूर्व दिशेला जाणाऱ्या समुद्री मार्गाचा शोध घेण्यासाठी खरोखरच कसे काय धाडस केले असेल? अगदी वादळी दिवशीसुद्धा आपल्या छोट्या-छोट्या शिडाच्या लाकडी बोटी समुद्रात बेदरकारपणे ढकलणाऱ्या त्या जिगरबाज माणसांचे मला नेहमीच नवल वाटत आले आहे. बार्थेलम्यु डायसने केपला वळसा घालणारा 'पहिला माणूस' म्हणून मान पटकावल्यावर त्या जागेचे 'वादळी केप' असे नव्याने नामकरण झाल्याचे मला फारसे आश्चर्य वाटले नाही. पोर्तुगालच्या प्रिन्स हेन्रीने त्याचे नाव नंतर 'केप ऑफ गुड होप' असे केले. नंतर 'वास्को द गामा'ने केपला वळसा घालून पुढे पूर्वेला जाणारा समुद्री मार्ग पहिल्यांदा शोधण्याचा मान पटकावला.

मला ध्यास लागला होता दक्षिण ध्रुवावर जाण्याचा. मी जिथे होतो,

तिथून खाली दक्षिणेला जवळ-जवळ ५,००० कि.मी. अंतरावर दक्षिण ध्रुव होता. का कोणास ठाऊक! मला नीट सांगता येणार नाही, पण मला मनोमन वाटत होते की, एक दिवस मी दक्षिण ध्रुवावर नक्की जाणार आहे. मी स्वप्नरंजनात दंग होत असे. त्या प्रचंड बर्फाचे कडे, पाण्यात तरंगणारे मोठमोठे बर्फाचे खंड, ते पेंग्विन, ते समुद्रात नक्षीकाम करत घुसलेल्या निळ्याशार हिमनद्या, क्रिस मासे खाणारे ते प्रचंड देवमासे इत्यादी असो! इसवी सनच्या सोळाव्या शतकात समुद्रातून पृथ्वी प्रदक्षिणा करण्याचे साहस करणारे सर फ्रान्सिस ड्रेक (१५४०-९६) हे इंग्लंडच्या डेव्हॉन परगण्यातल्या टॅव्हिस्टॉकचे. आज नौकानयनाच्या दर्यावर्दींच्या इतिहासात ते नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. तसेच इंग्लंडच्या त्याच भागातून आलेले दुसरे मोठे दर्यासारंग म्हणजे कॅप्टन रॉबर्ट स्कॉट. त्यांनी १९१२मध्ये दक्षिण ध्रुवावरच्या अपयशी आणि दुर्दैवी मोहिमेचे नेतृत्व केले होते. मीसुद्धा इंग्लंडच्या त्याच भागातून आलो होतो, ही कल्पना मनाला कोठे तरी सुखावत होती. लहानपणी कॅप्टन स्कॉट यांची गोष्ट माझी खूप आवडती होती. ती गोष्ट परत परत सांगण्यासाठी आईकडे केलेला हट्ट मला अजून आठवतो. त्या गोष्टीत त्या शेवट-शेवटच्या ओळी ऐकतानाची झालेली छातीतील धडधड, माझे विस्फारलेले डोळे इत्यादी मला अजून स्पष्टपणे आठवते. त्या ओळी काहीशा अशा होत्या 'गोठलेल्या, जखमा झालेल्या बोटांमध्ये पेन्सिलपण धरणे अशक्य झाले होते तरीपण, तशाही अवस्थेत कॅप्टन स्कॉट यांनी धडपडत त्यांच्या डायरीमध्ये शेवटच्या नोंदी केल्या.' त्यातील एक तर फारच हृदयस्पर्शी होती. कॅप्टन स्कॉट लिहितात, 'आम्ही जगलो असतो, तर माझ्याकडे माझ्या सहकाऱ्यांच्या पराकाष्ठेच्या सहनशक्तीची, अतुल धैर्याची, त्यांच्या जिगरीची साक्ष देणारी गोष्ट सांगण्यासारखी होती. मला खातरी आहे की, ती गोष्ट ऐकून प्रत्येक इंग्रज माणसाचे हृदय अभिमानाने भरून आले असते. तरीपण माझ्या डायरीतल्या नोंदी आणि आमची मृत शरीरेपण तुम्हाला खूप काही सांगून जातील.' एकदा मी आफ्रिकेच्या अगदी दक्षिण टोकाला गेलो होतो, तेव्हापण माझ्या मनात हाच विचार होता, 'आता माझ्या आणि दक्षिण ध्रुवामध्ये हा एवढा समुद्रच फक्त आहे.' मला खातरी होती की, माझ्या कुंडलीत दक्षिण ध्रुवावर जाण्याचा योग नक्की आहे. आणि कॅप्टन स्कॉटनी तिथे जे-जे पाहिले, ते-ते सर्व

मीपण पाहणार होतो.

ते माझे स्वप्न होते, हे जरी खरे असले, तरी त्या स्वप्नरंजनाला वास्तवाचा काही आधार होता का? एखादा स्वप्नाळू मुलगा त्याच्या बालपणात असे काय करून दाखवू शकेल की, ज्यामुळे हा मुलगा पुढे दक्षिण धुव्रावर जाईल, निरनिराळे विक्रम करेल यांची पूर्वकल्पना येऊ शकेल? हे सगळेच इतके धूसर, अनिश्चित आणि हवेत होते की, माझ्या स्वप्नांबद्दल मी कोणाला काही बोललोपण नाही. ते कोठेतरी माझ्या अंतर्मनात खोल कप्प्यात दडून राहिले. बाकी कोणाला माहीत नसलेली, पण माझ्या मात्र मर्मबंधातली ठेव! मला स्वत:ला खातरी होती की, मी काहीतरी वेगळे करणार होतो, पण इतरांना मात्र माझ्या आयुष्यातल्या नंतरच्या स्थित्यंतराची कल्पना येण्याचे कारणच नव्हते. माझ्या ध्येयांच्या पूर्तीसाठी जोपर्यंत मी माझ्या प्रयत्नात शिस्त, एकाग्रता आणि अभ्यासूवृत्ती आणली नसती; तोपर्यंत माझी ओळख ही एका सर्वसामान्यापेक्षा थोडा बरा विद्यार्थी अशीच राहणार होती.

कॅम्पस बे हायस्कूल ही एक जादूई जागा होती. शारीरिक शिक्षणासाठी सर आम्हाला बीचवर घेऊन जायचे, वाळूत खुणा करून पीच तयार केले जायचे आणि टीम्स पाडून आम्ही रग्बी खेळायचो. खेळणे झाल्यावर आम्ही अटलांटिक समुद्रात पोहायला उतरायचो. माझ्यासारख्या ग्रॅहम्स-टाऊनमधल्या 'फक्त मुलांच्या' शाळेतून आलेल्यासाठी तर नवीन शाळेतल्या मुलींचे अस्तित्व ही एक वेगळी गोष्ट होती. मी आमच्या शाळेच्या अँटोनीट मालहर्ब नावाच्या मुलीच्या प्रेमात (एकतर्फी?) पडलो. ती आमच्या शाळेतली सर्वांत सुंदर मुलगी होती. इतिहासाच्या तासाला ती माझ्या पुढच्या बेंचवर बसायची. मी तिचे पोनीटेलमध्ये बांधलेले केस हळूच ओढायचो आणि तिने वळून बघण्याआधीच, आपण त्या गावचे नाही असा साळसूदपणाचा आव आणत इकडेतिकडे बघायचो. अर्थात पुढे आमच्या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले नाही, पण आम्ही एकमेकांचे चांगले मित्र झालो. अँटोनीट दिसायला सुंदर होतीच, पण तिच्याकडे नजरेत भरणारे व्यक्तिमत्त्वही होते. त्यामुळे वरच्या वर्गातल्या मुलांचापण तिच्यावर डोळा असायचा. माझ्या दक्षिण धुव्रावर जाण्याच्या स्वप्नाप्रमाणेच माझ्या या एकतर्फी प्रेमाची गोष्टपण माझ्या हृदयात इतरांपासून मी लपवून ठेवली.

कॅम्पस बे स्कूलचे वातावरण खूपच मोकळे आणि सुंदर तर होतेच, पण त्याचबरोबर शैक्षणिक गुणवत्तेतही शाळा नेहमी आघाडीवर असायची. माझ्या वर्गातल्या दोन मुलांनी पुढे केंब्रिज विद्यापीठात प्रवेश मिळवला, पाच-एक जण पुढे डॉक्टर झाले आणि कित्येकांनी पुढे निर्विवादपणे उत्तम असलेल्या 'केपटाऊन विद्यापीठात' प्रवेश मिळवले. पण त्या सर्वांपेक्षा वेगळ्या कारणासाठीच मला आज शाळेची आठवण प्रकर्षाने होते. शाळेचे वेगळेपण होते, ते तिच्या अंतर्बाह्य सुसंस्कृतपणात, विद्यार्थ्यांना दिलेल्या आदराच्या वागणुकीत आणि टोनी वर्थहॅम सरांच्या शिक्षण, संस्कार आणि कर्तव्य या गोष्टींत सांगड घालून तारतम्य बाळगण्याच्या शिकवणुकीत.

माझ्या शेवटच्या वर्षात आमचा वर्ग आमच्या ख्रिसवॅन जार्स वेल्ड सरांच्या आद्याक्षरांवरून ओळखला जायचा. 'आफ्रिकान' भाषेचा काही आगापिछा नसल्यामुळे मला तो विषय सर्वांत कठीण वाटत होता. पण मला मॅट्रिकची परीक्षा पास होऊन युनिव्हर्सिटीत प्रवेश मिळवण्यासाठी त्या विषयात उत्तीर्ण होणे आवश्यक होते. त्या विषयात मी पास होईन की नाही, याची खातरी नसल्यामुळे माझी आई 'जॉन इंक' सरांना आणि 'ख्रिस' सरांना जाऊन भेटली. ख्रिस सरांनी तिला धीर देताना सांगितले की, 'आफ्रिकान' भाषा न येणारे लुईसपेक्षा ढविद्यार्थी माझ्या वर्गात होते, पण सुद्धा परीक्षेच्या दिव्यातून सहीसलामत सुटलेच ना! तुम्ही फार काळजी करू नका.'

ख्रिस सरांना एड्स झाला होता. खरे म्हणजे दक्षिण आफ्रिकेत एड्सचे निदान झालेल्या पहिल्या काही रुग्णांपैकी ते एक होते. त्यांना उपचारासाठी वेगवेगळ्या वेळी हॉस्पिटलमध्ये जावे लागे. जॉन इंक सरांनी माझ्या वडिलांना पत्र लिहून ख्रिस सरांच्या आजाराविषयी सांगितले होते. आज एड्सविषयी जितकी जागरुकता आणि माहिती सर्वांना आहे, तेवढी त्या वेळी सर्वसामान्यांना अजून झाली नव्हती. त्यामुळे बऱ्याच पालकांना त्यांच्या मुलाला त्यांच्यामुळे संसर्ग होईल की काय, अशी भीती वाटायची. ख्रिस सरांचा आजार अधिकच बळावला. त्यांची देहयष्टीपण रोडावली आणि ते अधिकच खंगल्यासारखे दिसू लागले. त्यांना तशा अवस्थेत बघणे ही माझ्यासाठी फार दु:खद गोष्ट होती. त्यांच्या तब्येतीमुळे त्यांचे शाळेत येणे हळूहळू कमी झाले. मध्येमध्ये बरेच दिवस ते यायचे नाहीत, परत मधूनच जरा तब्येतीत सुधारणा झाल्यावर थोडे दिवस ते यायचे. परत येईनासे व्हायचे

आणि एक दिवस ते गेल्याची दु:खद बातमी आम्हाला कळली. त्यांच्या जागी दुसरे शिक्षक आले, पण ख्रिस सरांना विसरणे अशक्य होते. ख्रिस सरांची भविष्यवाणी मात्र खरी झाली. मी 'आफ्रिकान' विषयात पास झालो.

कॅम्पस बे स्कूल सोडल्यावर बऱ्याच वर्षांनी मी जेव्हा केपटाऊनला परतलो, तेव्हा जॉन इंक सरांना बरेच वेळा भेटलो आणि शाळेतल्या त्या जुन्या आठवणींची उजळणी केली. मधल्या काळात दोघांच्या आयुष्यात काय-काय घडले, आयुष्यांनी कशी वळणे घेतली, याबद्दल एकमेकांपाशी मने मोकळी केली. सरांनी मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झाल्यावर काय-काय केले, ते मला सांगितले; तर मी केपटाऊन विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतल्यावर आयुष्यात मिळालेल्या काही संधींचे कसे सोने केले; हे मी त्यांना सांगितले, तेव्हा त्यांना खूप आनंद झालेला दिसला. मी जेव्हा त्यांना तोपर्यंत केलेल्या धाडसी कृत्यांची, आखलेल्या मोहिमांची माहिती सांगितली; तेव्हा त्यांना डोळ्यासमोरचा जुना, काटकुळा, नाजूक प्रकृतीचा लुईस आठवला. त्यांनी माझी खूप थट्टामस्करी केली. पण नंतर गंभीर होत सर म्हणाले, ''नाही लुईस! तू काही वेगळाच होतास, तुझ्यात ती रग, धमक होती आणि त्याची मला पुरेपूर जाणीव होती.''

आज मागे वळून बघताना मला वाटते, फक्त तेवढेच नाही, तर मला आणखी खूप काही करायचे होते. प्रत्येक नवीन वर्षात गेलेल्या वर्षापेक्षा काहीतरी जास्त करून दाखवायचे होते, मिळवायचे होते आणि मुख्य म्हणजे विद्यापीठात प्रवेश मिळवून उच्च शिक्षण नक्की घ्यायचे होते आणि आयुष्यात काहीतरी मिळवायचे होते. मला वाटते ध्येय गाठायला निश्चय, निर्धार याहीपेक्षा आणखी काहीतरी लागते आणि ते माझ्याकडे होते, हे नक्की! माझ्या दक्षिण ध्रुवावरच्या एका मोहिमेच्या जाहिरातवजा वार्तापत्रात त्या मोहिमेच्या पुरस्कर्त्याने चांगल्या प्रकारे ते दाखवले होते. त्या चित्रातील दक्षिण ध्रुवावरून पेंग्विन पक्ष्यांच्या विरुद्ध दिशेने मी चालतो आहे, असे दाखवले होते. प्रवाहाविरुद्ध पोहायचे, हे मला काही नवीन नव्हते आणि अवघडही वाटत नव्हते, आणि मुख्य म्हणजे हे मी मुद्दाम करायचे, म्हणूनपण करत नसे. तर ती माझी एक उपजत प्रवृत्ती होती, एक स्वाभाविक अशी काही तरी वेगळे करण्याची मनोवृत्ती होती.

ज्येष्ठ लेखिका भावना भार्गवे यांचे निधन

साहित्य-संस्कृती आणि शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ लेखिका भावना दत्तात्रय भार्गवे (८४) यांचे नाशिक येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून व दोन मुली असा परिवार आहे. हं. प्रा. ठा. महाविद्यालयातील जनसंज्ञापन विभागाच्या प्रमुख तथा लेखिका डॉ. वृंदा भार्गवे यांच्या त्या मातोश्री होत.

सुमारे ३६वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत राहिलेल्या भावना भार्गवे यांचा महाराष्ट्रातील विविध शहरांमधील साहित्य चळवळ व सांस्कृतिक कार्यक्रमांशी निकटचा संबंध आला.

आशयपूर्ण कथा, कादंबरी व चरित्र याद्वारे त्यांनी लिखाणाची वेगळी शैली मांडली. 'पद्मश्री दादासाहेब गायकवाड' या त्यांच्या चरित्रात्मक खंडास राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला आहे.

'गतिमान युगातील गवईसाहेब', 'रात्रंदिन आम्हा', 'मुख्यमंत्री (अनुवाद)', 'मृत्यूपासून अमृताकडे', 'शिवदर्शन-छत्रपती शिवाजी महाराजांचे छोट्यांसाठी चरित्र', 'दिवस सणासुदीचे', 'मुलगी वाढवायचीय', 'आनंदाची कारंजी', 'नगरसेविकांची सामर्थ्यशीलता' असे विपुल लेखन त्यांनी केले. भार्गवे यांनी अनेक परिसंवाद व चर्चासत्रांमध्ये सहभाग घेतला.

शिक्षणाधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळल्यावर शासकीय कन्याशाळेतून त्या निवृत्त झाल्या. सांस्कृतिक-साहित्यिक चळवळीशी संबंधित असणाऱ्या कलायतन संस्थेच्या त्या संस्थापक होत्या. या संस्थेमार्फत आयोजित बालगंधर्व अमृत महोत्सवात भार्गवे यांनी स्वत: ७५ हजार रुपयांची देणगी संकलीत करून बालगंधर्वांकडे सुपूर्द केली होती.

कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांच्याशी त्यांचे निकटचे संबंध होते. कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या विश्वस्त, साहित्य भूषण समितीच्या कार्यवाह

यांसह लोकहितवादी मंडळ व सार्वजनिक वाचनालय या संस्थांमध्ये त्या कार्यरत होत्या.

मानवी हक्क अभियानाचे ॲड. एकनाथ आवाड यांचे निधन

दलित, आदिवासी समाजात कर्मकांड आणि जातीव्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करणारे, आंबेडकरी चळवळीचे लढाऊ नेते ॲड. एकनाथ आवाड (६५) यांचे हैदराबाद येथे निधन झाले. आवाड यांना रक्तदाब व हृदयरोगाचा त्रास होत होता. मानवी हक्क अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागात कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करत त्यांनी 'कसेल त्याची जमीन' हे जनआंदोलन उभारले. तैलगाव येथील नेल्सन मंडेला वसाहत परिसरात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

वडवणी तालुक्यातील दुकडेगाव येथे पोतराजाच्या कुटुंबात जन्मलेल्या ॲड. एकनाथ आवाड यांनी वडिलांचे केस कापून पोतराज प्रथेवर पहिला घाव घातला. घरातूनच संघर्ष सुरू करून आवाड यांनी पोतराजाच्या प्रथेतून शंभरहून अधिक कुटुंबांची सुटका केली. औरंगाबादमध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेताना आंबेडकरी विचारधारेशी त्यांची नाळ जोडली गेली. समाजसेवा पदविका घेतल्यानंतर ठाणे जिल्ह्यात विवेक पंडित यांच्या विधायक संसद बरोबर मातंग आणि आदिवासी समाजातील कुप्रथांविरोधात काम करण्यास त्यांनी सुरुवात केली. काही काळानंतर आवाड यांनी मानवी हक्क अभियानाची स्थापना केली. दलितांवरील अन्याय अत्याचाराविरुद्ध धावून जाणारी फळी उभी केल्याने आवाड हे 'जीजा' म्हणून सर्वदूर परिचित झाले. डॉ. बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग होता. दादासाहेब क्षीरसागर यांच्यासोबत राज्यात ठिकठिकाणी गायरान जमिनी नियमानुकूल करून हजारो कुटुंबांना जमिनी मिळवून दिल्या. २००१ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने वंशभेदविरोधी परिषद घेतली होती. त्यामध्ये समाजसेवी संस्थांच्या माध्यमातून एकनाथ आवाड सहभागी झाले होते. त्यांनी आपले संघर्षमय जीवन 'जग बदल

घालूनी घाव’ या आत्मचरित्रातून मांडले आहे. दहा वर्षांपूर्वी बहुजन समाज पक्षाच्या उमेदवारीवर उस्मानाबाद मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवली. त्यातून माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांच्याशी झालेला संघर्षही वाढला. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्या कामावर वेगवेगळ्या संशोधकांनी ५ पुस्तके लिहिली आहेत. २७ जणांनी त्यांनी केलेल्या कार्यावर पीएच.डी.साठी विद्यापीठाकडे प्रबंधही सादर केले आहेत.

जॉन नॅश यांचा अपघाती मृत्यू

अर्थशास्त्राचे ‘नोबेल’ व गणितातील ‘आबेल’ असे दोन प्रतिष्ठेचे पुरस्कार पटकावणारे ख्यातनाम गणितज्ञ जॉन नॅश (८६) यांचा पत्नी अलिसिया (८३) यांच्यासह मोटार अपघातात मृत्यू झाला. अलीकडच्या काळातील सर्वांत प्रज्ञावान गणितज्ञ म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या जीवनावर ‘ए ब्यूटीफुल माइंड’ हा चित्रपट २००१ मध्ये साकारण्यात आला होता. त्यात रसेल क्रो यांनी नॅश यांची भूमिका केली होती. नुकतेच नॅश यांना गणितातील आबेल या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. प्रिन्स्टन विद्यापीठात त्यांचे शिक्षण झाले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ते टॅक्सीतून प्रवास करीत असताना ती अचानक रस्त्याच्या कडेला असलेल्या अडथळ्यांवर आदळली. हा आघात एवढा मोठा होता की, दोघे पती-पत्नी टॅक्सीतून बाहेर उडाले, त्यात त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी सीटबेल्ट लावलेला नव्हता.

प्रिन्स्टन विद्यापीठातच ते राहात होते. त्याच विद्यापीठात त्यांनी ‘गेम थिअरी’वर विशेष काम केले होते. त्यांना १९९४ मध्ये अर्थशास्त्रातील नोबेल देण्यात आले होते. नॅश यांना छिन्नमनस्कतेचा विकार (स्क्रीझोफ्रेनिया) होता व त्या आजाराशी झगडत त्यांनी मानसिक आरोग्याचे पुरस्कर्ते म्हणून काम केले, नॅश यांच्या निधनाने धक्का बसल्याचे अभिनेते रसेल क्रो यांनी म्हटले आहे, अतिशय सुंदर मैत्री संपली. सुंदर मने व सुंदर हृदये जुळली होती ती विदीर्ण झाली असे त्यांनी सांगितले.

जॉन यांना १९९४ मध्ये गणितातील धोरणात्मक निर्णय, कुशल डावपेच, नफा-तोटा या 'गेम्स थिअरी'वर व अर्थशास्त्रामधील योगदानाबद्दल नोबेल पुरस्काराने गौरविण्यात आले होते. विशेष म्हणजे अर्थशास्त्र हा विषय ओझरता शिकले होते.

पदवीसाठी त्यांनी अभियांत्रिकी हा विषय निवडला होता. पण त्यांनी रसायनशास्त्रातून पदवी घेतली होती. वीस वर्षे वयाचे असताना त्यांनी डॉक्टरेटसाठी संशोधन केले होते. त्यावेळी अर्थशास्त्रासाठी नोबेल पुरस्कार दिला जात नव्हता. तब्बल ४४ वर्षानंतर त्यांचा प्रबंध नोबेलसाठी विचारात घेतला गेला. तो फक्त २७ पानांचा होता.

चित्रकार बाबा पाठक

चित्रकलेत महत्त्वाचे काम करतानाच स्वातंत्र्य चळवळीतही योगदान दिलेले ज्येष्ठ चित्रकार आर. व्ही. तथा बाबा पाठक यांनी १३ जून रोजी वयाची शंभरी पूर्ण करून आठवड्यातच जगाचा निरोप घेतला. कलाप्रेम, प्रयोगशीलता आणि व्यावसायिकतेचा संगम साधत त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला.

त्यांच्या कन्या राणी साठे यांनीच बाबांचा जीवनपट उलगडला. तत्कालीन औंध संस्थानाचा भाग असणाऱ्या साताऱ्याच्या परिसरात १३ जून १९१५ रोजी पाठक यांचा जन्म झाला. स्वातंत्र्यापूर्वीच्या औंध संस्थानाच्या या भागात पंतप्रतिनिधींसारख्या कर्तबगार, कलाप्रेमी आणि गुणग्राहक संस्थानिकामुळे अनेक चित्रकार शिल्पकार उदयास आले. देवधर मास्तर, माधवराव सातवळेकर, व्ही के पाटील हे बाबा पाठकांचे गुरू होते. पुढे पाठक यांनी बडोद्याला जाऊन 'कलाभवन' मधून चित्रकारितेतील पदविका प्राप्त केली. १९४०च्या सुमारास ते मुंबईत गेले. 'बॉम्बे आर्ट सोसायटी गॅलरी'मध्ये झालेले त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन गाजले. तो काळ स्वातंत्र्यसमराचा होता. त्यापासून अलिप्त राहणे बाबांना शक्य नव्हते. ते पुण्याला आले आणि त्यांनी स्वातंत्र्यचळवळीत उडी घेतली. त्यांच्या नावे अटकेचे वॉरंट निघाल्याने ते काही वर्षे भूमिगत होते.

आर्थिक चणचणीतून सुटका मिळवण्यासाठी बाबांनी स्वत:चे कलाप्रेम, प्रयोगशीलता आणि व्यावसायिकता यांचा संगम साधत कोल्ड सिरॅमिक्य आणि म्यूरल्स तयार करण्यास सुरुवात केली. त्यांच्या या कलाकृती

भारतभरात आणि हाँगकाँग, दुबई, सिंगापूर येथेही विराजमान झाल्या. व्यावसायिक यश मिळू लागले. यशाचा हा आलेख चढत असतानाच बाबांना त्यांची मूळ कलाप्रेरणा असणारी चित्रकला खुणावत होती. त्यांनी आपला यशोशिखराकडे जात असलेला व्यवसाय थांबवून चित्रकलेत स्वत:ला गुरफटून घेतले. चित्रकलेवरील प्रेमापोटी ते जगभर फिरले. मॉनेटू, व्हॉन गॉग, तुलुस लोट्रेक, देगा हे त्यांचे आवडते परदेशी चित्रकार; तर भारतीय चित्रकारांमध्ये एन. सी. बेंद्रे यांचे काम त्यांना विशेष भावते. जलरंग, पेस्टल, तैलरंग अशा माध्यमांतून त्यांनी काम केले.

'वयाच्या ९८ व्या वर्षापर्यंत ते चित्रे रेखाटत असत. कुठल्याही सामान्य माणसाप्रमाणेच पारंपरिक चढउतार, हेलकावे बाबांनीही अनुभवले. कला आणि व्यावसायिकता यांच्यात त्यांनी सुवर्णमध्य साधला. कौटुंबिक जगणं आणि व्यावसायिकता यांच्यात समतोल ठेवला. आपलं जगणं, आपलं काम आणि स्वत्व यांच्यातलं अद्वैत जपत शताब्दीचा टप्पा पूर्ण केला.

'यशासाठी शॉर्टकट नाही आणि परिश्रमांना पर्याय नाही. कलाकाराने निरीक्षणशक्ती वाढवली पाहिजे. त्यातून त्यांना स्वत:ची शैली गवसेल. कलेला सतत 'रियाज' हवा. माझी उत्तम चित्रे ही मी 'केली' नसून ती 'झाली' अशीच माझी भावना आहे.' अशी त्यांची श्रद्धा होती.

३री आवृत्ती

जनावनातली रेखाटणे

व्यंकटेश माडगूळकर

किंमत - १४०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.



१७वी आवृत्ती

छावा



लेखक
शिवाजी सावंत

किंमत - ४८०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

'राजा शिवाजी' हा निर्विवाद सिंहपुरुष होता. परंतु शिवपुत्र 'संभाजी' हाही एक छावाच होता. महाराष्ट्राला हे नव्याने; पण पुरेपूर उमजले आहे. 'छावा'च्या जोरदार स्वागताने ते सिद्धही झाले आहे. एक-दोन नव्हे; तर एकाचवेळी पाच आघाड्यांवर निकराची पंजेफाड करणारा हा सेना-धुरंधर!

मराठ्यांच्या इतिहासात असा सेनापती एकमेव 'संभाजी'च होऊन गेला. जंजिरेकर सिद्दी, गोव्याचे फिरंगी, मुंबईचे टोपीकर आणि तीस लाखांची फौज व चौदा कोटींचा खजिना घेऊन मराठ्यांचे पारिपत्य करण्यासाठी दक्षिणेत उतरलेला अवाढव्य औरंगजेब - या त्या चार आघाड्या. पाचवी आघाडी होती, स्वार्थांध स्वजनांची, अगदी घरचीच! विखारी विश्वास घातक्यांची!

रणांगणाचा वाघ सतत नऊ वर्षेपाठीशी घेत मुलूखभर दौडणारा हा झुंजार राजा जन्माला येताना कविमनाचे संचित बरोबर घेऊन यावा आणि 'बुधभूषणम्' काव्याची रचना करून तो कविराज म्हणून मान्यता पावावा; हे पाहिले की, प्रतिभा देवदत्त असली; तरी एक अजब आणि विस्मयकारी देणगी आहे, असे म्हणावे लागते. तसाच अटीतटीचा प्रसंग आला तर मराठी कविमन एकदा का निर्धाराने राजवस्त्र ल्याले की, मृत्यूलाही कसे धडक सामोरे जाऊ शकते; हे या छाव्याने तुळापुरी सिद्ध केले. ही शोकांतिका तर खरीच; पण उत्कट आणि भव्य समर्पणाचा वेध घेणारी!

सू सुटका आणि रंगीत डोंगर

हॉस्पिटलमधे असताना, संध्याकाळी मला अगदी कंटाळा यायचा. संध्याकाळी आईला भेटायला चित्र-विचित्र मंडळी यायची. दाढीवाली, टकलू किंवा केसाळ माणसं. पँट घालणारी, हाफ पँट घालणारी किंवा लुंगी गुंडाळणारी माणसं. साड्या, झॅकपॅक ड्रेस किंवा कंबरेला स्कर्ट अडकवलेल्या मुली. आणि ह्या सगळ्यांची अखंड बडबड!!

हां, त्यांच्या सोबत त्यांची मुलं पण यायची. पण ती आपल्या आई-वडिलांसारखी झक्कड नव्हती!!

ती यायची, एक मिनिटात मला पाहायची आणि मग अख्ख्या हॉस्पिटलभर हुंदडत राहायची! हॉस्पिटलमधेच पकडापकडी, लपाछपी खेळायची. मस्त मजा करायची!

पण ही मोठी माणसं, आपल्या मुलांसारखं अजिबात खेळा-बिळायची नाहीत! नुसती उभी असायची!! मग नाईलाजानं, आई मला पाळण्यात ठेवायची.

त्या क्षणी ते बडबडे आणि बडबड्या माझ्या आईचा ताबा घ्यायचे.

आणि मग सुरू व्हायची त्यांची 'बडबड फास्ट ट्रेन.'

मला वाटायचं की आईनं मला मांडीवर घ्यावं, माझ्याशी बोलावं, माझ्याशी गप्पा माराव्यात.' पण भेटायला येणारी माणसं इतकी दुष्ट असत की, ती

आईला माझ्याशी बोलूच देत नसत! आल्या-आल्या त्यांचीच बडबड सुरू.

आणि... आणि... खरं सांगते म्हणून रागावू नका, पण, भेटायला येणाऱ्यांपैकी निम्मेजण तरी वेडपट असतात असं माझं ठाम मत आहे.

अहो, लहान मुलांना कुठले प्रश्न विचारायचे, हे शिकल्या-सवरलेल्या मोठ्या माणसांना कळलं पाहिजे किनई? लहान मुलांना काय सांगायचं, हे त्या शहाण्या माणसांना समजलं पाहिजे किनई? पण त्यांना हे काऽऽही सुद्धा समजत नाही.

म्हणजे, चष्मेवाल्या, दाढीवाल्या किंवा मिशाळजी, टकलूकाकांना तर समजत नाहीच. तसंच, ओठ आणि नखं रंगवणाऱ्या, केस रंगवणाऱ्या आणि ड्रेस घालणाऱ्या मावश्यांना पण समजत नाही. खरंच समजत नाही त्यांना!! तुमचा विश्वास बसत नाही का?

मग, हा पहा परवाच संध्याकाळचा प्रसंग.

मी दूध पिऊन आईच्या जवळ मस्त लोळत होते. आई मला एका हातानं थोपटत होती. माझे दोन्ही डोळे जड झाले होते. इतक्यात, आईच्या ऑफिसमधली एक 'भडक मावशी' आली. एकदम माझ्या जवळच उभी राहिली! मी किती जोरात दचकले!! माझी बोलतीच बंद झाली!

भडक मावशी म्हणजे, भडक रंगीत कपडे, रंगीत ओठ, रंगीत नखं, डोळ्यांवर रंगीत चष्मा. शिवाय गालावर आणि नाकावर भडक मेकअप!

मी क्षणभर भिऊन पाहातच राहिले! तिच्या केसांवर, ओठांवर, नखांवर, गालांवर, नाकावर, कानांवर, हातांवर आणि पायांवर मिळून वेगवेगळे बारा-पंधरा तरी रंग होते! आणि तिच्या ड्रेसवर तर जग्गातले सर्वच रंग होते!!

‘चित्रविचित्र रंगांचा एक डोंगरच पाहतेय’ असं वाटलं मला.

भडक मावशी माझ्याकडे पाहत म्हणाली, ‘‘अय्या! कशी बघतेय बघ माझ्याकडे! मला ओळखलं वाटतं बब्बडनं? सांग सांग बब्बड, मी कोण आहे बरं?’’

आता मला सांगा, नुसतं बघितलं म्हणजे काही ओळखलं असं नव्हे. आणि म्हणे ‘माझं नाव सांगा.’ मोठ्या माणसांना समजत नाही ते हे!

मी जर का म्हणाले असते, ‘‘होऽऽऽ ओळखलं ग तुला! ह्या रंगीत डोंगराला ‘भडक मावशी’ म्हणतात! तर... तर... काऽऽऽय झालं असतं?...’’

अहो, ‘उंच टाचांच्या चपला घातल्या, म्हणजे काही उंची नाही वाढत!’ अशी एक चिनी म्हण आहे म्हणे, ती काय उगाच?

पण, ‘उगाच लहान तोंडी मोठा घोट घेऊ नये’ म्हणून मी गप्प बसले.

आता अचानक हा रंगीत डोंगर बोबडं बोलू लागला, ‘‘अले अले, मी तुला एक गंमत देनाले. मत्त-मत्त गंमत! मोती-मोती गंमत! तान-तान गंमत! ओलक पाऊ मी ताय आनलंय?’’

ह्या बोबड्या डोंगरानं तर मला वातच आणला! तिच्या त्या बोबड्या बडबडीनं मी जाम पकून गेले!!

तिनं गंमत काय आणलीय, हे मी कसं काय ओळखणार? ह्या एवढ्या मोठ्या डोंगराला काहीच कसं समजत नाही?

नाही म्हणजे, रंगीत डोंगर प्रेमळ होता! मायाळू होता! पण त्याचाच मला त्रास होत होता.

इतक्यात त्या भडक मावशीनं पिशवीत हात घालून ती ‘तान-तान,

मत्त-मत्त, मोती-मोती गंमत' बाहेर काढली! ती गंमत पाहताच माझे डोळेच फिरले!! ती गंमत माझ्यापेक्षा आकारानं आणि वजनानं पण मोठीच होती!! प्रचंड मोठी गंमत!!

मावशीनं पिशवीतून कापलेलं भलंमोठं, लालेलाल-हिरवंगार कलिंगड बाहेर काढलं!!

त्या रंगीत डोंगरावर, भलंमोठं लालेलाल कलिंगड पाहिल्यावर मला वाटलं, 'अगं बाई! ज्वालामुखी पेटला वाटतं!!'

पण माझ्या मनातलं आईला कळलंच! आई माझ्याकडे पाहून हसली. डोळ्यानं खुणावत मला म्हणाली, ''आगाऊपणा करू नकोस! कळलंय मला सगळं!'' मग आम्ही दोघी खूप हसलो.

भडक मावशी गेली आणि लगेचच 'वासू- काका' आले.

म्हणजे, 'ते काका' खरंच चांगले होते. ते माझ्याशी खेळले. मला समजेल असं बोलले. त्यांनी तोंडं वेडीवाकडी केली. मोठ्ठं तोंड उघडून त्यांची भलीमोठी जीभ दाखवली. मला वेगवेगळे आवाज काढून दाखवले. मला बरं वाटलं. मला ते काका आवडू लागले!

काका खाली वाकले. त्यांनी हळूच मला उचललं. पण मी काही बोलले नाही. मला वाटलं आपल्याला आणखी काही गमती-जमती पाहायला मिळतील.

पण कसचं काय नी कसचं काय?

काकांनी मला उचललं आणि छातीजवळ धरलं... आणि ...आणि मी घुसमटले! मला श्वास घेता येईना! मला चक्कर येऊ लागली... डोळ्यासमोर हॉस्पिटल फिरतंय असं वाटू लागलं!

मी 'आऽऽऽऽई.... आऽऽऽऽई...' असं ओरडणार होते, पण तोंडातून शब्दच फुटेना!

कारण... कारण... त्या काकांनी कुठल्यातरी

घमघमीत वासाचं अत्तर अंगाला चोपडलं होतं! त्या भयानक वासानंच मी घुसमटले होते ना!!

मग काऽऽय..? अशा वेळी व्हायचं तेच झालं!

मला एकदम सू सू... झाली.

काकांचा शर्ट ओला झाल्यावर त्यांनी मला अलगद खाली कॉटवर ठेवलं. आणि माझी त्या 'अत्तर वासू' काकांपासून सुटका झाली.

शर्ट ओला झाल्यावर वेगळाच वास पसरला! आईनं चमकून माझ्याकडे आणि काकांकडे पाहिलं. मी तोंड वाकडं करताच, आई काय ते समजली!

'लहान मुलांना भेटायला जाताना, अंगाला उग्र वासाची अत्तरं चोपडू नयेत, त्या वासानं मुलं घुसमटतात किंवा घाबरून सू-सू करतात' हे सुद्धा आम्ही म्हणजे, 'दुपट्यातल्या मुलांनी, पँटीतल्या माणसांना शिकवायचं वाटतं?'

मी मनातल्या मनात म्हटलं, 'एवढं पण समजत नसेल तर कशाला घालता त्या पँटी? त्यापेक्षा आमच्यासारखी मस्त दुपटी गुंडाळा! काऽऽय?'

मी मनात काही बोलले की ते लगेच आईला समजतंच!

आई माझ्याकडे पाहून जोरजोरात हसू लागली. बहुधा तिला 'दुपट्यात गुंडाळलेले काका' दिसू लागले असतील.

काकांपासून सुटका झाल्यानं मी जरा आळोखेपिळोखे दिले. लाथा-बिथा झाडून दुपटं सैल केलं. त्यामुळे आईचं लक्ष गेलं. आई आता मला जवळ घेणार...

इतक्यात एक मोठी फौज आरडाओरडा करत आमच्याच दिशेनं आली. दोन मावश्या आणि दोन मावशे (मावशे म्हणजे मावशीचे मिस्टर.)

मी मनात म्हटलं, 'चला आता झोपू या.' मी हाताच्या मुठी वळल्या. डोळे बंद करू लागले.

पण कसचं काय नी कसचं काय?

त्या फौजेनं माझ्यावरच हल्ला केला!

जाडी मावशी म्हणाली, ''काऽऽऽय ग लब्बाडे, डोळे बंद करून झोपत्येस वाटतं?''

मी मनातल्या मनात म्हटलं, 'अगं मावशे, डोळे उघडे ठेवून कुणीतरी झोपतं का गं? का मला असे खुळचटासारखे प्रश्न विचारतेस?'

दुसरी मावशी म्हणाली, ''ओऽऽहोऽऽऽ, हिनं नाक अगदी बाबांचं घेतलंय आणि जिवणी मात्र आईसारखी! हो किनई गं बब्बड?''

मी वैतागून मनातल्या मनात म्हटलं, 'अगं माझ्या मम्मड मावशे, अजून मी मला आरशात नीट पाहिलंच नाही, तर काय गं सांगू तुला?'

इतक्यात, ''नाही! नाही! मी सांगतो, नाक इकडचं आहे आणि जिवणी तिकडची! काऽऽय?'' असा एक जाडजूड आवाज माझ्या कानावर येऊन आदळला.

हे कोण बोललं? हे पाहण्यासाठी मी सावकाश डोळे उघडले तर, मला धक्काच बसला! क्षणभर गडबडच झाली!

कारण, मला नीट निरखून पाहणारे श्री. मावशे ह्यांचा एक डोळा 'इकडे' आणि दुसरा डोळा 'तिकडे' होता!!

हे 'इकडे-तिकडे' पाहून मी पुन्हा डोळे बंद केले.

त्याबरोबर दुसरे मावशे म्हणाले, ''हंऽऽ, घरची आठवण येतेय वाटतं? मला माहित्यै!''

माझे हात-पाय बांधले होते म्हणून, नाहीतर मी कपाळावरच हात मारणार होते! अहो जन्मल्यापासून मी आहे हॉस्पिटलमधे. मी अजून घरच बघितलं नाही! तर मला घराची आठवण तरी कशी येणार?

कळलं ना?

मोठ्या माणसांना समजत नाहीत त्या 'ह्या' गोष्टी.

पण होतं काय...

आम्ही बोललेलं तुम्हाला अजिबात समजत नाही!

आणि,

तुम्ही बोललेलं मात्र, आम्हाला सगळं समजतं!

पुन्हा आम्ही काही करावं तर, कपड्यात जाम बांधून टाकता तुम्ही आम्हाला!

त्यामुळे होतं काय...

'कपड्यात बांधून, शब्दांचा मार खावा लागतो आम्हाला!'

पण लक्षात ठेवा, ह्या सर्व गोष्टींना,

माझी आई आहे बरं साक्षीला!

आमची नवीन पुस्तके

कसं बोललात!

व्यंगचित्रकार
आर. के. लक्ष्मण

मराठी रूपांतर
अविनाश भोमे

१ ते ७ भाग

जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार
आर. के. लक्ष्मण यांच्या
'You Said It'! या कॉमन मॅनच्या
व्यंगचित्रांचा सात भागांचा संच
आता मराठीतून...















RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 July. 2015 Posting Date : 11 July. 2015

आमची नवीन पुस्तके

BOOK POST
Printed Matter

मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.